CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Documents relating to the Baji rao's advance upon Delhi 1737-38.

G-1
69/15

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

954.03

6945

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

१५

बाजीरावाचीं दिल्लीवरील स्वारी

[किंमत—१ रुपया ३ आणे किंवा २ शिलिंग]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई

१९३१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

Provincial Museum, LUCKNOW.
CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
954.03

DOCUMENTS RELATING TO BAJIRAO'S ADVANCE UPON DELHI, 1737-38

The year 1728-29 has been described as marking the first period of Bajirao's brilliant career. His next achievement, perhaps even more striking than the first, was his expedition to the North which, commencing in the Dussera season of 1736, culminated in the complete defeat of the Nizam in January 1738. Unlike the year 1729, when his younger brother Chimaji was in charge of the main operations, in this his second great triumph it was the genius and courage of the Peshwa alone that directed the campaign from beginning to end. As soon as the first penetration of the North was effected, Bajirao and his brother started in right earnest the task of settling the newly conquered territory in Malwa and Bundelkhand. The Imperial Court, however, wasted much precious time in concerting various plans ranging from open hostility to the invaders to complete submission. Fully aware of this vacillating attitude of the Imperial Court, Bajirao went north towards the end of 1735 and tried to secure his ends in a diplomatic conference, in March 1736, with Sawai Jaysing, the powerful prince of Jaypur, and other magnates who possessed influence with the Emperor. The Peshwa succeeded in winning over Jaysing who consistently advocated a policy of conciliation with the Marathas. There was however another party headed by Sadatkhan, Kamrudinkhan and others, who, not apprehending the magnitude of the danger, were opposed to any concessions to the intruders and advocated armed resistance. Bajirao, fully realizing that the ultimate decision must rest on an appeal to arms, returned to the Deccan in the summer of 1736, made elaborate preparations for a grand move, and after the Dussera started a campaign of systematic plunder and devastation throughout the Imperial territory beyond the Nerbudda. Baji Bhivrao Retharekar was sent in advance to secure the co-operation of Hirdesa and Jagatraj, the two sons of Chhatrasal, and reduce to obedience the chiefs of Bhadavar, Jatwada, Datia, Orchha and other Bundela chieftains. A detachment under Malharrao Holkar, Vithoji Bule and others crossed the Jumna to plunder the Doab, but was repulsed with heavy losses by Sadatkhan, who magnified this action into a great victory and followed up the Marathas to Muttra. But here his triumphant march was stopped. He effected a union with Mahmadkhan Bangash and bore down upon the Maratha forces. Bajirao by a clever ruse detached Baji Bhivrao into the Doab in order to divert his opponent's attention and himself with the main army made a sudden descent upon the Imperial Capital itself, creating indescribable panic and consternation. A full description of this brilliant exploit appears in his letter to his Guru Brahmendra Swami. The Emperor was now so completely demoralized that he prayed for terms through the mediation of Khan Dauran and Jaysing. To complete his life's work the Peshwa during the monsoon of 1737 quartered his army in Bundelkhand.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

In dire extremity the Emperor was persuaded to call in the Nizam to make a last attempt to bolster up the tottering edifice of the house of Babar. The Nizam, who was shrewdly watching the development of affairs in the North, was convinced that the time to strike had arrived, and at the head of a powerful army crossed the Nerbudda in April 1737, reached Delhi, and held long consultations with the Emperor as to the best way of dealing with the Maratha danger. All that the Nizam demanded was conceded by the helpless monarch. The letter of Venkaji Ram (No. 29) eloquently summarises the situation, and weighs the issue between peace and war.

The Nizam's departure to the North caused no little anxiety to King Shahu, who was much exercised by the danger of Bajirao's position and specially deputed Pilaji Jadhav to meet him and secure his goodwill. This Pilaji succeeded in doing and advised the Peshwa to adopt a conciliatory attitude. At this critical juncture Bajirao's innate genius shone at its brightest. He laid his plans with consummate skill. To prevent succour reaching the Nizam he stationed his brother Chimaji in Khandesh. Chimaji faithfully carried out his mission. During the early days of 1738 the Nizam was completely brought to bay at Bhopal in a battle the details of which are already well-known—and which is rightly set down as a master-piece of guerilla warfare. The defeat of the Nizam decided the fate of the Empire.

Bajirao had now all but achieved the supremacy over all India for the Marathas, but two accidents intervened before the consummation could materialise. In the early months of 1739 Nadirshah swooped down upon Delhi, while Bajirao remained wavering between two plans—co-operation with the Emperor to rid India of this new nightmare, or allowing Nadirshah to complete his own work of dismembering the Empire. He remained on the banks of the Nerbudda watching the course of events and trying to meet the rumoured possibility of Nadirshah's advance Southwards from Agra. Simultaneously with these events in the North the Maratha arms achieved, as we know, a signal triumph over the Portuguese at Bassein. One may therefore conclude that the Peshwa after the summer of 1739 obtained a short respite. Shahu showered lavish congratulations upon his minister and his brother and was justly elated at the success of the Maratha arms.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 71



Facsimile of the handwriting of Bajirao Ballal *(1720-1740)*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] [10-4-1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी, आज्ञाधारक शामराऊ मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ९ जिल्हेज जाणऊन स्वामीनी आपले क्षेम स्वकुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आपण राणोजी सिंदे याजबराबर गेलो होतो त्यास नर्मदा उतरून मालवियांत गेलो. बडवाईस वेढा घातला. तेथे आपला पाय जाया जाला ते घोडियावर बसावयाची मुस्कील जाली. तेथून पुढे दोन मजली पालखीत घालून नेले. परंतु विशेष पायाचा दुखाचा विचार जाला. मग तेथून त्यानी माझेबरावर स्वार देऊन खर्गोनास पाठविले कीं तेथे तबीबाचे[1] हाते उपाये करून पाये काही बरा जालियावर घरास जाणे म्हणऊन खर्गोनास पाठविलें. तेथें तबीबउपाये बहुत केले. तीन महिने तेथे राहिलो. काही पाये बरा जाला. मग तेथून घरास नीरवीस[2] आलों. येथेहि औशध उपाये केले. पाये बरा तो जाला परंतु आधू * * त्यावर स्वामीचे दर्शनास यावयाचा (बेत के) ला तो चिरंजीवाचे व्रतबंधाचे करणे आगत्य. हे कार्यें संपादून स्वामीचे दर्शनास येणार. व्रतबंधाची तीथ वैशाख सुध १० दसमीचे लग्नसिधि जाली. पूर्णमा जालियावर स्वामीचे दर्शनास पुणियास यावे तो आजी ऐकिले की स्वामीची स्वारी खानदेशात जाली. आजी मुकाम जवलियावर[3] जाला. याजसाठीं सेवेसी विनंती लिहिली आहे. आज्ञा स्वामीची येईल ते प्रमाण. बहुत काय लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*Shamrao Malhar to Bajirao : an account of his wound at the siege of Badwai, in company of Ranoji Sindia.*

No. 2] [15-11-1736 ?

छ ७ साबान.

श्री

राजश्री चिमणाजीपंत
आपा गोसांवी यासी

῾ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी ज़ाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २२ माहे रजब मुकाम

---

१ शस्त्रवैद्य. २ शिरूर तालुका. ३ मंचरजवळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नजीक तलेगांव पाा चालीसगाव जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. काली छ २१ रोजी घाट उतरोन आजी छ मजकुरी येथे आलों. लोक काही जमा जाले आहेत, काही जमा होणे आहेत. त्यास राजश्री पंत प्रधान यांच्या आगमनाचा विचार योजून आला म्हणोन लोक राहिले आहेत किंवा काय हे वर्तमान कलत नाहीं. आम्ही तों मजल दरमजल दाहा बारा रोजानी नर्मदापार होऊन जाऊन. येथे लोक आले आहेत यांची यादी आलाहिदा लेहून पाठविली आहे. राहिले लोकास ताकीद करून लौकरी आटपोन येत तें केलें पाहिजे. राजश्री पंतप्रधान यांचा यावयाचा विचार सीघ्र घडोन आले तर उतम आहे. नाहीतरी आम्हास जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. त्याप्रमाणे वर्तणूक करून. आमचेविसी चिंता केली न पाहिजे. जैसी कलेल तैसे प्रकारे फौज हिंडऊन आणितों. विशेष कायें लिहि(णे), कृपा आसो दिल्ही पाहिजे, हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶Pilaji Jadhao, proceeding north, makes inquiries about the Peshwa's whereabouts and the time when he would set out in the same direction.

No. 3] [*About 1736-37*

श्री (फाटले)

राजश्री बाजीराऊ व चिमणाजीपंत गोसावी यांसी,

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चंद्रशेन जाधवराऊ दंडवत विनंती उपरी, येथील जाणऊन स्वकीय कुशललेखन केले पाहिजे विशेष. राउली पत्रे पाठविली ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ सविस्तरे अवगत होऊन सविस्तरे वर्तमान श्रुत होऊन परम संतोश जाला. यैसेच निरंतर पत्र पाठऊन परामृश करीत गेले पाहिजे विशेष. पत्री उतरेकडील वृत लेखन केले व सांप्रत राजश्री राऊ पुण्याहून श्रीमंत स्वामीच्या दरशनास गेले म्हणऊन लिा त्यावरून परम संतोश जाला. आपण श्रीयात्रेस येतो म्हणऊन लिा * ते त्याचे प्रतिउतर न पाठविले यावरून आपूर्व वाटले. त्यास आपण श्री यात्रा उदेशे भालकीहून कूच

---

१ येथें पिलाजीचा शिक्का.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

केले ते प्रांते आलो. येथूनहि कूच करून श्रीच्या पर्वतास येण * * तेथून रा * * उळाकडे पत्रे पाठऊन * * * * सदईव आपले व राजकी वृत सविस्तरे लिहीत गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Chandrasen Jadhav expresses friendly feelings towards Bajirao and Chimaji. He appears to have overcome his ill-will towards the Peshwa.*

No. 4] [*2-1-1737*

छ १४ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे
सेवेसी

पोष्य बाजी भिवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २१ रमजान मुकाम नजीक कसबे आलोरी प्रांत भदावर जाणोन स्वानंदलेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी वार्तिकासमागमे पत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर व आम्हांकडील जाहालें वर्तमान आद्यंत लेहून आल्या कासीदजोड्यासमागमें पत्रें पाठविलीं आहेत तीं प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदित जाहालाच असेल. त्या अलाकडील वर्तमान तरी जाटवाडियाचे जमीदार येणार ते येऊन खंडणीचा भाग चुकविला. उरतां या प्रांतामध्यें भदावर उरले होतें तेथील मातबर पांच आले होते, व भदावरकरांनींहि बहुतच निष्ठार्थ दर्शऊन लिहिलें होतें कीं आपण जाल्या कराराप्रमाणें आजीपर्यंत अंतर केलें नाहीं, पुढेंहि पडणार नाहीं. तरी नियेताप्रमाणें सालमजकुरीं द्रव्य द्यावया दुसरा विचार नाहीं. अधिकोत्तर म्हणिजेल तरी मुलूक उद्वस आहे. सर्व प्रकारें आपलें अगत्य धरून चालविलें पाहिजे. सालगुदस्तां ताम्राच्या फौजा आल्या त्यास आपणास आ * * त्यानसी जाऊन भेटों लागलें. परंतु आपणांपासून अंतर पडों नेदीना. द्रव्य रेवातीरास पाठवावया अंतर केलें नाहीं. आपण पदरींचे असों म्हणून लेहून पाठविलें व त्यांकडून आलें. त्यांही रदबदल बहुतच केली. त्याप्रमाणें निर्वाह करून घ्यावा तरी आपले कांही तऱ्ही अधिकोत्तर कार्य करून घ्यावें, केवल तटी लावीन म्हणता कार्यास नये, विशेष करून घ्यावयाचें विचारावरी घातले आणि न जालें तरी मुलुकांत सिरोन परभारी गावगना खंडणी करावी, त्यामुळें साध्य होईल यैसे म्हणावें तरी तो अर्थ नाहीं. मुलूक खराब

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. साध्य कांहीं होणार नाहीं. हा अर्थ चितांत आणून कळेल त्या विचारें आल्या पाचांचे समाधानें जेथवरी अधिक गुदस्तास साधलें तितकें करून वेऊन निरोप दिला. द्रव्य यावयाचें तें लौकरीच येईल. तेथील द्रव्य यावयास दुसरा विचार नाहीं. याप्रमाणें या प्रांतीचा कार्यभाग उरकडिला. पुढें या प्रांतांत दुसरे जागा जाऊन मुलूकगिरी करीन म्हणता जागा आहे थैसे नाहीं. याकरितां जालें वर्तमान स्वामीस विदित व्हावें. स्वामी आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करावी, म्हणून लिहिलें असे. तरी काये ती आज्ञा करून उत्तर पाठविलें पाहिजे. तदनरूप वर्तणूक करून स्वामीच्या पुण्यप्रतापे याच प्रांतें आज्ञा ये तोंवर कालक्रमणा करीत आहे. बहुत काये लिहिणें कृपालोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao to Bajirao Peshwa, regarding the collection of tribute from the newly conquered provinces in Bundelkhand. The work, he says, is going on smoothly. The landlords from Bhadawar are seeking postponement as the province suffered greatly from the Mugul invasion.*

No. 5] [*13-1-1737*

पो छ १२ सवाल.

श्रीशंकर.

राजश्रीं आपा स्वामी गोसावी यासीं

८ श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो तुकोजी पवार व जिवाजी पवार दंडवत विनंती उपरी, येथील कुशल पौशे बहुल नवमी गुरुवासर पवेतो मुा कसबे भेलसे ये स्थली सहमंडलीनसी येथास्थित असो. श्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपणाकडील पत्र बहुत दिवस येत नाहीं तेणेकडून चितास उतकंठा वाहते, तर सदैव पत्री परामृश करीत असिले पहिजे. यानंतर राजश्री प्रधानपंत देसीहून आले. त्यांची आमची भेटीहि कसबे मजकुरीच जाली. भेलसियावर वेढा घालोन बसलो आहू. येथोन निर्गम जालियावर पुढे जाणार. हे सविस्तर वृतांत राजश्री प्रधान पंत यांच्या पत्रावरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

¶*The two brothers Tukoji (1728-53) and Jivaji (1728-75) Pawar, founders, respectively of the senior and junior branches of the House of Dewas, write this letter to Chimaji Appa informing him that they have besieged Bhilsa,*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

छ १० सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक आज्ञाधारक धोंडो माहादेव कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील क्षेम स्वामीचे कृपेकरून ता। छ १ माहे सवाल पर्यंत यथास्थित असे. श्रीमंत राजश्री नानास्वामीकडील लाखोटे ४ च्यार श्रीमंत राजश्री आपास्वामीकडे रवाना करावयासी पाठविले ते जासूद छ ३० रमजानी पावतांच बुंदेलखंडाकडील लाखोटे त्याचक्षणी कासीदजोडी बोलाऊन तीस रुपये आजुरा पदरी घातला आणि रवाना केले व पूर्वीहि कासीद दोन वेळा पाठविले आहेत. त्यांकडील जैसे वृत येईल ते सेवेसी लिहून. प्रस्तुत आईकतों जे बुंदेलखंडात वोंडशावर आहेत. काही तहरह करून कार्य करून घेतील थैसे आइकतो व माळवा प्रांते मंदसराजवळ सवाई व स्वामीकडील सरदार होते. दरम्यान तह करावयाची बोली घातली. सा लक्ष रुपये सवाई द्यावयावर आले. होळकरानी काही अधिक घ्यावयाची बोली घातली इतकियांत हस्तनापूरकर मुल्य आगऱ्याकडे येणार हे आवाई कळोन एक दिवस रजपुतानी केशरी वागे (?) करून लढाईचा प्रसंग घातला. सवाईचा चंडोल कामास आला. से दोनसे घोडी होळकराकडील जाया जाली व दहावीस बरीबरी माणसें कामास आलीं. इतके होऊन होळकर सोळा कोस अलीकडे आले. मागून सवाईहि आठ कोश आले. सातआठ कोसाचे मुकाबिल्यानें राहिले आहेत. होळकरानी बहीरबुनगे एकीकडे लाऊन जेरिंदे फौजेनसी सवाईकडे चाल केली ऐसे वर्तमान नवाब हफीजुदीखानाकडे डांकचौकीने बातमी आली. त्या प्रसंगी सेवक तेथें होता. डाकचौकीने पत्रे नवाबाकडे तुळजापुरास लिहिली गेली. सेवकानेंहि आपल्या खावंदास कळावें म्हणून आईकिले वृत्त लिहिले असे व पृथवीपतीकडील समाचार कीं यमुना उतरोन तीरोंतीर सिकार खेळत हळुहळू आगऱ्याकडे चाल धरिली. सादतखान वगैरे अमीर पातशाही शेर मार्गानें फौज व येते व रजपुताची फौज गोपाळसिंग भदोडियें व दातियाचा राजा वगैरे रजपूत हमराई होती त्यास हुकूम जाला जे पुढें रुसकत होऊन आपलाले मुलकाचा बंदोबस्त करणे. त्यावरून कितेक रजपूत सवाईकडे आले, कितेक जागाजागा गेले. हेहि वृत्त कळो आलियाप्रमाणे लिहिलें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter to Bajirao giving an account of an encounter between Sawai Jaysing and Holkar near Orchha.*

१ सडे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 7] [*25-1-1737*

छ ४ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक आज्ञाधारक केशो गोपाळ दिमत राजश्री आवजी कवडे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील सेवक लोकांचे वर्तमान ताा छ २६ रमजानपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. गंगाजी व सिदोजी जासूद याजबरोबर आज्ञापत्र पाठविले ते उत्तम समई प्रविष्ट जाहले. श्रीमंत राजश्री पंतप्रधान फौजेसहवर्तमान मालव देशांत गेले, तांब्रासी युध्य प्रसंग जाहाला, तांब्र माघारा सरोन भुपाळ (* * फाटले आहे * *) आपल्या फौजा भोवत्या राहून (सिर्कि) दा केला आहे म्हणोन लिहिलें तेणे करून सेवक लोकांस संतोष जाहला तो पत्रीं कोठवर ल्याहावा? याउपरी फौजेचे प्रयोजन आहे, तरी मामलियावरी दृष्टी न देतां फौजेनसी येऊन पोहोचणे म्हणोन आज्ञा केली. व या पत्रापूर्वी आज्ञापत्र आले त्या पत्राचें उत्तर सविस्तारें सेवेसी लिहिलें आहे त्याजवरून विदित जाहलें असेल. सांप्रत राजश्री बाबूराव नारायण सेवेसी पाठविले आहेत. मुखवचनें फौजेचें व सेवक लोकांचे वर्तमान निवेदन करितां विदित होईल. त्याचा विवेक समर्थानी चितांत आणून जे आज्ञा करिजेल तदनुरूप वर्तणुक करून. स्वामीनी वारंवार लिहिलें कीं मामलतीवर दृष्टी न देणे. तरी आपली दृष्ट स्वामीच्या चरणाविरहित आणखे स्थळीं नाहीं. परंतु राजश्री आउबासाहेब यांचे रवानगीस कर्जवाम जाले. सालगुदस्तां तांब्राच्या शहाकरितां मुलकांत बाकी राहिली (नाहीं) सालमजकुरीहि साहुकाराचा पैसा घेऊन सरकारांत दिल्हा. मुल्का प्रज्यंन्याकरितां हलाखीत आहे. हंगामसीर जोर पोहोचऊन वसूल घ्यावा. राजश्री आउबासाहेब तिकडे मोहिमेस श्रीमंतासमागमे. त्यांचाहि उपराळा इकडे सांप्रत नाहीं, एसें या लोकांस भासले आहे. साहुकार व कमावीसदार यांचे गळे उगवावे हेंहि संकट आहे. यांत समर्थांची आज्ञा आपणास प्रमाण. सेवेसी बाबूराऊ विनंती सविस्तर करतील ते चितांत आणून जे आज्ञा करिजेल ती प्रमाण. मामलियेत उगवे, साहुकार फिटे, फौजेची उस्तवारी होऊन स्वामीसेवा घडे, सेवक लोकांस कोणेविसीं नामोसी न ये, अऊ (बा पा) घेतो साहुकाराचा व कमावीसदाराचा (बो) भाट न जाये,

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सेवकास शब्द न लागे, तो विचार ध्यानास आणून राजश्री बाबूरावासमवेत आज्ञा येईल तैसी वर्तणूक केली जाईल. यांत समर्थ सर्वज्ञ असत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

हे विनंती.

¶*Kesho Gopal on behalf of Avji Kavde to Chimaji Appa, pleads his inability to join Bajirao in Malva for want of funds.*

No. 8] [पौा *31-1-1737*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. दतिया वोंडसे जाटवाडा इत्यादिक या प्रांतीचा कार्यभाग उरकणें तो उरकिला. उरतां भदावर येक राहिलें आहे. तेथील बोलीचा करार करून यावया त्यांकडील पांच आले होते ते मागती भदावरास गेले आहेत, ते लौकरीच येतील. दाहाबारा रोजांत तेथीलहि काम विल्हेस लागणें ते लागेल. पुढें लस्करानें जावें कोठे, करावे कायें ? फिरावयास जागा नाहीं. पूर्वेस जावे तरी येकीकडे भदावरचा मुलूक, दुसरेकडे बुंधेलेयांचा मुलूक, कोण्हासहि उपसर्ग लागों देतां येत नाहीं. ग्वालेरीकडे चमेल उतरोन जावें तरी लस्करास पोटास मिलणार नाहीं. दिलीचा रस्ता हमेशा मोगली फौजा फिरतात त्यामुलें मुलकांत काहीं ताकत नाहीं व पीकपाणी जाले नाहीं. मलूक भयान यैसा प्रसंग आहे. कोठेहि फिरावयास जागा नाहीं. पुढें काये विचार करावा याकरितां लिहिले असे. तरी स्वामीनी काये ते आज्ञा केली पाहिजे. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्त.

¶*Baji Bhivrao asks Bajirao whether he should proceed to collect dues after settling affairs at Bhadavar.*

No. 9] [पौा *31-1-1737 ?*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. भदावरचा प्रसंग तरी, त्यांकडे अगोधर कागदपत्र पाठवणें ते पाठविले होते कीं, तुम्हीं आपले मातबर पांच पाठऊन देणें. जों तुमच्या मेळ्यास फौज आली नाहीं तों खंडणीचा मामला चुकावणें. फौज समीप आली. देशात

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सिरल्यावरी मुलकाचा नाश होईल म्हणून लिहिलें होतें. त्यावरून भदावरकरांनीं आपणाकडील मातबर पांच लस्करास पाठविले ते येऊन भेटले. त्यांणी आपला सारांश बोलीचा भावार्थ सांगितला कीं, साल दरसाल ज्याप्रमाणें आमचा करार द्यावयाचा आहे व राजश्री पिलाजी जाधवराऊ याणीं घेतलें आहे त्याप्रमाणें द्यावयास मान्य आहों. अधिकोत्तर करू नये, आणि आमच्यानें मान्य करवत नाहीं. त्यास त्याहीं रदबदल केल्याप्रमाणें गुदस्ताप्रमाणें पनास हजार घ्यावयाचा करार करावा, तरी मागील दोन्ही संस्थानावरी साधलें तितकें अधिक करून घेतलें यैसें असतां भदावरच न घ्यावें यैसें नाहीं. याकरितां आल्या मनुश्यांस परिछिन्न सांगितलें की, गुदस्ताप्रमाणें करार होत नाहीं. त्यावरून ते म्हणों लागलें कीं आम्हीं आपल्या खावंदाकडे जातों. त्यास हें वर्तमान सांगोन मागती काये तो करार करून लौकरीच येतो म्हणून निरोप घेऊन गेले आहेत, ते लौकरीच लस्करांत येतील. ते आल्यानंतर त्यांचे बोलीचा भावार्थ मनांस आणून जेथपर्यंत अधिकोत्तर साधोन येईल ते करून. अद्याप त्याच्या देशास आम्हांकडून काडीचा उपद्रव लागला नाहीं. या आठा दाहा रोजात तेथील काये तो निर्गम होऊन येतो. जें होणें तें स्वामीचे पुण्यप्रभावें होईल. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*News-letter probably addressed to the Peshwa by Baji Bhivrao, mentioning that the chief of Bhadavar expresses unwillingness to have the tribute levied from the State increased.*

No. 10] [*January 1737*

श्री

विनंती उपरी. राजश्री हिरदेशा व जगतराज यां उभयेतांकडे रा गोविंद बलाल प्रयोजनानिमित्य गेले होतें ते, आम्ही या प्रांतें आल्यानंतर भेटीस आले. त्यांबराबर उभयेता राज्यांची पत्रें व कितेक स्नेहवादांची उत्तरें व मनसुब्याचा विचार सांगोन व लिहून पाठविला आहे. स्वामींचीहि पत्रें त्यांस कितेक मनसुब्याच्या प्रसंगाची गेली होतीं त्यावरून बहुत समाधान जाले. स्वामीचे येणे या प्रांतास जाले म्हणजे उभयेतानी सेनेसहवर्तमान दर्शनांस यावें यैसाच भावार्थ त्यांचा आहे, तो स्वामीचे आगमन जाल्यास होईलच. दुसरें भगवतसिंग अडारू यास सादतखान याणीं जीवें मारिला. त्याचा पुत्र रुपसिंग येऊन बुंधेल्यांचे पदरी पडिला आहे. त्याची व गोविंद बलाल यांची भेट जाहली होती. त्याणेहि कितेक विचार सांगोन पाठविले आहेत. त्याचा भावार्थ यैसा आहे कीं आपली

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्थापना पुनरुक्त आपल्या स्थलावरी करावी यैसें आहे. ये गोष्टींचा अभिमान बुंधेल्यास आहे. याकरितां आम्हीं उभयेतां राज्यांस पत्रें देऊन गोविंद बलाल याची रवानगी त्यांकडे करून त्याजकडील रा। हिमतराऊ व कृष्णसिंग च्यार पांच हजार फौजेनसीं आणविले आहेत व भगवंतसिंग याचाहि पुत्र भेटीस येणार आहे. त्यास बुंधेल्याकडील उभयेता व रुपसिंग अडारू यैसे आलेवर आम्हीं येकत्र जाहलों म्हणजे त्यांचे आमचे विचारें जो विचार कर्तव्य तो केला जाईल. हे वृत स्वामीस विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. जे होणें तें स्वामीचे पुण्य होईल. भदावरचा कार्यभाग उरकल्यावरी येमुनेआलाकडे मुलुकगिरी करावयास लस्करास आणखी जागा नाहीं, हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of his efforts to negotiate a settlement with the Bundele Rajas. Govind Ballal was despatched to the Bundeles on that mission.*

No. 11] [*31-1-1737 ?*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. दतिया वोंडसे येथील प्रसंग उरकला. भदावरचें भले माणूस गेले आहेत ते आले म्हणजे तेथीलहि काम विल्हेस लागेल. सुकलोरा, गुजरोला, पछोर, उचाट, जाटवाडा येथील जमीदारांकडून खंडणीच्या प्रयोजनास माणसें येऊन बोलीचाली करून खंडणी करार करून देणे ते जीवनमाफिक करून दिल्ही. तो पैका बोलीप्रमाणें निर्वाह करून देतील व अंत्रीपार बनवार येथीलहि निर्गम होऊन आला. या प्रांतामध्यें हाली व्हावयाचें स्थल भदावरानिरालें राहिले नाहीं. तेहि लौकरीच होईल. स्वामीस विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs the Peshwa of his efforts to exact tribute from the different provinces.*

No. 12] [*January 1737 ?*

श्री

राजश्री राणोजी सिंदे गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ बाजी भीवराऊ आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. बहुत दिवस गोसांवियाकडील पत्र येऊन कुशल वृत कलत नाहीं. तरी येसे न

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करिता सविस्तर वृत लेखन करून समाधान पाविले पाहिजे. यानंतर श्रीमंत राजश्री राऊ प्रधान यांची आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते मजल दर-मजल दतिया व वोडसे या प्रांते आलो. दोहि स्थलातून भले माणूस भेटीस आले. खंडणीची बोलीचाली करणे तें करून निर्वाह केला. पैका यावयाच्या मुदती करून दिल्या अहेत त्याप्रमाणे येऊन पोहचेल. पुढे जाटवाडा व भदावर वगैरे राहिले आहेत तेथीलहि बोली होणे ते होईल. वरकड सविस्तर राजश्री रावप्रधान याचे पत्री लिहिलें आहे त्यावरून कलो येईल. जाणिजे छ ९ माहे रमजान. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao writes to Ranoji Sindia that tribute from Datia and Orchha will soon be collected, and thereafter he will move on towards Bhadavar and Jatwada.*

No. 13] [*January 1737*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री वेंकटराऊ
स्वामी गोसावी यासी

पोष्य बाजी भिवराऊ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणांकडून पत्र येऊन कुशलवृत कलत नाहीं. तरी सविस्तर लेखन करून समाधान पावीत गेलें पाहिजे. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री राऊ प्रधान यांची आज्ञा घेऊन सेनेसहवर्तमान स्वार जाहालों ते मजल दरमजल दतिया वोंडसें प्रांतें येऊन, दोही संस्थानाची खंडणी गुदस्तापेक्षां कांहीं अधिकोत्तर करून, जाटवाडा भदावर प्रांतें जात असों. वरकड सविस्तर राजश्री राऊ प्रधान यांचे पत्रीं लिंहिलें आहे त्यावरून कलों येईल. आपणांकारणें संक्रमणाचे तीलशर्करा पाठविली आहे, घेतली पाहिजे. बहुत काये लिहिणें, कृपा लोभ आसों दिल्हा पाहिजे, हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Vyankatrao (Ghorpade) that he is marching upon Datia and Orchha under orders from the Peshwa to collect the annual tribute, after which he may very likely move towards Bhadavar and Jatwada.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 14] [*January 1737?*

[आरंभीचा मजकूर गाहाळ.]

कार न करणे. तिकडील तालुकियाचा मात्र धंदा उरकून तिकडेच राहणे. लेहून पाठऊ त्याप्रमाणे वर्तणुक करणें, म्हणोन डोंगरपूरच्या मुकामीहून लेहून पाठविलें, ते सविस्तर कलों आले. यैशास स्वामीनी ज्याप्रमाणे आज्ञा केली त्याप्रमाणे दतिया व वोडसे व भदावर येथील बोलीचालीमुलें साल गुदस्तांस जे अधिकोतर साधले, ते करून विल्हेस लाविलें. हे वृत्त स्वामीस लेहून पाठविले आहे. तीं पत्रें प्रविष्ट जाहालीच असतील. त्यावरून विदित होईल. अलीकडे स्वामीचे पत्र येऊन काही वर्तमान कलत नाहीं. तरी स्वामीचें आगमन कोठपर्यंत जाहालें ? पुढें काये मनसुबा योजिला आहे ? आम्हाकडील धंदा स्वामीचे आज्ञेप्रमाणें विल्हेस लागला. याउपरी फौजेनसी कोठे राहावे ? काये करावे ? हे सविस्तर आज्ञा करून पत्र सादर करावया आज्ञा करावी. त्याप्रमाणे वर्तणूक करून. बहुत काये लिहिणे, कृपा वर्धमान आसो दिल्ही पाहिजे, हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs the Peshwa of his dealings with Datia and Bhadavar and solicits further orders.*

No. 15] [पो॥ *31-1-1737*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. बुंधले यांस ताकीद करून पैक्याचा निर्वाह होऊन ये तें करणें म्हणून आज्ञा; तरी उभयेतां राज्यांस नर्मदातीरांस येतांच पत्रें पाठविली होतीं कीं, सालगुदस्ताची बाकी राहिली आहे ते व सालमजकूरचा यैवज निर्वाह करून देणें; आम्हीं फौजेनसीं या प्रांतें आलों असों म्हणून लेहून पाठविलेच होतें. त्यावरी रा॥ गोविंद बळालहि याच प्रयोजनानिमित्य उभयेतां राज्याकडे गेले होते ते त्याकडील द्रव्याची बोलीचाली करून आम्हांकडे आले. त्यांणी वर्तमान सांगितलें कीं, राजश्री हिरदेसाहजी यांणी आपले निसबतीचा बाकीचा निर्गम करून दिल्हा. राजश्री जगतराज यांकडील बाकीचा यैवज राहिला आहे. त्याची विल्हे करून देतों म्हणत आहेत. व सालमजकुरचेंहि वसुलांचें काम चालविलें आहे म्हणून सांगितलें. त्यावरून आम्हीं आपलीं पत्रें रा॥ जगतराज यांस बहुत विचारें लिहिलीं आहेंत कीं, बाकीचा पैका अद्याप ठेऊन द्यावा हे गोष्ट कामाची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नव्हें म्हणून व सालमजकूरचाहि पैका झाडियानसी वसूल होये तें करावें म्हणून लिहिले आहे व गोविंद बलाल मागती त्यांकडे पाठविले आहेत. ते द्रव्याचा निर्वाह करून देतील, ठेवणार नाहीं. सारांश उभयेता राज्याची निष्ठा स्वामीचे ठायीं निःसीम आहे. दुसरा अर्थ त्यांच्या चितात किमपि नाहीं. स्वामीचे येणें या प्रांते जाल्यांस उभयेतांनीं दर्शनास यावें, स्वामी आज्ञा करितील त्याप्रा वर्तणूक करावी, हाच त्यांचा भावार्थ आहे, हे स्वामीस विदितच आहे. हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of his endeavours to settle payments due from Hirdesav and Jagatraj, sons of Chhatrasal.*

No. 16] [पो *31-1-1737*

छ १० सवाल.

श्री

विनंती उपरी. येमुनेआलाकडे लस्करास फिरावया निर्वेध जागा कोठेहि नाहीं. त्यास रा गोविंद बलाल बुंधेल्याकडून आले. त्याणीं त्याकडील राजकारण त्याचे विचारें आणिलें आहे. त्यास येमुनापार होऊन जावें तरी सिमगा चैत्र वैशाखपर्यंत येमुनेस उतार नाहीं. जेष्ठ मासीं उतारसा पडणार तो आमच्या प्रयोजनाचा आहे नाहीं तें स्वामीस विदितच आहे. त्यास हा मनसबा करणें तो बुंधेल्याचे विचारें करावा. त्यांची फौज असिल्याविना होणार नाहीं. याकरितां गोविंद बलाल यांस उभयेतां राज्यांकडे पाठविले आहेत. आणि त्यांकडून राा हिमतराऊ व कृष्णसिंग पाच साहा हजार फौजेनसीं बोलाविले आहेत. त्यास गोविंद बलाल जाऊन बोली करून त्यांची फौज आणविल्याप्रमाणे येऊन भेटली आणि त्यांचे आमचें विचारें येमुनापार होऊन जाऊन योजिला कार्यभाग करावा यैसें आहे. त्यास गोविंद बलाल त्यांकडे गेले आहेत; त्यांचे उतर अद्यापि आलें नाहीं. जरी त्याची फौज लिहिलेप्रमाणें आली तरी त्याचे आमचे विचारें जो होईल विचार तो केला जाईल. विदित जालें पाहिजे. जे होणें ते स्वामीचे तपोबलसामर्थे होईल. हे विनंती.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of his efforts to cross the Jumna with the help of the forces supplied by Bundele.*

1296

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 17] [पौ *17-4-1737*

पौ छ २७ जिल्हेज.

श्री

विनंती उपरी. सांप्रत नबाबाचे येथ सादतखानाचे पत्र छ २३ जिलकादचे व फेरोजंगाचे खत आले. छ १० जिलकादी दो प्रहर रात्री. तेथ लिहिले आहे की, "राजश्री पंतप्रधान चमल उतरून फरिदाबादेस गेले. तेथून आगरे बारा कोस राहिले. राजश्री पिलाजी जाधव याचा पुत्र वगैरे पंधरा हजार स्वार व आडोरचा राजा च्यार हजार फौज यैसे येमुनापार उतरून गेले. तिकडून सादतखानाची फौच पंधरावीस हजार अली. त्यासी यासी गाठी पडली. हे मधे, इकडे येमुना, डावीकडे करांडा, उजवीकडे येक सरदार सादतखानाचा आणि सन्मुख सादतखानाचा भासा. सादतखानास दोन कोस मागे टाकून पुढे चालोन घेतले. लडाई जाली. मोगलानी फार दबाविले. यासी वाट कोन्हीकडे फुटना. यैसे संकट जाणोन येमुनेत घोडी घातली. तेव्हा मोगलानी दाटी करून असी माणूस मारले, से दोनसे जखमी जाले. पाचसे माणूस व घोडी लाहान थोर, यारदी[1] दोन च्यारसे राहिली ते नेली. नदीत कितेक माणसे व घोडी बुडाली. वरकड फौज सुरक्षित राजश्री पंतप्रधान यापासी येऊन पोहचले. पातशाहाचा फर्मान सादतखाजीस येऊन पोहचला की, तुम्ही लडाईची जलदी न करणे. वजीर आजम व खानदौरा व बंगस वगैरे अमीर तईकेले[2] (?) आहेत हे येऊन पोहचतील. मग लडाई करून पराभव पावऊन ताकूब[3] करून तंबी करणे. तंबी केल्यावेगले फिरोन न येण त्यास यानी जाब पाठविला की, लडाई शुरू जाली आहे. आता सबूर करिता येत नाही. नावाचा पूल नदीत बांधिला आहे. त्यात दाहा १० नावा कमी आहेत. त्या आज रात्रीमधे आणून पूल पुरता बांधून उद्या पार उतरून लडाई करितो. मग जे होणार ते हो. येणार ते येतील अगर न येतील. आता आम्ही इतकियावर सबर करीत नाही." यैसे उतर लिहिले. व यास पत्र लिहिले. बहुधा लडाई जाली असल. मागून वर्तमान साध्यांत येईल ते लिहून पाठऊ. माहाराज राजश्री स्वामीचा प्रताप व वैकुंठवासी राजश्री नानाचे पुन्य मस्तकी आहे. येशवंत होऊन येतील. सादतखानासी व वजिर आजमासी बावण कोसाचे अंतर आहे. कलल पाहिजे. परंतु आवघे येक होतील. बडाई लिहिली आहे. पाहावे, हे तयारीत आहेत.

---

१ लहान, किरकोळ ओझ्याचीं. २ ? ३ पाठलाग.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विस्वास काय? यासीहि जाले आहे. मुख्याचे समाधानाते करावे. कुचाचे तयारीत आहेत. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*News from Delhi, dated 2nd March 1737, of an encounter between the Marathas and the Emperor's forces, is transmitted to Poona by the Peshwa's agent with the Nizam. This refers to Bajirao's famous raid against Delhi.*

No. 18] [*21-3-1737*

श्रीशंकर

उतमगुणालंकरण कमलाअलंकृत राजमान्ये राजश्री
प्रधान पंडित स्वामी गोसांवी यासी,

सेवक जगनाथराऊ कृष्ण कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुषल तागाईत छ २९ जिल्काद मुकाम जांबरोली जाणून स्वकुषलोदंत लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपले आगमन फौजेनिसी याप्रांतात होऊन रोहिल्याचा जिला काबीज करून अटेरवाल्यासी येथवरी बतंग केले कीं सहकुटुंब त्यासी जीवदान दिधले हा सकलहि प्रसंग ऐकून चितासी अतिहर्ष जाहला ब पुढेहि नीट अगऱ्याचे मार्गे (कूच) होऊन श्रीमथुरास्नान होणार यावरून तरी चितासी अतिआनंद जाहला तो अर्थ कोठवरी लेखन करावा? सारांष आपण पूर्ण येषस्वी आहेत. प्रतापकटाक्षेकडून दिवसोनदिवस तांब्रहि सकल आदिकरून हतरहीत होतात. काही सत्वता राहिली ऐसा अर्थ नाही. श्रीकृपेकडून सकलासी तोंडघसी देऊन श्रीमथुरास्नान सकलसमुदयेसह घडेल यांत संदेह नाही. तोच सुदिन जे मथुरास्नान होऊन भेटीचा लाभ घडे. राजकी वृतांत तरी अभयसिंग दाहापंधरा हजार फौजेनिसी मौजाबादेस स्थिर आहेत. माहाराजासी हजुरून खास दसकती रुका व सकारपूर्वकाचीं पत्रें आलीं त्यावरून बाहिर व बुनगाह मानसिक समागमे घेऊन जेरिदे पंधरा हजार फौज व यासिवाय तोफखाना समागमे घेऊन जयेपुरासी दाखल न होता परभारेच काली डेरेदाखल जाहले. संध्याकाली आजी नौकोसाचे तफावतेने अगऱ्याचे रुखे जाबरोलीचे घाटी डेरे जाहले आहेत. कूच दरकूच अगऱ्या प्रांती जाणार. बहुधा बाहियात्कारे येकवटहि होतील विदित होये. हे वृत आपणासी समयोचित कलावे यास्तव अजुरदार कासद करून पाठविला असे. सदैव स्मरण पत्रार्थी स्वानंदऊन चितासी आनंदवीत असिले पाहिजे. विशेष काये लिहिणे, कृपा असो दिधली पाहिजे, हे विनंती. रा। छ २९ प्रात:काल जिल्काद.

¶*Jagannath Krishna congratulates the Peshwa on his victory at Ater and gives him news of the movements of Abhaysing of Jodhpur.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 19] [पो *30-3-1737*

छ ९ जिल्हेज.

श्री

सेवेसी विज्ञापना. अवरंगाबादेहून सावकारी लिहिली आली कीं, तीर्थरूप राजश्री रायानी अटेरीचा किला घेतला. हें वर्तमान दिलीस कलल्यावर बहुतसा दबाव बसोन पातशाईनी खानेदौरा यास आज्ञा करून पुढें रायास सामोरे येऊन सलामामला करावा, द्रव्य द्यावें, द्रव्याच्या बहुतशा गोष्टी लिहिल्या आहेत, यैसें वर्तमान सावकारी लिहिल्यात

* * * * * *

¶A business letter from Aurangabad, stating that the news of the capitulation of the Ater fort quite overawed the Emperor who thereupon ordered Khan Dauran to negotiate terms of peace that would satisfy the Peshwa's demands.

No. 20] [*March 1737 ?*

श्री

विनंती उपरी. आपणाकडून रा बाबूराऊ आले, वर्तमान सांगितले, त्यावरून कलले. मोगल दोघेतिघे येकत्र जाहाले. आजी पाटोदीचे सराईवरी आला असिला तर अठरा कोसाचे आंतर आहे. सादतखान लांब चालतो. राण[1] त्याचे आहे. जाट हरोलें[2] आहेत याकरिता उदैक प्राथःकाली तलावरी भोजन न करावे. आगोधरच जावे. राजश्री नाना फराल करून चालतील. दोन दिवस श्रम जाहाले तरी उतम. आपला आब राहातो. मोगल तिघे तिहीकडे लांब लांब होते ते थोर थोर मजली करून येके जागा जाहाले आहेत. पंचवीस कोस मैदाने रात्रीचे चालोन उजेडता हरोलाची गाठ पडलियावरी उतम नाहीं. माघारे कोणी तोंड करणार नाहीं. घोडियास पाणी विहरीवेगळे नाहीं. काहाडून पाणी पाजावयाचें संकट आहे. याकरिता पाहाटेच सिलावेलाचे चालावे हें उतम आहे. दोन तीन मजली आडचण. बारी आहे ते टाकून लांब जावे, हे उतम आहे. सूचक आर्थ आपणास लिहिला आहे. अम्हास म्हणतील कीं घाबरे जाहालेत. तरी वलण राण मोगलाचे घर आहे. वाकीफाल[3] रातचेच चालतील. यास्तव गाठ तोडावी हे उतम आहे, हे विनंती.

---

१ राण=रान, मुलूख. २ हरोल=आघाडी. ३ वाकीफ=जाणता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उदैक तलावरी दोन हजार स्वार मातबर सरदार ठेवावे. तिसरा प्रहरपरियेंत तलावरी राहून दुसरे दिवसी बातमी घेऊन येत यैसा धीर धरावयाचा सरदार पाठविला पाहिजे, हे विनंती.

¶*The Maratha Commander has issued orders to move rapidly avoiding contact with the enemy's forces which have gained in strength as a result of the combination of the Moghal war-lords.*

No. 21] [*Jan. 1737*

श्री

विनंती उपरी. जाले वर्तमान पूर्वी पत्री लिहिले आहे त्यावरून सेवेसी श्रुत होईल. भदावरचा मामला विलेस लाविला. केवल हटनिग्रह करावा तर मुळूक उद्वस केला आणि येके मापें टका जमा होतो यैसे नाहीं. याजकरिता त्याचे हातून थोडेबहुत अधिक करून विलेस लाऊन घेतले. याउपरी भदावर डावे टाकून सेखाचे महूस गेलों. तेथे स्तल थोडके. येवडे लस्कर आट रोज टिकते आणि पोट भरते यैसे नाहीं. पुढे जावे तर मुळूक बुंधेल्याचा. त्यास तोसीस देता येत नाहीं. भदावरकराचाहि मामला विलेस लागेल. कोठे लस्करास पोट भरावयास जागा नाहीं. त्यास उभयता राज्याकडे राजश्री गोविदपंत पाठविले आहेत. त्याचा मार्ग पाहवयास त्या प्रांते जात आहे. ते आले तर त्याच्या विचारें जो मनसबा होईल तो करीत आहें. त्या प्रांते टिकाव होईल तेथवर करू ; नाहींतर ढवलपूरचे रोखे येऊ. दिवस तीन महिने पोट भरावयास राहिले आहेत. मुळूक तो सर्व कौली जाला आहे. बुंधेल्याचें दोनी दिवाण आले म्हणजे येमुनापार होत आहे. वडिलाचे पुण्येकरून जे होईल ते करीतच आहें. याउपरी वडिलाचे आज्ञेचा मार्ग पाहात राहिलों आहे. स्वामीनी जो मनसबा करणे तो बहुत विचारें केला पाहिजे. या प्रांतातील या प्रकारचें वृत आहे. सेवेसी विदित व्हावे याजकरिता लिहिले आहे. वडिलाची आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्त.

¶*The writer, probably Baji Bhivrao, expresses the difficulties that he experienced in collecting money in the north for the maintenance of his army. The letter seems to be addressed to Bajirao.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 22] [3-4-1737

पौ छ २७ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे-
सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा चैत्र शुध्ध १५ पावेतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री राव यांचे व सादतखान यांचे युध्ध जाले. वर्तमान येथें आजी पंधरा दिवस आले. होते. त्यास छ ११ जिल्हेजी नवाबास सादतखानाचे पत्र आलें कीं, गनिमाचें आपले युध्ध जाले. गनिमानी शेखी बहुत केली होती. त्यास तंबी पो(हच)विली. त्या पत्राचा अभिप्राये सर्व कारभारियांचे मुखे मनास आणितां तर युध्ध जालें. राजश्री मल्हारजी होलकर यांचें वर्तमान विपरीत आहे. व आपाजी जाधव पाडाऊ जाले. माधवराऊ नारायेण पाटणकर हेहि पाडाऊ जाले. आणिकहि सरदार मातबर दाहा पाच माणूस व सिपाई लोक दोनसे माणूस जिवंत धरून नेले. च्यारपांच हजार घोडी नेली. व यमुनेत लोक बहुत बुडाले गेले. या जातीचे वर्तमान आहे. मोगल पाठोपाठ येत आहे. आपले लस्कर जैसिंगाचे मुलकाचे रोखे गेले, म्हणून वर्तमान आहे. परंतु आद्याप आपले लस्करचे लिहिले आलें नाही. जे लिहिले वर्तमान येईल ते खरे. व येथील मुख्याचा विचारहि ऐसा आहे कीं, नर्मदेपावेतो जाऊन तिकडील भावगर्भ पुर्ता मनास आणून जर आपले अटसटीयांत गोष्टी आली तर वेलास न चुकावे, असा रंग आहे. उदईक कूच करून जाणार. स्वामीस कलावे यास्तव लिहिलें आहे व श्रीमंत राजश्री रायांकडे येथोन कासीद रवाना केले आहेत. तेथील उतर आल्यानंतर आपणास लेहून पाठऊन. तेथील उत्कर्ष ऐकोन वृध्धास आवेश बहुत आला आहे. जर हे या मार्ग पडोन आले तर खामखा गले पडावे ऐसा विचार आहे. आपल्यास कलावें यास्तव लिहिलें असें. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*Krishnarao Mahadeo informs Chimaji Appa that rumours have been received that the Maratha forces under Malharrao have been routed and that they lost a number of horses and their baggage in the retreat.*

---

१ ऐट.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 23] [*7-4-1737*

छ ९ मोहरम

मुा. खेतोली.

श्रीवेंकटेश

श्रीमंत सदायेशवंत धर्मपरायेण

राजश्री राऊ स्वामीजीचे सेवसी

सेवक वेंकाजी राम सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १७ माहे जिल्हेज मुाा गडहसी नजीक सवाईपूर कोस वीस जाणून येथास्थित आसे. स्वामीस पत्रे पाठविली. उपर हुंडीचे पैरवीत राा * * राजी याचेथील करून हुंडी वाटे लावावी म्हणून सावकारास बोलाविले जे. पंचविसा हजाराच्या टिबा[1] दिधल्या, त्याची हुंडी करून देण. यैसियास त्यानी आर्ज केला जे, आपण टिबा दिधल्या हजार पंचविसाच्या. त्यास राा राउराजा म्हणत आहेत जे, गांवगणा माल देतो, घेणे. त्यानी उंजूर[2] केला जे, फौज तिकडून गेली आणि माल लस्कराने लुटून घेतला तरी, आपण दोहीकडून बुडालो. तेव्हा आपण त्यांची निशा केली की, हे वर्तमान आपण राजश्री स्वामीस लिहिले आहे. त्याजपासून पाऊण लाख रुपये घेणे लागतात. याबद्दल विनंतीपत्र पाठविले आहे. त्यावरून श्रीमंत स्वामी बुंदीच्या मुलकातून जाणार नाहीत. आणि त्यांचा मुल्क मार्गाविगलाहि आहे. स्वामी कृपा करून तिकडून न जातील यैसे बहुत प्रकारें त्यांचे समाधानी करून सांगोन कार्यावर आणिले. यैसियास स्वामीनी राा राऊराजियाचा राा पंडितरायाचे विदेमाने नेमस्त केले, त्याप्रमाणे सरंजाम देतात. यास्तव विनंती लिहिली असे. तरी त्यांचे मुलकातून स्वारी न होय ते केले पाहिजे, की साहुकारासी वचनास आंतर न पडे. आणखी पनासाची निशाहि त्याज हातीच करणे लागती. याबद्दल विनंती लिहिणे लागली. इतकियावर औरंगाबादेची हुंडी पंचवीस गंगाभागिरथी मातुश्रीबाईसाहेबबाा राा सवाईजी व प्रतापसिंग बाा पंचवीस राऊराजा येकूण पनासाच्या हुंडिया औरंगाबादेस सहजराम नावाणी याचेथे हुंडिया पाठवितों. आणि श्रीमंत राजश्री आपा स्वामीस विनंती पत्र लिहितों. आम्हापासी जासुदांची जोडी आहे. व सरकार राा सवाईजीची जोडी देऊन औरंगाबादेस पाठवितों. तेथून आमची जोडी पुणियास जाऊन, विनंतीपत्र देऊन, तेथून श्रीमंत राा आपा स्वामी पैका पुणियास आणवितील. या प्रकारें वाटे लावितों. स्वामीनी बुंदीच्या मुलकातून स्वारी न जाय, ते केले पाहिजे. स्वामीनी जयेपुरीयास सौदियादखल तीनसे

---

१ याद्या. २ तक्रार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रुपये पाठविले होते. त्यास तेथून याचे तरफेचा जोरावरसिंग आहे. त्याने सौदा व तीनसे रुपये माघारे पाठविले. आणि पांच हजार रुपये मेजमानी पाठविली. तेहि स्वामीनी मान्ये केली. येणेकडून आसता भाऊपणा राखिला यैसे रा सवाईजीस भासून परम संतोश मानिला. आपणास बोलाऊन बहुत संतोशाच्या गोस्टी सांगितल्या जे, रा अपणासी भाऊपणा आणि माया बहुत राखतात. राहत्या स्थलाचीहि गौर करून थोडीबहुत मेजमानी पाठविली, तेहि घेतली. इतकियाने आपणास फार संतोश जाला. आमचा सर्व प्रकारें अभिमान त्यासच आहे. स्वामीचे पत्रहि येऊन पावले. उभयेताची पत्रे दिधली. आमचे पत्र रा सवाईजीस आक्षरेशा वाचून दाखविले. पाहून परम समाधान जाले. रा स्वामीचे आपण सेवक आहोत. मुल्क त्यांचा, आपण त्यांचे. सर्व प्रकारे रक्षेण करणे त्यासच आसे. पुढे डावे उजवे टाकून गेले पहिजे. हेहि विनंती केली जे, सोम्हईला (?) न्यातीच्या मुलकाचे तऱ्ही रक्षण करून गेले पाहिजे. गंगाभागीरथी मातुश्रीही बहुत कृपा केली. त्याचप्रमाणे स्वामीनीहि करावी. यैसे राजश्री सवाईजीनी सांगितले आणि साहुकारांचे तो अगत्य असे. पहिलेहि पत्र स्वामीस लिहिली आहेत. हालीहि विनंतीपत्र लिहिले आसे. तरी उतरे पाठविली पाहिजेत. येक जोडी कासदाची येथील वर्तमान लिहून पाठविले होते. ते जोडी आगर उतर आले नाही. तेथे आसता पाठविले पाहिजे. माघील पनास सहश्रांस. सरकारची जोडी तो नाही. राजश्रीपासी येथून. कासी(द) (जो)डी बराबर आज्ञा होईल तरी देऊन पुणियास पाटऊ. धुलगडावर तीन नवाब आहेत. चौथा नवाब मनसूआलीखान सादतखानाने पूर्वस पाठविला. तिकडील मवासानी जामीदारानी फितवा केला यास्त (व) बाटे लाविला. दुसरे दिलीस जाऊन पातशास जाऊन मनसु

* * पुसावा की मागे मागे जावें की काये? बरवे प्रकारे फजीत पावले. आतां येऊन काये होणे? परंतु रा सवाईजी भितात की, राच्या तलाने तल येतील. बरे जे होणार ते होईल. राजश्री आम्हावर संतोशरूप राहिले, सर्वहि पावले. स्वामी उतर पाठवितात ते रा सवाईजी आपणासमीप बसऊन वाचून पाहतात. ल्याहावयेंासहि कितीक मजकूर तेच सांगतात. विशश काय्र लिहिणे? कृपा निरंतर आसो दिल्ही पाहिजे. धुलगडीहून मोगल पुढे चालली-याचे वर्तमान आले नाही. वरचेवर वर्तमान लिहून पाठवीन. हे विनंती.

¶*Vyankaji Ram writes from the camp of Sawai Jaysing that the latter was favourably inclined towards the Marathas and was willing to help the Maratha cause at the Court of Delhi provided his territory remained unmolested by the Maratha hordes. The letter emphasises the friendly attitude which Jaysing evinces towards Bajirao.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 24] [11-4-1737 ?

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलांचे शेवेसी

अपत्यें जनार्दनानें साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ताा छ २१ जिल्हेज मुकाम काा कोठडें. सैदाचें वडिलांचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. वडिलांची आज्ञा घेऊन आल्यादारभ्य येकहि आसीर्वादपत्र येऊन कुश(ल) वृत कलत नाहीं. याकरितां चित सापेक्ष आहे. तरी वडिलाची स्वारी कोणत्या रोखे जाहाली आहे, प्रस्तुत मुकाम कोठें, काये वर्तमान हें सविस्तर लेखन करावया आज्ञा करणार स्वामी वडील आहेत. आम्ही या प्रांते आल्यापासून तीनचार पत्रें मुजरद कासिदासमागमें व राजश्री जगतराज याजकडील कासीद गेले त्यासमागमें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहाली कीं नाहीं हें काहीं कलत नाहीं. पावली असिलिया वर्तमान विदित जाहालेंच असेल, प्रस्तुत आम्हाकडील वर्तमान तरी वडिलाची आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते दिवसीं येऊन चमेलीवरी मुकाम केला. तेथून दुसरे दिवसी कूच करून कोर नदीवरी येऊन दोनरोज तेथें मुकाम जाहाला. त्यावरी कूच दरकूच करून पाढोरेवरी आलो. तेथें पाचसात मुकाम जाहाले. तेथून साहा कोश कोच राहिली होती तेथें येऊन तीन च्यार रोज मुका(म) जाले. त्यावरी तेथून कूच करून प्रस्तुत येथे मुकाम आहे. या प्रमाणें कूचमुकामें करीत करीत येथपर्यंत आलों. पुढें चारापाणी पाहून कधी कूच कधी मुकाम करून वडिलांची आज्ञा येई तावत्काल राहून. विदित जाहालें पाहिजे. राजश्री रुपयाचे[१] रवानगीचे व दतिया वोडसें व वरकड वर्तमान राा विसाजी दादाजी यांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. मोगलाची युध्यप्रसंग जाला म्हणून वर्तमान आइकतों. परंतु वडिलांचे आसीर्वादपत्र येत नाही त्यावरून चितास समाधान नाहीं. याजकरितां सविस्तर वर्तमान ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardanpant (?) to Bajirao, inquiring about his movements.*

---

१ ' रुपरायाचें ' ? हा अंतर्वेदींतील जमीदार पेशव्यांस सामील होता.

 CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीशंकर

छ २ मोहरम

(जाबसूद)

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवक बाळाजी भिकाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून सेवकाचे व मामलियाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष. स्वामी फिरंगाण प्रांते जाऊन साष्टी प्रांत फते केला, वसईस मोर्चे लाविले आहेत, यैकोन संतोश जाहाला. या प्रांतीचे वर्तमान, खानदेशात तांब्र मुतवलसखान बागलाण वगैरे जाहागीरदार दोन हजार फौजेनसी पूर्वी होते. नबाबाकडू बकसी दोन हजार फौज व तीन तोफ खानदेशात येऊन उभयेता थालनेरी येकत्र जाहाले. राजश्री सेनापति थालनेरी तांब्रास भेटले. खानदेश प्रांतीची ठाणी स्वामीचे तर्फेची मोडावी हे तांब्राचे चितात आहे. आरडीचे ठाणे परगणे डागरीस राजश्री आवजी कवडे याणी नवे ठेविले आहे. मोगलाने फौज पाठऊन ठाणे बेलदार लाऊन पाडिले. ठाणियाचे लोक तर्फकी[1] जाहाले होते. त्याणी ठाणे मागती बांधावयासी लागले आहेत. उदीरखेडिया-वरहि मोगलाचा दबाव आहे. येणार यैसे वर्तमान आहे. प्रस्तुत तांब्र सुलतानपूर परगाणियात कुढावदासी भांडतो. लाहान थोर कुल बिछोंद[2] तीन च्यार हजार आहे. कुढावेद फते जाहालिया कोणीकडे जाईल तें न कले. जमा लुदीखान दाहा बारा हजार फौजनसी राजश्री आवजी कवडे याचे मागे लागले होते. जुंजत भांडत देशपर्यंत पिछा करून कोलवलीस कवडे गेले म्हणून वर्तमान आईकिले. तांब्र माघारा फिरोन आवरंगाबादेवरून नबाबाकडे मजल दरमजल गेले. उतरेकडील वर्तमान आठ दाहा दिवस बाधावाई (?) आले होते की निजामनमुल्क याचा लेक व सादतखान भडभुंज्या उभयेतासी व श्रीमंतासी युध्येप्रसंग जाहाला. हे वर्तमान आलियावर जासुदांची जोडी बराणपुरास खबरीस पाठविली. बराणपुरी नबाबाने तीन दिवस शहरात दवंडी पिटिली की सडे फौजेबरोबर जो निभावेल त्याणे तयारी करून बरोबर यावे. छ १७ जिल्हेजी मुख्ये कूच करून सडे फौजेनसी आराब टाकून हंडियाचे घाटे

---

१ हैराण. २ बिछायत = मालमत्ता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रेवा उतरावयासी गेले. उतरेस युध्यप्रसंग जाला. हेहि बोली बराणपुरी दाट आहे. स्वामीकडे कागदपत्र आले आसतील ते तथ्य, सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶Balaji Bhikaji congratulates Chimaji Appa on his successful attack on Salsette and wishes him good luck in his enterprise against Bassein. He informs the addressee that the Nizam's army has been on the move of late and has captured some places belonging to the Peshwa. There are rumours, he adds, of an engagement having been fought out between Bajirao and the Moghal army in the North.

No. 26] *[15-4-1737 ?*

श्री

राजश्री आपा गोसावी यांसी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित देवजी सोमवंसी हिंदुराऊ कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून श्वकीये लेखन करावयासी अज्ञा निरोपित असिले पाहिजे, विशेष. दिवस जाले आपणाकडील पत्रआगमन होऊन परामर्ष जाला नाही, तेणेकरून चित सापेक्षित आहे. तर गोसायानी साकल्य कुशलवृत लेखन करून आमचा सांभाल केला पाा. यानंतर बऱ्हाणपुरीहून पूर्वील राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत याची पत्रे आली ते गोसावियाकडे पाठविली. प्रविष्ट होऊन अभिप्राये विदित जाला असेल. प्रस्तुत राा गणेश अनंत यांचे पत्र आले. छ १७ जिल्हेज शुक्रवारी नवाबाचे कूच जालें. उतावली नदीवर गेले. मजल दरमजल हस्तनापुरास जाताती. या प्रांते आवदुल रहीमखां व अनरुलाखां दिवाण येसे पाच हजार स्वारानसी व नसरतजंग लेक औरंगाबादेस सुभा पाच हजारानसी येसे ठेवितात. वराडात सुज्यातखां. याप्रमाणें बदोबस्त करून राजश्री स्वामीस व राजश्री प्रधानपंतास पत्रे लिहिली की, आपले सिरी यागीपणाचा[१] शेह आहे तो खावंदाजवळ फेडावा. तुमचा आमचा भाऊपणा आहे त्यांत खेता[२] नाहीं येसे कितेक प्रकारे स्नेहवादे लिहिले आहे. चितातील विचार भिन्न आहे. राजश्री पंतप्रधान हे दिलीस जाऊन सार्वभोमाची भेटी घेतात हा निश्चये जालियावर, आपली गत काये? दुसरा सुभा येईल यास्तव तमाम उबरावास व दिलेश्वरास पत्रें पाठविली की आपण दर्शनास येतो. सरकारचा खजाना आहे. आपण तेथे आलियावर गनीमास

---

१ बागी = बंडखोर; स्वामिद्रोही. २ लबाडी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मारावयाची काये हजत आहे ? येसे लिहिल्यावरून सार्वभौमानें रा पंताचे भेटीस विचार महकूफ[2] करून नवाबास नानेरोंटी[3] पाठविली. ह्याजवरून हे जलदीने जात आहेत येसे वर्तमान लिहिले आले. यास्तव गोसावियासी वर्तमान कलावें म्हणून लिहिले असे. याउपरी जो विचारपैरवी कर्तव्य तो करावा. विशेष काये लिहिणे ? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Devji Somvanshi communicates to Chimaji Appa the movements of the Nizam towards Delhi.*

No. 27] [*19-4-1737*

श्रीशंकर

श्रीमंत राजे[4] आपा स्वामीचे

शेवेसी,

पोश्यें बाबुजी जोशी सांा नमस्कार वीनंती उपरी. आजीच शाहरीहुन भगवंत भैरव यांचे पत्र आलें. नवाब भामगॆढास गेला. पुढें दरकुच जातों. श्रीमंत राजेश्री रायांचे वर्तमान तर, आगरीयाचे मुलकांतुन दोन तीन मजली आलीकडे आले. तमाम अमीर येकेठाई जाले. आपला शह त्यांजवर बसत नाहीं. अठेर मारल्यामुळें, फौज भारी जाली. यामुळें कामकाज होतां दिसत नाहीं. दुसरे वर्तमान सटवोजी जाधव यासमागमें पांच सात हजार फौज देऊन यमुनापार पाठविलें. तेथें साहदतखानाची गाठ पडली. आपली फौज कोती. यामुळें युध न होतां मोगलाची दाटी देखोन, फौज पळोन, यमुनातीरास आली. उतार सांपडला नाहीं, यामुळें कीतीयेक राऊत बुडाले, कितीयेक पळोन लशकरास आले. साहदतखान शेर होउन आगरीयासंनिध पुल बाधुन आलीकडे उतरला. तमाम फौजा येकेठाई जाल्या. असें जाणोन नवाबहि भारी फौजेनशी उजीनीस जाणार, इंदुरापासुन कुल माहलांत जीमीदार वसुल देत नाहींत. तरतें बुडतें पाहतात. दोन वाटे वसुल आला. बाकी वसुल येत नाही. स्वामीनी ये समयांत गंगातीरी असावे. आवजी कवडे आणखी येक दोन सरदारांनीं खांदेश प्रांती असल्याने नवाबास वचक पडता. प्रस्तुत स्वामीचा गुंता ते प्रांती जाला. यामुळे नवाबास शह नाहीं. हे गोष्ट उतम न जाली. चार पत्रे शाहरीहून आलीं. तेधवा स्वामीस लिहिलें आहे. चितास येईल तो वीचार करावा.

---

१ हरकत. २ रहित, तहकूब. ३ शपथ, क्रिया.
४ 'श्री' अक्षर सुटलें असावें. ५ खाण्डव्याजवळ नेमाड जिल्ह्यांत.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

शरीरास दोन दिवस आरोग्य वाटतें. फीरोन ज्वर येतो. भोग सरेल तेधवा आरोग्य होईल. पायचे माणूस दोन चार हजार व येक दोन शाहणें माणूस ठेउन, स्वामीचे येणें वरतें होईल तर उतम आहे. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे वीनंती. वैशाख शुध १ मंगळवार[१].

¶Babuji Naik informs Chimaji Appa of Bajirao's encounters with the Imperial armies. He has heard rumours of disasters to the Maratha arms. Bajirao had written glowing accounts of his victories a week before, but the writer's information is quite to the contrary.

No. 28] [20-4-1737

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मलार दादाजी साष्टांग नमस्कार विनंती छ ३० जिल्हेज बुधवारपर्यंत ये प्रांतींचे व सेवकाचें वर्तमान स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे लस्करचें वर्तमान शहरींहून व नवाबाचे लस्करांतून आलें ते पूर्वीं सेवेसीं दोन पत्रें पाठविलीं आहेत. हालीं आजीच औरंगाबादेहून शामजी गोविंद याचें पत्र आलें. राजश्री भायजी नाईक इंदुरीं आहेत त्यांचें पत्र भगवंत भैरव यांस आलें त्याची नकल शामजीपंतीं येथें पाठविली ते नकलेची नकल सेवेसीं पाठविली आहेत, त्यावरून साविस्तर वर्तमान विदित होईल. पूर्वी वर्तमान आलें होतें तें सर्व मिथ्या. राजश्री पिलाजी जाधवराऊ व राजश्री मलारबा व बाजी भीमराऊ व तमाम फौज यमुनापार गेली होती, तेथें दोन शहरें मारून मोंगलासी युध्य प्रसंग जाला. मोंगलास थंडा करून फौज सांभाळून सरदार सर्व राजश्री पंतप्रधान यांजवल आले. हें वर्तमान नकलेवरून विदित होईल. मोगलाई लस्करची खबर पूर्वी आढलली होती ते लिहिली होती. परंतु या पत्रावरून ते मिथ्या आहे. औरंगाबादेस जासूद बातमीस ठेविले आहेत. मागाहून वर्तमान येईल तें सेवेसी लिहोन. आपले लस्करचीं पत्रेंहि लवकरच येतील म्हणोन शामजीपंतीं लिहिलें आहे. नवाबानी कबिले बऱ्हाणपुरीं ठेऊन वजारतखान वगैरे मुतसदी कचेरी शहरास

---

१ सबंध पत्र बाळबोधींत हिंदी वळणाचें, ठळक, फाटेदार अक्षरांचें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रवाना करून आपण जरूरे होऊन नर्मदातीरास गेले म्हणोन शामजी गोविंद याणी लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होये. आपणाकडील वृत्त लिहिलें पाहिजे. हे विनंती.

¶Malhar Dadaji Barve writing to Chimaji Appa contradicts the news regarding the successes of the Moghul army. There was a battle, he further says, between the Imperialists and the Sardars in which the former sustained a defeat.

No. 29] *[21-4-1737*

श्रीवेंकटेश.

श्रीमंत सदायेशवंत धर्मपरायेण
राजश्री राऊ स्वामीजींचे सेवेसी

सेवक चरेणरज वेंकाजीराम सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल मु॥ जयेनगर ता॥ छ माहे जाणून येथास्थित असे. येथील वर्तमान तरी जयेनगरास दाखल व्हाववयंास रा॥ सवाईजी चालिले ते दिवसी मार्गी पर्जन्ये जाला, वारा सुटला, वीज पडून बैल १ व माणूस १ मेलें, यामुळें आंबेरीस राहिले. दो चौ रोजांत जयेनगरास येणार. रा॥ पंडितरायेजी बा॥ हुंड्या लक्ष रुपयाच्या. त्यापैकीं रा॥ सवाईजी बा॥ हुंडी पचवीस हजाराची आहे ते गंगाभागीरथी मातुश्री साहेबांची आहे. तो पैका सध्या घ्यावा व राजश्री राऊराजीयाबा॥ हुंडी पाऊण लाख रुपयाची आहे त्याचा वायेदा आखाडमासचा आहे. बजिनस हुंडिया व राजश्री येऊन पोंहचले असतील या पोंहचतील. सादतखान पूर्वेस गेला. दिलीस गेलियावर वकीलहाती अर्ज करविला जे, आपणास अगरें व गुजरात व मालवा व अजमेर च्यान्ही सुभे देणें. आपण गनीम येऊ देणार नाही यैसा मुचलका देतों. त्यास पातशाने जाब दिल्हा जे, खानदवरा आपण येक जालियावर उतर देऊं. म्हणून मोहगम उतर दिल्हे. त्यावर वाईट लागलें. खानदवराच्या चितांत हे गोष्ट नाही. दुसरें हें कर्म करावे तेव्हा रा॥ जयेसिंगास दुखवावें तरी हिंदु हिंदु येक न जा * * से होईल. दुसरे खानदवराचा याचा विचारहि येक आहे. यास्तव हे गोस्ट न जाली. त्यास खानदवरास सांगोन पाठविले जे, मागें लाग करून जाऊ. त्यास उत्तर दिल्हे जे कितीक लोक कमरदीखानाकडील जखमी व मारले गेले. बाहिर मागून आली नाही. उतावली केलियाने काये होणार. यैसें उतर प्रतिउतर जाले. यांच्या चितानरूप गोस्टहि न जाली. त्यावरून पूर्वेस गेले. बादेजबरसांत आपण येऊं यैसे सागोन उभयेतां (स) (सांगितले) उपर खानदवरा व कमरदीखानानी महमदखान बंगश यांस आपणा-

---

१ सडे. २ नंतर, बरसातीनंतर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कडे रवाना केले. तेहि आपल्या मार्गे येत असतां रा सवाईजीनी पत्र पाठविले जे, आपल्या मुलकांत जाता येता रा चे स्वारीमुले कांहीं राहिले नाही. मुल्क खराब केला. तुम्ही न येण्यामुले ते आगरियाच्या मार्गे चालिले आहेत. निजाम-नमुलुक बहुत दिवस कृत्रिम बुधीने बुऱ्हानपुरी बैसले आहेत ते स्वामीस विदित, पत्रें वरचेवर खेलवितात. त्यास आतां छ ११ तारखेस जिल्हेजी डेरादाखल होऊन चालिलें तेहि येताती. त्यांची धमक फारसी आहे येकदां तों स्वामीनी त्यांचे येश घेतले. जरी ऐवजखान दरम्यान नसता तरी विश्रांत केली असती. आतांहि फारा दिवसाचे जाले आहेत. मृत्य होत नाही. स्वामीचे हते मृत्य होणार यास्तव चालोन येतात! हिदुस्थानांत तो यैसा कोण्ही दिसत नाही की अगारी घेऊन स्वामीवर यावें. हे गोस्ट तों राहिली. आतां अमीरांच्या पातशांच्या चितात की कधीं जालें नाही तें जालें. आता निजामनमुळुक आलि-यावर युध तऱ्हीं करावें अगर येखादी मसलत करावी की कांहीं बंदोबस्त होये तो विचार पाहतात. उभयेता अमीर अलाहिरदीवरच[1] आहेत. रा सवाईजी-नीहि आपला मुनसी मुशखसचंद निजामाकडे पाठवावयाचा विचार केला आहे. तो आजीउदीया स्वार होणार. ताजा कलम. मुनसी तो निजामनमुलुकाकडे वाटे लाविला आणि आपली स्वारी आगरियाकडे चालली म्हणून रा सवाईजीनी रा राजामालजीस फौज समागमे दिल्ही. सुरजमल जाट व राणाजीची फौज देविचेंद समागमे देऊन चैत्र वदी चतुर्दसी वार आईतवार छ २७ जिल्हेजी रुकसत करून वाटे लविले. ते आगरियास ये * * * तिकडून महमदखान बंगस * * * च येतो. उभयेता आग * * तो * * * वरच आहेत. विशश काय लिहिणें. आम्हास रा सवाईजी आपणापासी ठेवित होते. त्यास स्वामीनी मलजी बरोबर दिल्हे. त्यास जाबस्वाल यांसीच आहे स्वामींची फौज त्या प्रांते आली. जावसाल तिकडेच पडला यास्तव आपण मलजीबरावर आहोंत. रा सवाईजी म्हणू लागले जे, जात असता रुकसत[2] करू. आपण त्यांस उतर दिल्हें जे, आपणास राजश्रीची आज्ञा नाही. जेव्हा आज्ञा होईल तेव्हा रुकसत होऊ. उतरप्रतिउतर मलजीस आहे. सर्वास भे हेच आहेत. याबदल समागमे चाललो. विशश काये लिहिणे. कृपा निरंतर असो दीजे हे विनंती. रा राजामलजीस आगरियाकडे रवाना चतुर्दसीस केले. अमावाशेस स्वार जाले. प्रतिपदेस मुा बुजेवर केला. आगरियाकडे येतात. खानदवरा महमदखान बंगश आपले वर्तमान आगरियास येताती म्हणून ऐकून आगरियास चालिले. महमदखान बंगश एक मजल पुढे चालतो.

---

१ A place near Delhi. २ निरोप.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मागें खानदवरा आहे पलवलेवर बेडलेवर आले आहेत. कमरदीखानहि मागे येक मजल येत आहेत. यैसिया प्रकारे चालले आहेत. निजामनमुळुकहि येत आहेत, कमरदीखान सेरीर संमधीहि होणार, भेटीहि होणे आणि कितीक कार्येभाग बंदोबस्त करणे. पातशाची लिहिलीयावर लिहिली जातात, यास्तव येतात. यास्तव रा। सवाईजीनीहि आपली फौज देऊन राजामलास पाठविले. आवघे आगरियांत संगम होईल. जयेनगरी सोनार कारेगार आहे त्याचे नांव रुपा. आणखी संगती तिघेजण आहेत. बहुत कारेगर आहेत. त्यास मिनाकारी काम कुवत्फ व जडाव व साधा काम हिंदुस्थानी व कलेचे काम यैसे की सुरईदार पात्र पुढे ठेवावें, त्याने कारंजे आपणच उडावे. दुसरे काम पुतलीचे हाती पानदान द्यावे तिने मजलसेत विडे वाटांवे. विडे सरलियावर आपणाजवल यावे. मागती विडे पानदानात घालावे, मागती तिने मजलसतींत वाटावें. येक पुतली यैसी की पलंगाजवळ ठेवावी तिने घडियाळ वाजवावे. दिवस रात्र घटका जाली म्हणजे वाजवावें. तिजला येकदाच कल करून देतात. अखंड घड्याल वाजवील. या वेगलेहि आणखी कळेचे काम आज्ञा करतील तेणप्रमाणे करू म्हणून करार केला. कारेगरी बहुत प्रकारे करून स्वामी आपणावर संतोसी होऊन कृपा करतील यैसी चाकरी करू म्हणतात. काम देखून मेहरबान होऊन देतील त्यास राजी अगर चाकर ठेवितील त्यास राजी आहेत. यैसियास त्यानी अर्ज दाटून येऊन केला म्हणून विनंती लिहिली. जरी सरकारांत दरकार असलिया त्यास कौल रुपया वगैरे माणसे च्यार येणप्रमाणे लेहून पाठवावा. आपण येतासमागमे घेऊन येऊं. यास जैसी आज्ञा होईल, तेणप्रमाणे वर्तणू (क) करतील. हे विनंती. इकडे धारण रुपयास आठ सेर, नव सेर गवत भारा रुा. १।. प्रमाणे आहे. सेवेसी श्रृत जाले पाा हे विनंती. राणाजीची फौज फिरोन गेली. यांचे आगरे म्हणून हे आले.

¶*This important letter from Venkaji Ram, the Peshwa's envoy with Sawai Jaysing, reveals the currents and undercurrents of Delhi politics. Sadatkhan, leader of the party intent on opposing Maratha encroachments, proposed that the subhas of Malwa, Agra, Gujarat and Ajmir be made over to him, for which he would accept the responsibility of driving out the intruders. Khan Dauran and Jaysing thought drastic measures useless and advocated a conciliatory policy. Disgusted with the attitude of his opponents, Sadatkhan retired to his subha of Oudh. "Kamardikhan and Khan Dauran," says the writer, "are encamped upon Alavardi and have asked Sawai Jaysing to join them immediately." "Everything," the letter concludes, "hinges on the arrival of the Nizam, who will decide whether it is to be peace or war with the Marathas. The writer also recommends to Bajirao for employment an artist from Jaypur working in gold and executing several curious articles of common use.*

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

No. 30] [पाो *26-4-1737 ?*

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री राऊ स्वामींचे सेवेसी

विनंती. राजश्री भीवेराऊ[1] येमुना उतरले हे वर्तमान दिलीस गेलियावर सादतखानानी पातशाहाचा निरोप घेऊन याजवर आला आहे व अभयसिग यानीही आपल्या मुलकास जावयासी निरोप घेतला. आपल्या देसास येतील. मोगलियाची गुंज[2] फुटली. येक कमर्दीखान मात्र तेथे आहेत. खानदौरा व जयेसिंग येकचिते आहेत. सार्वभोमाचीहि कृपा याजवर आहे. अभयेसिंग दिलीहून अलीकडे आलियावर त्याची आमची भेट होईल म्हणून लिहिले, येसीयासी स्वामीचे हास्त गालीब[3] आहेत. जे स्वामीच्या मनसबियासी अनिष्ट इछितील ते दरिद्रमनोरथ[4] होतील. मोगल्याची गुज फुटली हेहि उतमच जाहाले. पुढे स्वामीची जबरदस्ती ते प्रांती पूर्ण आहेच. यामुले सार्वभोमाचे सर्व सामादिक स्वामीपासून गौरव इछितात. पुढे सर्व स्वामीपासी रुजू होऊन आपले मर्जीमोफक[5] वर्ततील. श्रीकृपेने वडिलाच्या आसीर्वादेकरून स्वामी जो मनसबा करितील तो सिधीस जाईल यैसे आहे. विदित जाहाले पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji to Bajirao : congratulates the latter on his strong action at Delhi.*

No. 31] [*26-4-1737*

छ १९ मोहरम

(जावसूद)

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक बालाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत वैशाख शुध ७ सप्तमी परयेत स्वामीचे कृपाद्रिस्टी ठाणे उदिरखेडा सुखरूप असो. यानंतर पूर्वी सेवेसी पत्रे बातमीची श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीकडील पाठविली

---

१ (?) २ गुंज—जमाव. ३ गालिब=बळकट, जोरावर, वरचढ. ४ भग्नमनोरथ. ५ मर्जीप्रमाणें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होती. येसियास प्रस्तुत शहरीहून आजी बातमीची पत्रे आली की सावकाऱ्यामधे बऱ्हाणपुरी खबर तर्हकीक[1] आली आहे की भदावर शहरयाची अटेरीस युध्य थोर जाले. अमित्रांचा मोड जाला. श्रीमंताचा जये जाला. लस्कर अभेर[2] जाले. तेथून लस्करसहवर्तमान फिरोन सिरोजेवर श्रीमंताचा मुकाम जाला आहे म्हणोन वर्तमान आले आहे. सेवेसी कळावे म्हणोन लिहिले असे. आजम नवाव निजामनमुलुक रेवातीरी दक्षणभागी मकडाई प्रांतेच सेनासहवर्तमान स्थिरतेनेंच आहेत. बहुतसा चलचलावे नजरेस येत नाही. खानदेशांत तोफ आली होती ते गेली. बराणपुरी दाखल जाली. गोविंद सिधेश्वर याणे कुसुंबाचे खले जालिले. उसाच्या घाणियां माल सुधा जालिल्या आणि लुटून नेल्या. खराबीवर उठला आहे. बंधारा फोडावा यैसा निश्चये जाला. सरदेशमुखीचा गुमास्ता कैद करणार होता, परंतु गुमास्ता पलोन आम्हाकडे आला. आजीतागाईत कुसुंबाचा मोकासबाबेचा येक रुपया वसूल नाहीं. त्याच्या तालुकियांत रुपया खावंदाचा घेणे आला. आज्ञा करणार खावंद समर्थ आहेत. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶Balaji Bhimaji to Chimaji Appa, describing a battle between Bajirao and the Imperialists in which the latter were completely repulsed. The plundering activities of Govind Sidheshwar and the activities of Nizam-ul-mulk are further described by the writer.

[पो *29-4-1737*

No. 32]

छ ९ मोहरम

श्री

सेवेशी विज्ञापना. रा रूपरायासमागमे रा राणोजी भोसले व राणबाकडील व मल्हारबाकडील देवजी हंबीर बुनगियात आहेत ते कुल देऊन व बुंधेल्याची फौज देऊन अंतरवेदीत रवाना आज्ञेप्रमाणे करणे म्हणून आज्ञा. ऐशास वडिलांचे आज्ञेप्रमाणे बुंधेल्यास सांगोन त्यांची दोन हजार फौज व आम्हाकडील राा राणोजी भोसले यांजकडील रा रावो गोविंदचे सवासे स्वार व राा तुकोजी पवार व येध्याजी सतकर व धालवडे वगैरे मिळोन दोन अडीचसे स्वार ऐसे राा गोविंद बलाळ यासमागमे देऊन रवानगी केली त्यास आजी पंधरा रोज जाहले. हे सविस्तर वर्तमान मुजरद कासीद अजुरदार करून वडिलांकडे पाठविले ते पावले नसतील. अलाकडे रूपरायाचे पत्रहि आले कीं आपण

---

१ खरी. २ श्रीमंत, तृप्त.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यमुनापार होऊन आपल्या देशास आलों आहों. आपले वारीसदार आहेत ते फिसात[1] करितात. त्यांचेही पारपत्य होणे ते होईल. राऊसाहेबाची कृपा आपले मस्तकीं असतां कांही चिंता नाहीं. पुढें होईल वृत्त तें लेहून पाठऊं म्हणून त्याचे पत्र आलें. राा मल्हारबा व राणबा व यसवतराऊ पवार याजकडील राऊत पाठवावयाविसीं सांगितले, परंतु त्यास अनुकुल पडले नाहीं. मग जे जाहले ते रवाना केले. तिकडून राा गोविंद बलाळ व राा रुपराऊ याणी पत्रे स्वामीस लिहिलीं असतील त्यावरून अंतरवेदीचे वर्तमान विदित होईल. शेवेसी श्रुत जाले पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Baji Bhivrao informs Bajirao of the despatch of an expedition into the territory beyond the Jumna, under Govind Ballal and others.*

No. 33] [*April 1737 ?*

श्रीभवनीशंकर

श्रीमंत सकलगुणालंकरण विद्वजनमंडण धर्ममूर्तिपरायेण गोद्विजप्रतिपालन अखंडितलक्ष्मीप्रसन माहाराजाधिराज राजश्री रावसाहेबाचे सेवेसी

सेवक आनंद यादव कृतानेक नमस्कार. येथील क्षेम जानऊन स्वकुशल-लेखन सनाथ केले पाहिजे. यानंतर कृपापत्रे कासिदाबराबर पाठविली ते पावोन संतोश जाला. राजे बख्तमलजीस खत लिहिले ते आपन त्याहास पावत केल तेहि अम्हादेखता वाचिले आनि इबारतखताची मजेमून[2] पाहून बहुत खुशवख्त जाले आनि आम्ही सूचना केली की, हे खत निदानच आहे. ज्याकारण तुम्ही मवकूफ केले होते, ते ते सर्व तुम्हास लिहिले आहे. मुख्यासी जो विचार करण तो करून, बहुताप्रकार बोध करून, काम कु र सि नि सी करून जाब लिहून द्या. त्यास म्हनो लागलेत की प्रहर येक दिवस राहातां आपन मुख्यापासी जाऊन येकांत जाबस्वाल करू. यैसा करार करून सावटिका दिवस राहता गेले व यादगारखान पाच सात दिवस अमीरुलअमरावजीचे लस्करात होते तेहि आलेत. मुख्याची भेटी घेतली न कले की काये जावसाल जाला. त्याच रात्रीस आपण राज्याजीचे भेटीस गेलो आनि जाबसाल काये जाला हे विचारिले. त्यास उतर दिधले की, आपन जाबसाल करीत होतो की यादगरखान आलेत. रावाचे खत बजिनस[3] बकसीजीपासी पाठविले व यादगारखान तेच दिवशी काय जाबसाल होते ते मुख्यासी करून, रुकसत होऊन, बकसीजीपासी गेलेत. राजियाही

---

१ बंडावा, फितुरी, कलह. २ मजकूर. ३ हुबेहुब, खुद्द.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उतर दिधले की, त्याजपासून उतर आलियावरी जाब देऊ. त्यास रोज तीन जालेत की जाब आला नाही म्हनतात. पाचसात कोस लस्कर बकसिजींचे आहे. त्याचा भेद कलत नाही. आम्ही पुरजा[1] लिहिला होता की मा‍ा राजश्री रावजीची मानसे जाब मागतात. त्यास त्याही पुरजियावरी दसखत केले की जाब आला नाही. तोहि पुरजा बजिनस सेवेसी पाठविला असे. नकारपूर्वक नरमदा उतरून चार मजली आला, याकरिता याचे चितात काये आहे ईस्वर जाने ! नाहीतरी माहाराजासारिखा सरदार याचे हाती लागला असता हे अरकान[2] कदर जानत नाहीत. बगसास आगरियासी पाठविले आहे आनि हजुरीहून मबलग दिधले. बाकी आगरियासी पावलियावरी देऊ केले आहेत. राजश्री सिवरामपंताचे कागदावरून कलो येईल की सिवरामपंत येथ आम्हापासी होते, त्यास ते राजश्री यादोरावजीचे संगतीस तरबियेत जालेत, त्यास आगडबागड[3] पाहिजे. आम्हास तरी प्रमाण असालिया आमची शरम[4] राहे. आजिपरियेंत ईस्वरजीन निर्वाह केला. हली माहाराजाची कास धरिली त्यास आमचे अद्रुष्टीं येश येनार असल तरी येईल. माहाराज भाग्यवान आहेत. याचा तरी येसा प्रसंग आहे. राजे बखतमलजीस जाब खताचा मागितला. हे जाब देता अनमान करू लागले. मग येकांती खिलवतेमधे पुसले की जाब का देत नाही ? त्यास म्हनो लागले की या दिवसात खतपत्र मुंफसल[5] लिहिन मुनासीब[6] नाही. जो पावेतो नकारपूर्वक येत नाही तोपावेतो कांही कामकाज होत नाही येसा जाब दिधला. मग बजिदी करून जाब लिहून घेतला तो पाठविला आहे. यामधेहि अम्हावरी हवाला घालून लिहिले आहे. मुख्ये आधीच तरी हे विल्हेवाले करीत होतेत. आता नकारपूर्वकाचा बाहना यासी जाला येसे वर्तमान आहे व माहाराज तरी याचे भरवसियावरी होते. हिंदुस्तानी दुसरे खातरी लोक आहेत व कशमेरियासी जाऊन भेटलो. तो तरी आपलाच रड रडत होता की कोन कोने रीतीन याच्या कामास कुरसी बसविले होते ? आनि याही आपले काम आपन खोविले. अता तरी दक्षनेचा सुभेदार आला आहे, तो आलियावरी मग काये होन ते होईल येसे म्हनत होतां. रोहिले (राहिले ?) नकारपूर्वकाचा लेक गाजुदीखान हजुरामधे आहे, वजिराचा जावाई आहे. यान्हे कबूल केल आहे की जर आपले नांव खत ये तरी आपन नकारपूर्वकास बजीद होऊन रावाचे कामकाजाची कुरसीनसी करून, येसे पूर्वी वजिराचे भरवसियावरी म्हनत होता व वजिरासी गोस्टमांतहि केली होती. मधे सवाईरामनामे फकीर हिंदू आहे.

---

१ पत्र. २ दौलत ? ३ (?) ४ प्रतिष्ठा
५ सविस्तर. ६ रास्त. ७ जाबसाल.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बख्तमलजी वगैरे हिंदू मानितात व मुसलमानहि वजीर खानदोरा याचे घरी कधीकधी जातो तेहि मानितात. येकप्रकारी स्वामीजी श्रीवारानसीमधे राहतात, त्याचा सिश म्हनवितो. याकरिताच रा। धोंडाजीपतास भेटला व माहाराजाचे कामकाजाबा। बहुत खातरखुद करितो. वजिराचे जाबस्वालामधे व गाजुदीखानाचे जावस्वाल याचे मा। आहेत. परंतु आपन माहाराजाचे मरजीस कागदापत्रावरून वाकीफ होतो की अदियापहि बखतमलजीस खतपत्र येत तऱ्ही अमिरुल अमरायेजीचे हस्ते जोबाब[१] करा येसे लिहिता. याकरिता आपन कधीही हा प्रसंग न लिहिला. हाली नकारपूर्वक आहेत व गाजुदीखान त्याचा लेक व वजिराचा जावाई आहे. जर चितास येईल तरी सिष्टाई स्नेह करीता गायबाना[२] सवाईरामाचे लिहिल्यावरून कद्र आले येसे चितास आलिया लिहीन. आपन सहजामधे लिहिले आहे. आमचे नाव काही न लिहिन. जर नकारपूर्वकासी जावस्वाल असेल तरी यास सिष्टाई मात्र पत्र लिहीन. मनास न येईल तरी न लिहीन. दुसरे छावनी कोठ करावी काही मनोगत मजला चितास आलिया लिहीन. मजला आपले शुभचिंतकात जानिजे. नकारपूर्वक ये (तो करितां सर्व) लहानथोरास वसवासा[३] जाला आहे. कोन्ही म्हनतात की मुख्याची आजी बाहादुरशाह पादशाहजीचा महाल तिची मा। आहे. तिन्हे मुख्यास सांगून बलाविले. कोन्ही म्हनतात की सकारियाने सलाह करून स्नेह करून बलाविले आहे. कोन्ही काही कोन्ही काही म्हनतात. हजूर आलियावरी काये प्रसंग होतील ते लिहिले जातील. सवाईरामहि येसा शाहना वितपन[४] आहे. स्वामीजीचा सिश म्हनवितो. जावस्वाल हिंदवी फारसीमधे अमीराचे सागती योग्ये आहे याकरिता लिहिले आहे. सिष्ट जानून मरजी असलिया यासी पत्र लिहीन. नाहीतरी न लिहीन. त्याचे मतलबाचा जाब पाठविने. हे विनंती.

¶ *Anand Yadav to Bajirao, reporting the attitude of Sawai Jaysing and (his agent ?) Bakhatmal towards Bajirao's demands about Malwa. The letter gives important details and mentions Nizam as having crossed the Nerbudda, i.e., during the summer of 1737.*

No. 34] [*April 1737 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीची आज्ञा कीं, वोडसें, दतिया, बुंधलखंड हा मुलूक कौली[५] आहे. यास उपसर्ग येकजरा[६] लागो न देणें. आज्ञेप्रमाणें ताकीद करून

---

१ जबाब. २ अपरोक्ष = पाठीमागें. ३ संशय.
४ व्युत्पन्न, धूर्त, दूरदर्शी. ५ कौल दिलेला, सरकारी. ६ थोडा सुद्धां.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
उपद्रव लागो न देतां दतिया वोडशाचा मुलूक उजवा घालून सरहदेनं आलों. वोडशाचा व दतियाचा वगैरे जागांचा पैका सुरोजेस पाठवावयाची आज्ञा स्वामीची जाहाली होती. संस्थानास कारकूनहि पाठविले. त्यास वर्तमान मनास आणितां कोठूनहि पैका सुरोजेस गेला नाहीं. कारकून पाठविले त्यांची पत्रें आली कीं, याजकडील पैका लौकर येत नाहीं. अंतरवेदींत फौज गेली होती, तिची व सादतखानासीं गाठ पडिली, लडाई, जाहाली, ते समई मोड जाहाला. सादतखान फौजेनसीं आगऱ्यास आले. श्रीमंत सडे फौजेनसीं गेले. वरकड माघारें बुनगे लाविले. यैशां नाना प्रकारच्या खबरा येतात त्यावरून हे विचारावरी आहेत. समजावीस मात्र करितात म्हणोन वर्तमान आलें. त्यास रजवाडियांची जे रीत आहे ते विदितच आहे. मार्नेमार्ग[1] कैसा पडतो हे पाहावे हे रीतच आहे. त्यास आम्ही आल्यावरी त्यास बहुतच दबाऊन लिहिलें कीं तुम्ही नेमाप्रमाणें पैका सुरोजेस पाठविला नाहीं हें वर्तमान श्रीमंतांस विदित जाहालें. त्यावरून आम्हास आज्ञा केली आहे कीं, तुम्ही आपले व बुंदेल्यांचे फौजेनसीं मुलकांत जाऊन बेमुलाहिजा पैका घेणें. त्यावरून त्यांच्याहि चितांत आलें कीं, पैका न देतां गत्य नाहीं. सुरोजेस पाठवा म्हणावें तरी त्याचे वस्तु निभाव नव्हे. दिवसगत लावितील, पाठवणार नाहीं, याकरितां पैका आम्हाजवळ पाठवणे म्हणून लिहून पाठविलें. त्यावरी दतियाचे रुपये रामाजीपंत घेऊन आम्हाजवल आलें. त्याकडील पैका येणें त्यापैकीं कांहीं सोड मोकल करून द्यावी म्हणून बहुतच रदबदल केली. परंतु आम्ही परिछिन्न सांगितलें की, आज्ञेविना येक रुपया सोडवत नाहीं. तुम्हास आपला मुलूक वाचवणें असेल तरी झाडियानसीं पैका आणून देणे. त्यावरून दतियेकराचा पैका सारा आला. च्यार पांच हजार रुपये बाकी राहिली आहे तेहि देतील. तैसेच वोडसेकरहि रदबदल करीत होते. त्यांसहि साफ जाब सांगितला. त्यांकडे अडीच लाख रुपये यावे, त्यापैकीं दीड लाख रुपये आणून दिल्हे. बाकी येक लाख राहिले आहेत त्यांविशीं ताकीद करणें ते केलीच आहे. आणितील तेव्हा घेऊन. दतियेकर रा। रंगोपंत व रामाजीपंत समागमेंच आहेत. वोडसेकर गणेशपंतहि आहेत. जालें वर्तमान सेवेसी विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. दतिया वोडसें येथील पैका सुरोजेस पाठवावयाचा निभाव आपणाच्याने होईना, यैसें सांगोन पाठविलें, त्यावरून जरूरास पैका येथें आणवावा लागला. विदित जाहालें पाहिजे. शेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The writer, probably Baji Bhivrao, writing to Bajirao, mentions that the Chiefs of Datia and Orchha hesitated to make payment of dues for a long time and that the writer compelled them to satisfy the Maratha demands.*

१. संधी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 35] [April 1737 ?

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीचे आज्ञेप्रमाणे राजश्री जगतराज याजकडे जाऊन सविस्तर वर्तमान सांगितलें कीं श्रीमंताची आज्ञा त्वरेने यावयाची जाहली आहे. तरी कूच करून जावें. दिरंग लावतां कार्यास येत नाहीं ऐसें म्हटल्यावरी त्याहीं उत्तर दिलें कीं या दिवसांत बुनगे माघारे बोलाविलें हें काय निमित्य ? एक वेळ तिकडून येता काय हवाल जाहाले, खल्या काय, खोचरे काय, उष्णाचे दिवस, चोरांचे भय, इतके असतां त्यांचे कृपेकडून येथपर्यंत सुखरूप आलों. आतां फिरोन जाईन म्हणतां ज्यामार्गे आलों त्यामार्गे जावयास वैरण मिळणार नाहीं. धान्य न मिळे. इतकेही असोन श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें जावें उचित. परंतु त्याहीं बोलवितां आम्हास व रा। हिरदेसायांस बोलाविलें. त्यास ते तो मोहूस आहेत त्यांजकडे पत्रें व भला माणूस बोलाऊ पाठवावा लागतो. ते आलियावरी त्याचे विचारे जावयाचें करावें. दुसरे, रा। भारतीचंद लष्करांत आले होते. ते राऊ साहेबांस दखल आहेत. त्यास बरें वाटत नव्हतें, ते मृत्य पावले. ते दिलगिरी जाहली आहे. वैशाख शुा। १४ चर्तुदशीस शुधता होते तो पावेतो आपणास कूच करिता येत नाहीं. शुधता जाल्यावरी रा। हिरदेसाहहि बोलाऊ पाठवितों. ते येतील तो राऊसाहेबास पत्रे लेहून पाठवितों. तेथून आज्ञा येईल तदनुरूप विचार कर्तव्य तो केला जाइल ऐसे बहुतच बोलिले. त्यास आम्ही जे जे रीतीनें सांगावयाचें ते सांगितलें कीं श्रीमंताची आज्ञा त्वरेने यावयाची असतां गुंतोन राहतां नये. परंतु मोठा अडथळा त्यास भारतीचंद याचा जाला आहे. यास इलाज नाहीं. प्रस्तुत त्याहीं रा। हिरदेसाहजी यासहि पत्रें पाठविली आहेत कीं तुम्ही लवकर येणें. राऊ साहबांचे आज्ञेप्रमाणें जावे लागतें ऐसें लिहिलें आहे. परं(तु) या बुंदेल्याची स्थिरता कोणे विचाराची आहे ते विदितच आहे. त्यास यावयास किती दिवस लागतील न कले. याचा विचार या प्रकारचा आहे. आम्ही स्वामीचे आज्ञेप्रमाणे ते क्षणी स्वार होऊन यावें तरी येथून ज्या मार्गे आलों त्या मार्ग गोहदच्या मुकामास यावयास दहा बारा मजली आहेत. मार्गी खल्या; रान मवासाचें; तिकडुन येतां समागमे बुधेल्यांची फौज; दिवसाचे चालता जेथें अडचण होती तेथे ठाई ठाई चौक्या ठेवीत होतों, रात्रीस आम्हाकडील प्यादे व त्यांजकडील बरखंदाज आणून चौक्या बैसऊन चौकशी करीत होतो. तरी चोरट्यांचा उपद्र्याप सामान्य जाहला नव्हता, परंतु स्वामीच्या पुण्यप्रतापें हा काल संरक्षण करून आहों. ज्यामार्गे यावें तो मुलुक एकाची सरद आहे ऐसे नाहीं. वोडसे, दतीया, भदावर, बुधेले इतक्यांचा मुलुक. तद्

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ठार गेले त्याविसीं सांगोन आणवणे म्हटले तरी एक आगास लाऊ न देई, ऐसा हा मुलुक ! यामध्यें बुंदेल्यांची फौज टाकून यावें तरी निभाव इतक्या बुनग्याचा कैसा होतो ? बुदेल्यांची फौज समागमें होती त्यामुळें भारदारीनें चालले. आम्हाबराबर फौज म्हणावयास एक रा राणोजी भोसले कोठे जामदारीस अगर कामकाजास पाठवावयास व समागमे चालवावयास इतकेच, आणखी घोडे म्हटले तरी लष्करांत बहुतच आहे. परंतु कोठें पाठवावयास व समागमें चालावयास कोण्ही नाहीं ऐसा प्रसंग आहे. जरी मार्गाचे सुगम निभाव होईसा असता तरी बुंदेले मागाहून येते. आम्ही यांस टाकून पुढेंच येतों. निभाव नव्हे यास्तव यास टाकून येतां नये. चारिंदे जाहले आहे. त्याहीमध्यें स्वामीची आज्ञा कीं उभयता समागमे घेऊन येणे. त्यावरून टाकून येता नये. यामध्ये स्वामी आज्ञा करतील ते प्रमाण. राा जगतराज याणी पत्र पाठविले आहे, त्याणी लिहिले असेल. त्यावरून श्रुत होईल. सेवेसी विदित होय. हे विज्ञापना.

¶*In this and the following letter Baji Bhivrao gives Bajirao full details of the activity of Chhatrasal Bundela's two sons, Hirdesa and Jagatraj. The dates of these letters cannot be finally fixed, until further light is obtained on the incidents referred to.*

No. 36] [*3-5-1737 ?*

छ १३ मोहरम.

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री हिरदेसा व जगतराज यांस फौजसुधां समागमे घेऊन यावयाची आज्ञा. ऐशास राा हीरदेसा तों मोहूस आहेत राा जगतराज हजार दोनहजार व सभासिंग पाचसाशे स्वरानसी आम्हाजवळ आहेत. हिमतराऊ मागें आपल्या मुलकांत राहिले. उभयतांचा जमाव बहुतेक फुटोन जागां गेला. यांचा विचार ऐसा दिसतो कीं राा हीरदेसा यांस बोलाऊ पाठविले आहे ते येतील तेव्हां त्यांचे आपले विचारे जे मसलहत ठराव होईल ते करावी. मावारे यावयाचे मानस कांहीं दिसत नाहीं. हा विचार आम्ही आपले जागा करीत होतो त्यास आजीच राजश्री रायेराया सदानंद डेन्यास आले. त्यांनी अंतस्थ यांचे वर्तमान सांगितलें की याच्या चितांत मघारे जावयाचें नाहीं. जमाव फुटला. हिरदेसा यास बोलाऊ राा महासिंग पाठविले आहेत ते कधीं येतील तेव्हां जगतराज हे मिळोन विचार करतील. आधीं तो जाणे जरूर होईल. त्याहीमध्यें जरूरीस जावयाचा विचार केलाच तरी मागती फौज जमा करतील. फार जमा जाली

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तरी दोन हजारपर्यंत माघारी जावयास निभावली तरी नकळे ऐसा विचार याचा आहे म्हणून सांगितलें. त्यावरून आमच्या विचारास व याच्या सांगण्यास गाठ पडली ऐसा याचा विचार दिसोन न आला. जरी धामोणीकडे जाणे होते, तरी बराबर आहेत हे येऊन निभाव करीतेच. मावारे म्हणता घाबिरे जाले आहेत. हे वृत्त सेवेसी श्रुत व्हावे म्हणून लिहिले असे. हे विज्ञापना.

No. 37] [2-5-1737

श्रीरामवरद

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

सेवेसी सेवक कृष्णाजी सिवदेऊ कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील क्षेम ता। वैशाक सुध चतुर्दशी मुकाम औरंगाबाज सुखरूप असों. श्रीमंत स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालो, ते पुणियास आलों. राजश्री अंतोबाची भेटी घेतली. त्यांणीं वर्तमान सांगितलें कीं ज्या कार्यास तुम्हास रवाना केले आहे, तो पैका येऊन पोहोचला. परंतु तुम्ही बऱ्हाणपुरास जाणे. आणखी ऐवज आला असेल तो घेऊन येणे. त्यावरून आपण औरंगाबादेस पोहोचलों. पुढें राजश्री राघोपंताची भेटी घेतली. सविस्तर वर्तमान त्यास निवेदन केले. उदयेक स्वार होऊन बऱ्हाणपुरास जातो. राजकी वर्तमान तर राजश्री राघोपंती वर्तमान सागितलें कीं, राजश्री पंतप्रधान याणी राजश्री राणोजी सिंदे व मल्हारजी होळकर आणिखी फौजा दिलीवर रवाणा करून चार पाच पुरे जाळून टाकिले. फौज दिलीहून युध्यास सात पाच हजार निघाली. युध्य वहुत जाहले. दोघे मातबर सरदार जिवेच मारिले. पाच सात हती व दोन तीन हजार घोडे हातीं लागले. येस घेऊन फौजेत दाखल जाले. येसे वर्तमान सावकारी आहे. निजामनमलुक रेवातीरी आहे. पार होऊन जाणार आहे. बऱ्हाणपुरास गेलियावर तथ्य वर्तमान सेवेसी लिहून पाठवीन. लस्कर सुखरूप आहे, समर्थाचे पुण्य विशेष आहे. येस घेऊन श्रीमंत येतात यास संदेह नाहीं. सेवेसी विज्ञाप्ति.

¶Krishnaji Shivdev writes to Chimaji Appa news of Bajirao's attack on Delhi and his subsequent encounter with the imperial forces at Talkatora on 29th March 1737.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 38]   [*3-5-1737*

छ १३ मोहरम

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलांचे

सेवेसी

अपत्यें जनार्दनाने साष्टांग नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ ८ मोहरम मुकाम कोठरानजीक गंजघाट नदी धसाण, वडिलांचे आसीर्वादेंकडून येथास्थित असे विशेष. वडिली आसीर्वादपत्र छ २९ जिल्हेज सोमावलीचे मुकामीचें पाठविलें तें छ ६ मोहरमीं पावलें. कुशलार्थश्रवणें संतोषावाप्ति जाहाली. तुम्हीं रहिलीकडे गेलेससे उडतें वर्तमान कललें, त्याजवरून न येणें म्हणून लिहिलें होतें. यैशास तुम्हीं रहिलीस कैशास जाल? आलीकडेच असाल, लौकर येणें. राजश्री हिरदेसाह व जगतराज बराबर घेऊन येणें म्हणून * * * * * * * न पाठविली होती कीं आम्ही पांढार कोच सैदाच्या कोठड्यावरून धामोणीच्या रोखें जात आहो. वडिलाची आज्ञा ये तावत्काल कधीं कूच कधी मुकाम करून वैरण पाणी पाहून चालत आहो. त्यास आमचे पत्र येकहि प्रविष्ट जाहालें नाहींसें वडिलाच्या पत्रावरून कलों आलें. 'रहिलीकडे गेला असिला तरी न येणें' हे पत्र आम्हांस पावलेंच नाहीं. हाली आज्ञा की उभयेता राज्यास समागमें घेऊन सत्वर येणें म्हणून, त्यावरून राजश्री विसाजीपंतास राा जगतराज यांकडे पाठविले होते. त्यांची बोली चाली जाहाली ते सविस्तर माारनिलेच्या पत्रावरून विदित होईल. राा हिरदेसाई तो मोहुसच आहेत. जगतराज आपल्या जमावानसी व सभासिंग पाचसांतशानसी आम्हाजवल आहेत * * राा विसाजीपंताच्या लिहिल्या * * * त होईल तदनरूप जे आज्ञा होईल तैशी वर्तणूक करून. शेवेसी शृत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardan (?) acknowledges receipt of the letter, written by the Peshwa, in which he was asked to come soon with the Bundele Rajas.*

No. 39]   [*4-5-1737*

पौ छ २९ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री चिमणाजी पंडित

गोसावी यांसी

विनंती उपरी. प्रत्योत्तर पाठविलें तेथें 'नवाब उत्तर प्रांतीं जात आहे त्यास पायबंद द्यावयापेक्षां दुसरा मनसबा अधिकोत्तर आहे असें नाहीं. येथील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बंदोबस्ती करून लवकरीच वरते येत आहों, तवपर्यंत फौजाची तयारी राजश्री स्वामीस पुसोन करविली पाहिजे' म्हणून विस्तारें लिहिलें तें कळों आलें, अशास आम्हाकडील फौज तों तयारच आहे. परंतु राजश्री बाजीराव प्रधान यांकडील वर्तमान येथें आम्हास कांहीं कळत नाहीं. तुम्हाकडे तेथील वर्तमान वरचेवरी आद्यंत येत असेल, परंतु कांहीं आपण लिहून पाठवीत नाहीं. तर येविशीचा वृतांत विस्तारें लिहावा. खालील बंदोबस्ती करून वरते येतों म्हणऊन, तरी तेथील बंदोबस्तीचा विचार कसा काय आहे? पर्जन्याचे दिवस आले. फिरंगियाचा स्नेह संपादून वरते येणार किंवा निक्रेष[१] करून दिनप्रतीनिं मोर्चे चालऊन स्थलें काईम करणार हा अर्थ लिहिला पाहिजे. राजश्री छ १४ मोहरमी श्रीचें दर्शनास सडेस्वारीनें गेले. चवदावें रोजीं फिरोन येतील. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हें विनंती.

¶*The writer asks Chimaji Appa to supply him news both as regards his own campaign against the Portuguese and Bajirao's campaign in the North.*

No. 40] [*10-5-1737*

छ २७ मोहरम

श्रीरमावर

श्रीमंत राजेश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक रंगो शंकर व आबाजी गोपाळ सां नमस्कार विनंती. ताा छ २० मोहरम पावेतो मो सिरोंजे सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. इकडील सविस्तर प्रतिपत्री सेवेसी लिहित गेलो. प्रस्तुत नवाब निजामनमुलुक काा मजकुरी मो आहेत. स्वामीचे आगमन कोणे मार्गे होतो हे पाहतात. पुढे जो विचार होईल ते पावे. यार[२]महमदखान याजकडील वर्तमान तर प्रस्तुत याजवा आहेत. पुढे कोठवर घेऊन जातील ते पावे. रुपयाचा मजकूर तर पहिला वाइदा दिला. त्याउपरी येक रुपया दिला नाही. आम्ही बहुताप्रकारे अतिशये केला, परंतु देऊ मात्र म्हणतात. स्वामीचे आगमन या प्रांते जालियावर जे होणे ते होईल. प्रस्तुत रुपया देत नाहीत. वरकड सविस्तर पत्री लिहिता पुर्वत नाही. भेटीनंतर सेवेसी निवेदन होईल. मुलकात तमाम अमल बिघडला.

---

१ निकर्ष. २ भोपाळचा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सेवेसी श्रुत होये. सिरोजचे वर्तमान राजश्री आपाजीपंती व त्रिंबकपंती लिहिले आहे त्यावरून सेवेसी निवेदन होईल. पा। शाजापुर येथील वर्तमान तऱ्ही शहर टाकून निघाले. उजनीकडे गेले. येक दोन माणसे मारली गेली. वहुत नुकसान जाले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Rango Shankar and Abaji Gopal inform Bajirao that the Nizam, having encamped at Sironj, was watching the movements of the addressee.*

No. 41] [*12-5-1737*

श्री

श्रीमंत राजश्री साहेब

अर्जदास्त अर्जदार बंदेगीबंदेकमीन कमतरीन बंदेशाह खेमामिरधे रामराम विनंती विज्ञापना. येथील क्षेम तागाईत वैशाख वद्य ९ गुरुवासर द्वितीय प्रहर साहेबाचे नेक नजरें करून खानाजादाचें वृत्त येथास्थित असें. विनंती. सांप्रत येथील वर्तमान तरी शहरचा व किल्ल्याचा बंदोबस्त तरतूद आपले जागां सावधानी फार करितात. तमाम सेकावत वगैरें ठाकर लोकांस श्रीजींनीं आज्ञा केली कीं बाहेर तुम्ही न राहणें, शहरांत येऊन राहणें. त्यास कितेक लोक शहरापासून लांब होते ते शहरांत न गेले. कितेकांनीं कोटानजीक डेरे देऊन राहिले आहेत. सेकावतांनीं डेरे उपडले नाहीं. श्रीजींनीं अर्जी केली कीं आम्हास सागानेर अथवा अमेर व जयेपूर या तिही किल्ल्यांतून येक जागा सतंतर आमच्या हवालें करणें म्हणजे साहेबचाकरीस बहुत सावध राहून बंदोबस्ती करुं; या प्रकारें विनंती केली. चादपोवल तागाईत सुरजपोवलपरियेंत बुरूज साठ आहेत. दर बुरुजावर तोफ येक येक चढवि(ली)ले आहेत. ठाकर लोक यांचे डेरे कोटा नजीक बरोबर नवद डेरे जाले आहेत. फौज सुमार दक्षणेचें अंगास आठ हजार पडली आहे. तमाम सेकावत चादपोवल हतोरीचा गढी हींत तीन हजार फौजेची चौकी आहे. येथें वरकड जागां नाकेबंदी जाली. येथे मोजदाद फौज सर्व वीस बावीस हजार स्वार आहे. साहेबाचे सेवेसी श्रुत होय हें अर्जदास्त. कालीं बुधवारीं रात्रीं दारु गोळी पंनास उट भरून सागानेरास पाठविली. तेथील बंदोबस्त फार आहे. येथें धारण जव सोळा सतरा शेर, व गहुं तेरा शेर, तूप दीड शेर, गूळ पांच शेर, तेल च्यार शेर, मुगाची मठाची दाळ सा शेर, वजन कच्चे, दर रुपयाप्रमाणें बाजार निरख आहे. खुर्दा टके तेरा विकतो. तमाखूं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रुपयासी दीड शेर विकत आहे. पाणें विड्याचीं दर रुपये च्यारशें व लांकडें दर रुपयास मण तीन घांस सरदोजी (?) दोन वजन दोन मण त्या प्रकारें शहरांत भाव आहे. सेवसी श्रुत होये हें अर्जदास्त.

¶*The messenger Khema gives news of the disposal of the enemies' forces, probably in view of a decisive action.*

No. 42] *[19-5-1737*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
श्वामीचे शेवेसी

विनंती; सेवक जगनाथ वैजो कृतानेक सां। नमस्कार विनंती. ता। जेस्ट शुध १ पर्यंत श्वामीच्या कृपावलोकनेकरून कुरवाई भोरासियामध्यें सुखरूप असों विशेष. या तालुकियाचें वर्तमान येकदोनदां सेवेसी लिहिलें त्यावरून श्रुत जालें असेल. सांप्रत आपाजीपंती व त्रिंबकपंती पत्रें लिहिलीं त्याबराबर पत्र पाठविले तें सेवेसी पावलें असेल. निजाम सिरोंजेसंनिध आलियावर आपाजीपंत व त्रिंबकपंत निघोन गेले, फिरोन आले तें वर्तमान त्याहीं लिहिलें असेल. सिरोंजेस निजाम आलियावर या प्रांतीचे तमाम जमीदार भेटोन मुलकांत फितवा केला. रुपया तों काहीं दिल्हा नहोता. त्यावर हें पुट जालें. आम्हीं याच्या सलुखे यापासी राहिलों. बाहेर जावें तों दुसरें ठिकाण नाहीं यास्तव राहिलों. इतकामात्र आम्हांसी सलुक राखिला. श्वामीच्या आगमनाचें वर्तमान यैकोन परम आल्हाद जाला तो कोठवर लिहावा! अतां सर्वाच्या पारपत्याबराबर यांचेहि होईल. पेंकाहि वसुल होईल. निजामापासी फौज मऱ्हाटे हजार पांचसाहापर्यंत व त्यांची फौज पंधरा, येकून वीस बावीस हजार आहे. त्यामध्यें लोक रजावंद नाहींत. तमाम दक्षणेस जाणार. परंतु श्वामीच्या आगमनेंकरून तटस्थ होऊन बैसला आहे. आपली फौज दाहा वीस कोस पुढें गेलियावर दो चौ हजारांनसी दिलीकडे जाणार; बाकी फौज माघारीं जाणार. जमीदार आपलाल्या ठिकाणीं जातील. इतका जमाव करावयासी प्रयोजन, आपलें आगमन मार्ग धरून जालें यास्तव. बहुत काये ल्याहावें हे विनंती.

¶*Jagannath Vaijo informs the Peshwa of the arrival of the Nizam at Sironj and the trouble started by him.*

1324

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 43] [*21-5-1737?*

श्रीमार्तंड

श्रीमत् माहाराज राजश्री
आपा साहेब स्वामीचे सेवेसी

विनती. सेवक अंताजी माणकेश्वर कृतानेक सां नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ २ सफर मुाा उमरावती प्रात वराड माहाराजाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञेप्राा राा आऊजी कवडे यासी कुकडमुढीयावर येऊन सामील जाहालो. तेथून दरकुच वराड प्रांतास आलो. राजश्री आऊबास पाच सात वेळा खडेगणती जोहारास उभे राहून, चौदाश्या स्वाराची दिल्ही. त्यापैकी च्यारसे करोल व हजार आड हत्यारी व भालेकरी याप्राा दिल्ही. गोठगणती च्यार हजार घोडे भरले. याखेरीज आपले निाा सिलेदार पथके राा संताजी मोरे व सटवोजी करंडे व येद्याजी सतकर व लक्षुमणजी बिन सिवाजी करडे याची गणती निरालीच सतंतरच दिल्ही. व आम्ही आपले जागा फौज जोहारास उभी राहाते तेव्हा रोज दररोज खडेगणती घेतच आहो. गणतीस तिलमात्र अंतर पडो देत नाही. जैसी जैसी गणती घ्यावयाची, तैसीतैसी घेतच आहो. तिलमात्र अंतर सेवकापासून पडणार नाही. स्वामीनी आपल्यास येक लक्ष रुपये, याखेरीज संताजी मोरे व सटवोजी करंडे व येद्याजी सतकर व दर्याजी सतकर व लक्षुमणजी करडे याजला वराता देविल्या. त्यास राा आऊजीबावानी उतर दिल्हे की, वराड प्राती गेलियाउपरी आधी तुमचे पदरी पैका घालू. त्यास इाा मलकापुरापासून ताा नागपूरपर्यंत दोन तीन लक्ष रुपये प्राप्त जाले. परंतु आम्हास व आमचे निाा सिलेदारास येक रुपया पावला नाही. त्यास आम्ही दोन च्यार वेला रुपयाचा उलेख केला. त्यानी साफ जाब दिल्हा की, आपले कर्ज वारून, लोकाच्या आपल्या समजाविसी जाली (या) वेगल, तुम्हास पैसा द्यावयास मिलत नाही. तुम्ही हुजूरची पथके आहा. तुमचे कर्ज खावंद वारतील. यैसी साफ उतरे दिल्ही. व तुमच्या लोकाची समजावीस खावंद करितील. आम्ही त्यासी कजिया करावा तरी स्वामीचे सेवक. बेकैद करावी, हे गोस्ट आपणापासून व्हावी यैसे नाही. स्वामीजीचे परवरदो[१] आहो. त्याप्राा कैदेने वर्तणूक करावी.

---

१ पोष्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वामीनी करोलास व शर्गीर्दपेश्यास पागेस व भोई जासूद यास दरमाहा च्यार हजार रुपये नेमून दिल्हे. त्यास येक रुपया दरमाहा रोजमरियास दिल्हा नाही. भोई यास व जासुदास व पागेचे जडीप आढलाचे बारगीर व करोल मातबर आढलाचे स्वामीच्या ठेविले त्यास महिने बाधून दिल्हे, ते दरमाहा दिल्हेच पाहिजेत. येक दिवस आधीक जावयास कार्यास नये. येथील विचार तो येप्रकारचा. पैसियास ठाव नाही. मग रा। आवजी कवडे याजकडे जिवाजी गायेकवाड सिलेदार आहेत त्यास याणी समजावीस वीस हजार रुपये दिल्हे. त्याजपासून आम्ही कर्ज बारा हजार घेऊन, व आपल्या लस्करात सिलेदारास बक्षिसे कडी सोन्याची दिल्ही होती ती घेऊन, अजीपर्यंत थोड्याबहुताने रंग राखला. पुढे रा। भास्कर[1] हरी व कृष्णाजी आटोले व आलीखान वगैरे सरदार याची फौजेसी घाट घातली. उजवे बाजूस आमची फौज करार केली. आम्हा-समागमे सताजी मोरे व राघो कृष्ण व आपली फौज यैसी येक टोली केली. डावे बाजूस पदमोजी जाचक व आणिखी हुजरातची पथके व रा। आऊजी कवडे याणी आपली काही फौज देऊन मधे आपण फौजेनसी आपले राहिले. त्याचेहि फौजेच्या तीन टोलिया जाल्या होत्या. आमचे विल्हेस आलीखान व गावडे वगैरे फौज होती ती मोडून तीन कोसपर्यंत तगी लाविले. मधे भास्कर हरी होते ती फौज रा। आऊबानी याप्रा। माडली. हाती व घोडे व नागारे व पालख्या कूल घेतले. डावे बाजूस पदमोजी जाचक याच्या मुकाबलियावरी कृष्णाजी आटोले होते त्याणी पदमोजी जाचक यासी मोडले. दोबाणाची खांचपर्यंत पदमोजीबावास तगी लाविले याजमुले भास्कर हरी याचे बुलेगे[2] वाचले. नाही तरी मोडून लुटून भयाभंगास नेले असते. आणि युध्यापासून तीन कोसपर्यंत बुलगे मागे टाकिले होते. त्यामुले व पदमोजीबावानी मोड खादला यामुले बुलगे वाचले. नाही तरी लुटून पस्त केले आसते. त्याजवरी कूच दर कूच पुढे देवगड प्रांच्या मजली चालिलो. मागोन भास्कर हरी सडे होऊन देवगडकर मोगल व खंडागले यैसे पंचवीस हजार फौजेनसी येऊन, बोली घातली की, आपले हाती आपणास देणे आणि तुमची आमची भेट होऊन, पुढे जो मनसबा करणे तो करू. ते गोस्ट रा। आऊजीबावाच्या चितास न येता मागती युध्यप्रसगास सिध जाले. मागती पहिल्याप्रा। तीन टोलिया त्यानी केल्या. आम्ही आपली टोली दोबाणाची खाच मोडून मावारी घातली. डावे बाजूस पदमोजीबावानी व रा। आऊजीबावानीहि सिकस्त खादली. यामुले सारे फौजेचा

---

१ पटवर्धन ? २ बुणगे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

घाणा होऊन येक प्रहर युध जाले. मग रा आऊजी कवडे व पदमोजी जाचक वगैरे फौजा पलोन गेल्या. आपली फौज दोन घटिकापर्यंत भाडत होती. तिन्ही टोल्या येक होऊन आम्हावरी मिठी पडली. तेथे आम्हाकडील मातबर लोक व रा रावो कृष्ण व मालजी कोलते यैसे ठार पडले. घोडी फार ठार पडली. आपली खराबी फारसी त्यामुले जाली. जोतियाजी चौधरी व हैबतराव बिन शाहाजी सिंदे व भवानजी महाडीक व भगवतराव काले व बापूजी तावरे यैसे मातबर सरदारच ठार पडले. याखेरीज दाहा वीस आसामी अढलाचे व करोल तीस चालीस आसामी ठार पडले. बावीस घोडे ठार पडले. गेली घोडी त्याचा सुमार नाही. रा मालजी कोलते यानी भाऊवंदसहवर्तमान पंचवीस असामी यानसी सिपाईपणा अतिशयेसी शर्तीचा केला. तो ईश्वरे इमानात बैसोन पाहावा. परंतु ईश्वरे त्याचे मोठेसे वाईट केले. त्याचे चालवावयास माहाराज समर्थ आहेत. पुढे युध्यप्रसंग जालियाउपरी रो आऊजी कवडे याची फौज वराड प्रांतची व बालेघाटची होती ती तमाम पलोन गेली. आमचे वलणचे लोक यानी पलोन मागती कोठे तोड दाखवावे? यामुले तैसेच राहिले. त्यावरी आलीकडे आजी तागाईत चाकरीस आऊबाचे आज्ञेखेरीज तिलमात्र अंतर करीत नाही. परंतु आऊबापासून येक रुपया प्राप्त होत नाही. अजी तागाईत आठा दाहा हजार रुपये सा साता महिनीयांत पडले. पान आदा जाला आहे. येवढी सरदारी महिनेमाहाल लोक कैसी जिनगानी रक्षावी? कर्जदाराचे कर्ज वारावयाची फिकीर आम्हास काये आहे? माहाराज समर्थ आहेत. परंतु आम्हास पोटापाणियास वस्त्रापात्राचे हाल येऊन पडले आहेत. युध जालियाउपरहि रा आऊजीबावास नागपूर व देवगड वगैरे पैका मिलावयाचा तो मिलाला. परंतु ईश्वरे त्यास आम्हास द्यावयास बुध दिली नाही. देवगडचे हाती दोन व घोडी उटेहि काही प्राप्त जाली. आपल्या लोकाची पडली घोडी कोणाकोणाची दिल्ही. परतु आम्हास येक पैसा आगर घोडे उट दिल्हे नाही. आमच्या लोकानी रुबुरू पडले घोडे त्यासाठी हैराण दररोज करितात. स्वामीनी आम्हास कोणीकडे नेमिले आणि कोणीकडे येणे जाले; त्याचा परिणाम सेवट कैसा जाला. त्याहीमधे आऊबाचे सोबतीचा येक दिवस येका युगासमान आहे. योगभ्रस्ट, आविवेकी, आप्रमाणिक, बोलल्या बोलाचे शाश्वत नाही. बरे ज्याबा जावे त्याचा बोभाट खावंदास ल्याहावा, यैसे नाही. परंतु हे सरदार थोर प्राक्तनाचे बलवत आम्हास मिलाले. तेणे करून आमचेहि उर्जीत उतम जाले. बरे खावंदाचे पाये समर्थ आहेत. वर्षाप्रा याची बुधी आहे, यैसे नाही. याचे

1327

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बुधीस भ्रंस जाला. चाकरी मोरचीयात व गावखेडियास करणे ते करितच आहो. आणि युधातहि करणे ते केली. परंतु बेबूज कारभार फार आहे. सेवसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Letter from Antaji Mankeshwar to Chimaji Appa from the camp of Avji Kavde whom Antaji was deputed to accompany. Antaji details the bad treatment he received from Avji Kavde. They had even come to blows.*

No. 44] [*21-5-1737 ?*

श्री

छ ११ सफर दोनप्रहर

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

श्रीमत सकलगुणालकरण अखडितलक्ष्मीआलंक्रत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनती. येथील क्षेम छ ९ सफर रविवार प्रहर रात्र परियेत येथास्थित आसे. यानंतर काली नबाबाची भेटी जाहाली. आजी प्राथःकाली सिरपाव व घोडी * * * * * * दोन दिल्ह्या. * * * * * * * * कूच होऊन नवेसराई आलीकडे मुकाम नेमला आहे. दक्षण कचेरी व मऱ्हाठे यासीहि निरोप दिल्हा. त्याजसमागमे चिरंजीव आपास[1] दुराहीपावितो जाणे म्हणून सांगितले. त्यास उद्याचा दिवस आम्ही मुा येथे करितो. आपण दु गाहा पुढे गेले असतील तरी गडोल्यासन्निध मुकाम करावा. दाणादुणा डावे हाते कटारियाच्या मुलकांतून आणवावा. रोहिल्याच्या मुल्कास तूर्त उपसर्ग न द्यावा. रोहिल्यानी पैका एक हता निशा करून देणार आहेत. वरकड कितेक वर्तमान भेटीनतर निवेदन करीन. आपण नवाबास वस्त्रे पाठविली होती ते गुजरानली. आपल्यास सिरपाव पाठऊन देत आहेत. उदैक आम्हाजवली येईल. आम्ही शेवेसी येऊन पोहचोन तोवरी मुकाम केला पाहिजे. भेटीनंतर जो विचार करणे तो करावा. विदित होये क्रुपा केली पाहिजे हे विनंती. चंदेरीकरहि पैका करारप्राा द्यावयासी सिध आहे. एक जोडी जासुदाची त्याच्या गावास पाठविली आहे. कलले पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao : communicates to him details of his interview with the Nizam, and asks him not to settle further plans until they meet.*

---

१ सटवोजी जाधव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 45]   [*30-5-1737* ?

श्री

राजश्री पंत प्रधान गोसांवी यासी

श्रीमत सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलक्कृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दडवत विनंती. येथील क्षेम ता छ ११ सफर प्रहर दिवस परियेंत क्षेम असे विशेष. नवाबाचे आजी कूच होऊन कालापाणी कचनाराआलीकडे मुकाम जाहला. रात्री राजश्री आनंदराऊ पंडित सुमत यासी बोलाऊन नेऊन आज्ञा केली की आपण कूच दरकूच जात आहों. नसीरदौला व मराठे याचा कूच छ १४ तेरिखेस होईल. तोवरी दोन दिवस आम्हास मुकाम करावयासी सांगितले. कूच जाहालियानंतर चिरंजीव आपास घाटापावतो समागमे देऊन आपल्या दर्शनास आम्ही येऊन तो परियेत दोन दिवस गुंता जाहला तरी उतावली न करणे, म्हणून बहुत प्रकारे लिहिले होते. त्याची चिठीच पाठविली आहे त्यावरून विदित होईल. दोन दिवस आम्हास तो राहणें लागलें. याचा फासाठी तोडून टाकितो. आपला लस्करचा मुकाम पटारीच्या नदीवर जाहला म्हणून वर्तमान आलें. यैसियासी अजम यार महमदखान याची भेटी जाहाली. त्यानी बहुत प्रकारे आपल्या शेवत स्नेहाचाच अर्थ निवेदन केला. पका कराप्रा न पावला सबब पैका वसूल करून सावकाराचे घरी ठेविला होता तो तुमचा जाहला. तोच आपण खर्च केला. तुमचा पैका देणे जरूर आहे. गावास जाऊन तरतूद करून निकाळ करून, शेवेसी पाठवितों. कमाविसदारास पुढें भूपालास पाठउन देतो. मुलकास पहिलेहि उपसर्ग लागला. खराब जाहला. मोगलाचे फौजेच्या दलवटामुले खराब जाहला. सांप्रत जो मुलुक आसुदा राहिला त्याच मुलकात लस्कर आले खराबी होईल पैसा मुलकावरी आहे. रयेतीस आजार न द्यावा. हंगाम लावणीचा आहे, यास्तव लस्कर येकीकडून काहाडावे म्हणून बहुत प्रकारे विनंती केली. आपल्या करारात अतर पूर्वीहि केले नाही; पुढेहि न करान म्हणून सांगितले, त्यावरून लिहिले आहे, तरी रोहिलियाच्या मुलकास उपसर्ग न लागे ते गोष्टी करावी. रयेत खराब जाहालियाने नुकसानी होते, यास्तव ताकीद उतम प्रकारे करावी. मोहनलाल सेवेसी पाठविले आहेत. रा. आपाजी जिवाजी व त्रिंबकराज

(मुद्रा:)
श्रीपांडुरंगचरणीं
दृढ भाव चांगोजीसुत
पिलाजी जाधव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

देव दोन प्रहर रात्रीं आले याचे व सुरंजकर जमादार याचे वर्तमान मनास आणून शेवेसी पाठऊन देऊन. विशेष काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Bajirao, giving news of the Nizam and his interview with Anandrao Sumant.*

No. 46] [*May 1737*

श्री

विनंती. सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक सां नमस्कार विनंती. प्रार्थना यैसीजे. श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान बऱ्हानपुरावरी आलियावरीं वरचेवरी पत्रे येतांत कीं, रयेतीस काडीचा उपद्रव न देतां तुम्ही वराड प्रांती मोगलाईचा अमल बैसवणे. त्यास राजश्री अवबाची[१] क्रिया ठिकाणीं नाहीं. जे गावीं कौल द्यावा, पैका घ्यावा, तेथे इमान देऊन झाडा घ्यावा, सेवटी गाव जालावा, हे पाप अतिशये जाले. गाईचे वलीत वगैरे पाप लस्करात फार. या पापास्थव लस्करे बुडाले व पुढें प्रस्तुत अमल बसवावयाचा प्रसंग आला तों कुणबियाच्या इमानास काडीमात्र रजावंद नाहीं. येकहि ठाणें बसत (नाहीं). ज्या गावांस जातों तेथे याजला काणी बधत नाही. रयेतीचा फारसा बेंदुवा याचे पदरी पडला तो कांही लिहिता पुरवत नाहीं. त्या पापांचे सोबती आम्हीं; सर्वस्वे फकीर जालों. पुढें कर्ज तैसेच राहून स्वारीत पोटाचे कर्ज उलटे जालें. पुढें रजपूत करोल दोनसे आहेत. पेंडगाव व नगरकर हलालाखोर त्याचे पंचवीस माणूस ठार पडिलें. खराब जाला. त्याणी चाकरीच केली. मृगसाल होतांच समजाविसीमुले कजिया करणार. अऊजीबावानीं सारें वराड पालथे घातलें. लस्करात ताकीद काडीची नाहीं. ताकीद करून मागती झाडा घ्यावा. जे आहे ते बरेंच आहे. वरचेवर श्रीमंतांची पत्रें योविसी येतात कीं, काडीचा उपद्र(व) रयेतीस न देणे. परंतु ते होत नाही. पुढें ठाणे काही याचे हाती येक लागत नाहीं. प्रस्तुत अलंजपुरावरीं आलें आहेत. तेहि होत नाहीं. आम्हास रा। अऊबानी चौदा परगणे ठाणी बैसवावयास दिल्ही. त्यांस आपल्या इमाने तमाम ठाणी बैसविली. परंतु रा। बाबाचे येक ठाणे बैसत नाही. सेवटी

---

१ अवजी कवडे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्हासहि प्रस्तुत आज्ञा करितांत कीं, तुम्ही ठाणी सोडणे. आम्ही येजमान स्वामीस बऱ्हानपुरास विंनतीपत्र लिहिले आहे. उतर आलियाप्रों वर्तणूक करून. आपासाहेब, मजला कोठे रवाना केले आणि पुढें कोठे आणून घातले ? माझी जोड ते माहाराजाचे पायें. येवढें कर्ज, लोक किती, खर्च केवढां, कैसे करावे हे कलत नाही. मी केवल खिजमतगाराप्रां सेवक. माझी इमारत माहाराजांची आज्ञा. ज्या सरंजामावरी येवढें ढाल केले त्याचा परिणाम कोणीकडे जाला बरें ? सर्वा गोस्टींचा निर्वाह करणार माहाराज समर्थ आहेत. सारे आऊबाच्या लस्करात माझे खराबीप्रा खराबी येवढी दुसरियाची नाही. पुढें स्वामी समर्थ आहेत. मजला चिंता काये आहे ? कोणास वरात सेतसनद मागे देविली होती त्यातहि निमे देविले म्हणून कलले. तरी यैसे न पाहिजे. याउपरी ताकीद करून देविले पाहिजेत. घरी तीनच्यार लग्ने होती. बेगमीचा विचार कलतच आहे. इकडे प्रसं(ग) ये जातीचा आहे. त्यात चितास येईल ते करावे. रा अऊबाची काये निमत्य लिहिली म्हणाल तर लिहिल्याचे चौपट त्याची वर्तणूक जाली. आम्हास अतिशये ये सोबर्तीने बेजार केले. चाकरी लस्करापेक्षां येकांग्या करून खराब होऊन नाचीच जाले. सार्थक नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. रा राघो कृष्णांच्या मुलाबालाचे सर्व प्रकारें चालवावें. राघोपंत आम्हापासीं सम्मुख परम संकटी मृत्य पावला आहे. हे विनंती.

¶*Antaji Mankeshwar to Chimaji Appa : complains bitterly about Avji Kavde and asks redress. One Ragho Krishna, he adds, fell fighting and his children deserve to be rewarded.*

No. 47] [*3-6-1737*

श्री

पुरवणी राजश्री बापूजी पंत स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. तीर्थरूप राजश्री राऊ भदावरास गेले. तेथील खंडणी केली. आण पुढे चालिले. भदावरकरानी खंडणीचे रुपये द्यावे तो सादतखान समीप आलेसे पाहून त्यासीं राजकारण कडून ते व हे येक हाती व्हावेसा विचार केला. आण रुपये द्यावे त्यास नौदिगैर[1] मांडिला. हें वर्तमान कलतांच तीर्थरूप राजश्री राऊ याणी सडी फौज करून शहरावरी चालोन घेतले आपण शहर घेऊन भदावरच्या कोटास मोर्चे लाविले. तेव्हा भदावरचा राजा बाहेर येऊन भेटला.

---

१ अडथळा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वीस लक्ष रुपये खंडणी कबूल केली आण पंधरा लक्ष रुपये वसूल दिल्हा. पाचा लक्षाच्या वोली दिल्या. तदनतर कूच करून सवाई जयनगराचे रोखे यमुनातीरास गेले. तो सादतखान यमुनानजिक आला, हे वर्तमान कलतांच सडी फौज करून राजश्री पिलाजी जाधवराऊ व मल्हारजी होलकर आदिकरून यमुनापार केले. त्याचे व याचे युध्य जाहाले. थंडे केले. बाण फौज सहवर्तमान आलाड आले. सादतखान यमुनापार होऊन आगऱ्यानजीक शहर पाठीसी घालून राहिले व खानदौराहि मागाहून आले ते व सादतखान येक जाहाले हे वर्तमान कलतांच तीर्थरूप याणी बुलगें बुंदेलखंडास रा करून सडे फौजेनसी लाब लाब मजला करून दिलीसंनिध गेले. पुढे जावे तो शहर पुरातन आद्यस्छान. त्याहिमध्यें येवनाधीश सुलूक करावा हे इच्छा धीरतात. यास्तव लस्करास ताकीद करून पुरे जालू दिल्हे नाही. परंतु पातशाहास बहुत गडबड होऊन शहराची बंदोबस्ती करावयास लागले. आण आमचे फौजेचे तोंडावरी खास चौकीचा सरदार कोका व सिवसिग वगैरे पाचसात हजार फौजेनसीं पाठविले तो तीर्थरूप याणी कूच केले की आद्यस्छानास उपसंर्ग समीप राहिलियाने लागतो. यास्तव ती कोसावरी शहरानजीक राहावे म्हणोन चालिले तों गनीम पाठीवरी आलासे पाऊन चालोन घेतले. सिवसिग मारिला. कोक्यास जखमा लागल्या. पांच सातसे घोडे घेतले. कोकाहि शहरात गेलियावरी मेला म्हणोन बर्तमान आले. पुढे भदावर प्रांते तीर्थरूपानी यावयाचा विचार केला तों कमरदीखान आडवे आले. त्याचे व याचे युद्ध जाले. सेपनास घोडे व येक हाती कमरुदिखानाचे घेतले. तो बातमी आली कीं सादतखान व खानडौरा सा कोसावरी आले. त्याहिमध्ये रात्र जाहाली यास्तव कमरुदिखानास सो(डून) भदावर प्रांते आले. बाकी साकी राहिली तेहि वसूल करून बुदलखंडा (स) येणार आहेत. आले असतील जाणिजे छ १९ सफर.

¶*This is a news-letter giving details of the battles first with the Chief of Bhadavar and then with Sadatkhan. The Chief of Bhadavar, who tried to defer payment of the tribute agreed upon, had to be compelled to pay at the point of the bayonet. Sadatkhan upon being driven across the Jumna by Pilaji Jadhao and Holkar, wanted to combine with Khan Dauran. But Bajirao took some picked men with him and by forced marches appeared all of a sudden within a few miles of Delhi. A battle was fought and Bajirao succeeded by means of guerrilla tactics in tempting the enemy to pursue him and then turning suddenly upon him. Shivsing and Koka, the Moghal sardars, were killed in the action.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 48] [*4-6-1737 ?*

छ १० सफर दोन
प्रहर

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसांवियांसी

ॐ श्रीमत् सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम. ता। छ ८ सफर मु॥ सुरूंज येथास्थित असो विशेष. छ ६ रोजी आपली आज्ञा घेऊन स्वार जालो. ते आजी शनवारी चौ घटिका दिवसां प्राथकाली मुकाम मजकुरी दाखल जालो. नवाबाची भेटी जाली. बहुत आदर करून खैशवख्त[१] जाहाले. कितेक ममतेच्या विचाराच्या गोष्टी सांगितल्या त्या भेटीनंतर विदित होतील. छ १० मोहर्रमी[+] नवाबाचे कूच होऊन, पुढे जाणार आहेत. आम्हीहि निरोप घेऊन तेच दिवसी स्वार होऊन. आपणहि जयसिंगनगराअलीकडेपलीकडे त्याच मुलकांत असावे. यारमहमदखानाकडील रुपयाचा हफ्ता तूर्त देतो यैसे म्हणतात. त्यास रुपयांची निशा त्याजपासून करून घेऊन, परंतु फौज त्यांच्या मुलकात गेलियाने पूर्वीहि उपद्रव फारच लागला आहे आणि याउपरीहि आजार[२] लागलियाने अतिशयेसीच खराबी होईल. याकरिता त्याच्या मुलकास आज़ार लागो देऊ नये. लस्करास दाणावैरण सागरच्या मुलकाभोवते [येथें शिक्का] आसेल तेथून कुरवाईकरांच्या मुलकातून आणविले पाहिजे. आम्हीहि सत्वरीच येऊन आपणासन्निध पोहचोन. विदित जाले पाहिजे. चंदेरीकरास व कुरवाईकरास व यारमहमदखानास ताकीद केली आहे की, कुंल[३] पैका झाडियानिसी देणे. आम्हांसहि सांगितलें कीं, राजश्री राया-जवली विनती करून, पंधरा दिवसा महिन्याच्या आवकाशे पैका मागे पुढें घेत ते करणे. त्यावरून यारमहमदखानानी पैका द्यावयाचें केले आहे व आम्हासी भेटीचा उद्येसँ[४] करीत होते व चिरंजीव राजश्री ऑपास[५] डेरियास बोलाऊ पाठविले होतें. त्यास आम्ही हाच जाब दिल्हा की, विना पैका आल्याखेरीज,

---

१ खुषी. + मोहरमच्या ऐवजीं सफर पाहिजे. २ उपद्रव.
३ सर्व. ४ इच्छा. ५ पिलाजीचा मुलगा सटवोजी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुमची आमची भेटी होणार नाहीं. त्यावरून उदैक पैका द्यावयाचा इत्यर्थ केला आहे. उदैक वर्तमान होईल ते लेहून पाठऊन, विशेष काय लिहिणे हे विनंती. [मोर्तब]

¶*Pilaji Jadhao to the Peshwa, communicating to the latter his interview with the Nizam.*

No. 49] [*8-6-1737*

छ १३ सफर
प्रहर रात्र

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसांवी यासी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ १३ सफर जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपले लस्करचा कूचमुकामाचे वर्तमान कालपासून कलले नाही. आपले लस्कर कोणे स्थली आहे पुढे कोणत्या सुमारे येणार, हे लिहून पाठविले पाहिजे. येथील वर्तमान तर नवाबाचा काली मुकाम शाहाडौरावरी जाहाला. आजी बढाडोंगर येथे गेला. आनरुलाखान दिवाण मावारा जाणार. त्यास निरोप आद्यापि जाहाला नाही. तो लस्करातून येई-तोवरी मऱ्हाठे आवघे लस्कर खोलंबले आहे. छ १४ मिनहूस येथून कूच होणार त्यास दिवाण आला नाही याकरिता खोलंबा होईल की काये पाहावे. याज * * दोन मजली पावते करावे. मग आम्ही आपण * यावे. यामुले दोन च्यार दिवस गुता जा (हाला). याचे पुरांड[1] लांबल्याखेरीज, आपले ल(स्कर) वेत्रवती उतरून आलीकडे येता नये. * * * खातील. यास्तव दोन दिवस भोत्रराशासन्निध मुकाम करावा. तेथील कार्यभाग निर्गम करून घ्यावा. आहीरवाडियातील कमाविसदार आले असतील, त्याचाहि काये तो निर्गम करावा. सुरंजेचे कामाकाजाचा विचार, प्रस्तुत तों लस्कर शाहारात राहिले. हे गेलिया उपरी लस्कर सन्निध आल्याने, आपले विचारे, जे होणे ते होईल. रयेतीचा आन्याये नाही. ज्याणी लबाडी केली त्याचे पारपत्य करावें. वरकड स्थलचे कमाविसदार भेटीस आले असतील.

(श्रीपांडुरंगचरणीं दृढभाव चांगोजीसुत पिलाजी जाधव.)

---

१ मूळ अर्थ पुरांतील राड. येथें सैन्य व सैन्याबरोबरील खटले हा इत्यर्थ.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

खेची[1] तों नवाबाबराबर गेले आहेत. हा (गुं)ता उरकला. याउपरी जो विचार करणे तो करावा लागेल. सुरंज डावी टाकून उजनीचे सुमारे जावयाचे विचारे जाहाले तरी उतम. आवव्यावरी दबाव पडोन कामाकाजाचा निर्गम होईल. लस्कर मोगलाचे माघारे जाते. याचा वसवास[2] तुटेल. यास्तव पुढे आपण मनसुबा योजला असेल, तो लिहून पाठविला पाहिजे. रा बाबूराऊ यासहि शेवेसी पाठ-(ऊ)न देतो. वर्तमान सविस्तर निवेदन करितील. त्यावरून श्रुत होईल. जैसी आज्ञा येईल, तैसी वर्तणूक करून. विदित होये. कृपा केली पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Bajirao in the Delhi expedition : communicates that the Nizam has moved towards Budha Dongar and asks him to proceed with Bundela chieftains.*

No. 50] [*About June 1737 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

पोष महिपत आनंदराऊ सां नमस्कार विज्ञाप्ति. येथील क्षेम स्वामीचे कृपे-करून येथास्थित असे. शाहाजानाबादेहून वर्तमान आले की, पातशाहाचा व नवाबाचा शपतपूर्वक स्नेह जाला. कुराँन[3] दरम्यान दिल्हे. राजश्री बाबूराव मल्हार यास पातशाहाच दर्शन केले. हस्ती, जिगाँ[4], वस्त्रे, अस्व, सिरपाव जाला. सविस्तर वृत्य परस्परे निवेदन जाले असल. नवाब लौकरच रुकसत[5] होऊन येणार. इरानचे पातशाहाची मोहीम जाली आहे. काबूल, खंदार, गजनी वगैरे च्यार सुबे घेतले. पुढे चाल करितात म्हणोन वदंता. यास्तव नवाबहि फौजबंदी करून त्याचे पारपत्यास जाणार म्हणोन वर्तमान आले आहे. राजश्री रघूजी भोसले पैठनपर्यंत आले. गंगा उतरून पुढे माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी जातात. विदित होये बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Mahipat Anandrao Sumant writes from Delhi to the Peshwa about the friendly understanding that was effected between the Emperor and Nizam-ul-mulk.*

---

१ खेचीकर सरदार. २ संशय, भीति. ३ कुराणाचें इमान प्रमाण झालें.
४ पागोट्यावर बांधावयाचा रत्नालंकार. ५ निरोप घेऊन येणार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 51] [*June 1737 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजेश्री विष्णुपंत
स्वामीचे सेवेसी

पो नारो व्यंकटेश कृतानेक सांा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. स्वामीकडून पत्र येऊन परामस होत नाही; तरी यैसे न करिता आहिर्णिसी पत्री सांभाल करीत जावा. श्रीमंतांची छावणी तिकडे हिंदुस्थानात होणार म्हणून आइकतो. त्यास इकडे येणे होते किंवा नाही हे सायंत (वृत्त) लिहिल पाहिजे. आम्हास तो सर्व भरोसा आपला आसे. बहुत काये लिहिण, लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*Naro Vyankatesh asks Vishnupant whether Bajirao was going to spend the next monsoon in North India.*

No. 52] [*June 1737 ?*

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान गोसावी
यासी

विनंती उपरी. पाा सुरूंज येथील रयत तजावजा[१] जाली होती. त्यास आम्ही कौल[२] देऊन राखिले आहे. लस्कर इकडे येईल तेव्हा गीर्दनवाई[३] गाव लुटले जातील. याकरिता राा आपाजी जिवाजी यांकडील कारकुनासमागमें पनास पाऊणसें राऊत पाठऊन गावोंगाव व शाहारची रखवाली करविली पाहिजे. चौरासी सुरुंजवाला याजलाहि बोलाऊन आणिले होतें. त्यास हिसेबी पैका निघेल तो त्याणी घ्यावा हा त्याचा करार आहे. व शाहारांत कमाविसदारांकडील कारकून चौत्र्यावरी आसते म्हणिजे रयत वसवसा[४] न खाती. तरी येक कारकून व कौल पाठविला पाहिजे. व चौऱ्यासीसहि कौल आपला येईल तरी तो शाहां(रात) राहील. नाहीं तरी तो मुले माणसे घेऊन पलोन जाईल. आपण खावंद आहेत. सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिले आहे. शाहारचे लोक पलाले म्हणिजे शाहार राहणार नाही. कलले पाहिजे. विशेष काय लिहिणे ? हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao : writes about the condition of Sironj.*

---

१ तजावजा होणें = घाबरणें. २ अभय. ३ सभोंवतालचे. ४ भीति,

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 53] [*10-8-1737*

श्रीवेंकटेश

श्रीमंत सदायेशवंत धर्मपरायेण

राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

सेवक चेरणरज वेंकाजीराम[१] सांा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २४ राखर मुाा जयेनगर जाणून येथास्थित असे. यानंतर दिलीहून वर्तमान आले. त्यांत मजकूर की नवाबानी पातशापासी करार केला जे आपणास पाच सुभे देण आणि करोड रुपये देण. आपण हरिभक्तोस[२] रेवांपार[३] होऊ देणार नाही. आणि कदांचित फार शोकी[४] करतील तरी दक्षणचीहि चौथ उठऊन देऊ येसे बहुतप्रकारे वलगणा केली ते कागदी कोठवर ल्याहावी? पातशास चंढी[५] लाऊन बहुत भासेणें करून भेटी जालिया दिवसापासून येकांतलोकांत मोठासाहच[६] केला आणि कुल येख्तियाँर[७] करून घेतला. दक्षणेस तो पुत्र आहे आणि इकडे गाज़ुदीखान याचे नावे दोन सुभे अक(ब)राबाद व मालवा करार करून छ १७ राखरी सिरोपाव दिल्हा. कुल अमिरानी मुबार्रकी[८] दिल्ही. आता राहिले तीन सुभे प्रयाग व गुजरात व अजमेर तीन सुभे आपले भाऊबंद कोण्ही पाव—(अपूर्ण).

¶*Venkaji Ram, Peshwa's agent at Jaypur, writes thus to Bajirao on 10th August 1737 : " Information has been received from Delhi that an agreement has been reached between the Nizam and the Emperor according to which the former has undertaken to stop the Maratha advance beyond the Nerbudda. In return for his services he is to be rewarded with five Subhas and one crore of rupees. He boasts that in case the Marathas persist in their depredations even the grant of Chauth from the Deccan would be withdrawn. Since his meeting with the Emperor he has had secret conversations with him as a result of which the supreme command of the state has been conferred upon him. One of his sons is posted already in the South. Another, Gaziuddin, has received Malwa and Akabarabad. The remaining three Subas of Prayag, Gujarat and Ajmir would be granted to his friends and adherents."*

---

१ जयपूरचा पेशव्याचा वकील. २ मराठे. ३ नर्मदा. ४ गडबड.
५ भर देणें. ६ मोठासा. ७ अधिकार. ८ अभिनन्दन.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 54] [*25-10-1737*

श्री

श्रीमंत सदायेशवंत राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

सेवक वेंकाजीराम सा। नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता। कार्तिक सुध त्रयोदसी स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे. यानंतर रा। बाबा[1]स्वामी दिलीहून आश्विन वदी द्वादसीस सवाई जयेपु(री दाखल) जाले. रा। सवाईजीचे भाशेण जाले, ते सेवेषी लिहिले असे. जयेपुरीहून राजश्री कार्तिक सुध अष्टमीस स्वार जाले. सेवेसी येऊन वृत विदित करणार. वरकड श्रीमंत स्वामीस लिहिले असे हे विनंती.

¶*Venkaji Ram, stationed at Jaipur, to Chimaji, saying that Bajirao has arrived and visited Sawai Jaysing.*

No. 55] [*30-11-1737 ?*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री आपा स्वामीचे
शेवेसी

विनंती. सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करावयास लेखकास आज्ञा केली पाहिजे. सेवकाचे वर्तमान ता। मार्गेस्वर वद्य ५ पंचमी येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों तें मौजे बेरी कुकडीवर लस्करात सामील जालें. श्रीमंत माहाराज राजश्री राऊ स्वामीचे दर्शन जालें. पत्र दाखविलें. त्यावर सामान पाहिलें. सारें सामान गणतीचे घोडें ३८९ पैकी हमेशा निशाणा बा। स्वार १४८ देखील सटवोजी सेवाला चालतों, त्यास खावंदानी सामान पाहून आपणावरी खुशाल जालें. राजश्री राऊ सामानाविसीं संतोश जालें. मग सिवणीकर केरोल[2] मानाजी पायेगुडे याजकडें दिल्हें आणि आपणास हुजरातीस ठेऊन पाठीमागील विल्हे दिल्ही. आज्ञेप्रमाणें येकनिस्ट सेवा करून; परंतु येंदा लोक आपणाकडें भारी आहेत आणि कर्जहि फार जालें, याचा परिहार करणार स्वामी समर्थ आहेत. हरयेकविसी खावंद कृपा करितात. आपले बधु राजश्री हरिपंत याजवल वेथा अतिशये होती. काही आरोग्यतेचे वर्तमान कलत नाही. तरी स्वामीनी आमचे पत्र चांबलीस पाठऊन तेथील उतर

---

१ बाजीराव. २ बंदुकस्वार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आणऊन कासीद येतील त्याजबाा पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. येदां घरी चिरंजीव उभयेतां मुलाची लग्ने आहेत. त्याचें साहित्ये सर्व माहाराजावरी आहें. येक कवडीचा ऐवज दुसरा नाही व खासगत पागेचे स्वाराची व आमची नालबंदी मिलोन सरसाल बेगमी वरात नारोदादावरीं च्यारसे रुपये देविलें, त्यास ताकीद करून सत्वर ऐवज पावे तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. कुटुंब-घात होये थैसे न करावा. सेवकाची सर्व फिकीर माहाराजास आहे. वरातेच्या भरवसियावरी शंभर हवाले घरी देउन आलो आहो. आपले बंधु आबाजी हरयेकविसी विनंती करितील त्याचें पारपत्ये करणार स्वामी समर्थ आहेत. सेवकाची विनंती उदा[1]स न करावी. वहुत काये लिहिणे, कृपा लोभ आसो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Antaji Mankeshwar requests from Chimaji Appa funds for the expenses of his troops which, he says, were examined by Bajirao and approved.*

No. 56] [*3-12-1737*

श्री मलारी मार्तंड भैरवनाय नमः

पौ छ २६ साबान.

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नरसो कुसाजी साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील कुषल मार्गेश्वर वद्य ८ शनवार प्राथःकाल जाणोन श्वकीये स्वानंद वैभव लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष, कृपा करून आज्ञापत्र पाठविलें, पावलें. येजमानास पत्र पाठविलें होतें तें त्यास प्रविष्ट करून उत्तर पाठविलें आहे, त्यावरून विदित होईल. आज्ञा केली कीं सविस्तर वर्तमान लिहिणे त्यास, राजश्री सुलतानजी राऊ निा दिडा हजारा स्वारानसीं आले. नबाब नासरजेंगजी साहेबास भेटले. ते त्याचे घरास आले. महलो[2] स्वारांचा पाहिला. त्याचे पुत्रास तरवार दिल्ही. त्याचा हेत आहे, गवत अंजेनटावर[3] आहे. तेथे फौज पाठवावी. शें दोनशें स्वारानसी येथें राहावें. तैसेच राजश्री जानबाराऊ च्यार पांचशें स्वारानसी आले. त्याचीहि फौज दोन तीनसें कडीवाकडे मिरजगावाकडे जाणार. राजश्री कुसाजीराम बकसी बाार पाठवितात. बाकी फौज राहाते. यावर राजश्री धिराजी पवार सें दीडसें स्वारानसी आहेत. फत्तेसिंग देशमुख पनासेक स्वार

---

१ अमान्य. २ जमाव. ३ अजिंठा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. सुभानजी थोरात संभर स्वार लिंगोजी देखील आहे. हाफिजुलखानास आज्ञा जाली दुर्नदी (?) व सरमस्तखान आहेत. वरकडहि जे अविध आले होते त्यास आज्ञा देतात. आमच्याहि येजमानास आज्ञा देतात. एका दो दिसातून तिकडे जातील. परस्तुत तो जितके आले तितके वारांपाणी[१] होतात. परंतु करार केला आहे कीं नबाब निजामन मुलुक बहादर यानी पत्रें पाठविलीं कीं येणें तर त्वरेनें यावें. त्यास आमचे येजमानानी करार केला, कीं पत्र पावतांच येतो. यैसें सर्वानीं करार केलें. त्यास गवत कडबा माहाग, पाणी नाहीं, म्हणून फौजा दूर दूर ठेवितात. नबाब निजामनमुलुक बहादर हांडियाचे घांटाकडे येणार. धामणें ना सिरोज ६० कोस आहे. बंदूकवाले तेथें आहेत. फौज साठ हजार बार[२] आहे. हिरदेसा वगैरे छेत्रसालाचे पुत्रहि भेटले यैसें वर्तमान छ २९ रजबचे आलें आहे. लाख वाटे तो हें श्रीमंत राजश्री राऊसाहेबांसी सख्ये तोडीत नाहींत. परंतु परिणाम काये होईल तो पाहावा. पुढें जें वर्तमान होईल तें सेवेसीं लेहोन पाठऊन. रावस्वामीकडूनहि वर्तमान हरघडी येतच असेल. विशेष वर्तमान आडललियावर सेवेसीं लेहोन पाठऊन. बहुत काय लिहिणें विज्ञापना.

¶*The writer Narso Kusaji is the Peshwa's man in the army of a certain Maratha ally of the Nizam and writes to Chimaji Appa giving him the postings of the various forces of Nasirjung. He further writes that the Nizam is proceeding to the ford of Handia and presumes that the Nizam will not break off relations with Bajirao.*

No. 57] [*15-12-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक रघुनाथ सिवराम सां नमस्कार विज्ञापना. स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वृत येथास्थित असे. विशेष. आज्ञापत्र सादर जाले तेथें आज्ञा जे सकल वृत लिहून पाठवणे. यैसीयास राजश्री सुलतानजी निंबालकर व राजश्री जानोजी निंबालकर व राजश्री धिरोजी पवार वगैरे मऱ्हाटे सरदार लहान थोर व आविध सरदार मिळून आवघी फौज दाहा बारा हजार आजी आहे. चंद्रसेनहि येणार यैसी वदंता आहे. याची अद्यापि मसलत बाहेर निघावयाची किमपि दिसत नाहीं. नवाब सिरोंजेपलाकडे धामोणीवर होते

---

१ दाणादाण होणें, फाटाफूट. २ पायीचे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ते च्यार कोस आलाकडे आले म्हणून वर्तमान आहे. वर्कड सकल सेनेचे येथील वृत हलकारे[१] याणी अवलोकिले आहे. सेवेमध्ये निवेदन करितील. सेवेसी विदित जाले पा। हे विज्ञापना. स्वामीनी विठल सिवदेव यास रुा। कोकणामध्ये न्यावयासाठी येथे पा।. त्यास दाहा वीस हजार रुा।च्या हुंडियाची मुदती पुस शु ९ होणे आहे व अद्यापि रासीचा भावहि पुर्ता चुकला नाहीं. थोडा बहुत पंधरा रुपये सेकडा बटाप्रा। चुकला. त्यास स्वामीचे आज्ञेप्रा। मा।रनिलेस येकवीस हजार रुपयेच्या नासिकच्या हुंडिया व बाकीचे रुपये रोकडे देऊन रवाना केले. व रामजी घम यास रु. २००० देविले, तेहि दिल्हे. व दाहा हजार रुपयाची हुंडी बाबूजी ना। भिड्ये याजवर पा।, आणि लि।। जे सातारेयाच्या हुंडिया करून राजश्री दादोबा याजकडे पा।, त्यास आज्ञेप्रा। हुंडावण दरा प्रा।। देऊन हुंड्या करून सातारेयास जासुदा समागमे रवाना केल्या. हे विनंती.

¶*Raghunath Sivram to Chimaji Appa, giving news of the Nizam's forces and movements.*

No. 58] [*17-12-1737 ?*

श्री

छ ७ रमजान

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेश

अपत्ये महिपत आनंदराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत पुष शुद्ध सप्तमीपरियंत जाणोऊनु स्वकीयें कुशल लेखण केलें पाहिजे. यानंतर स्वामीकडील पत्र येऊन वृत्त कळत नाहीं तरी सविस्तर वृत्त लिहिलें पाहिजे. इकडील वर्तमान तरी छ ३ रमजानीं मोठे नवाबाचीं खतें अवघियांस आलीं. नवाब नासरजंग व सैद जमालुद्दिखान व सुलतानजी निंबाळकर व जाणोजी निंबाळकर व अबदुलाखान वगैरें जितके लहानमोठें तितकियांसहि आज्ञा आली कीं हजूर येणें. साठ जनाचीं नांवचीं खतें होतीं. येथें शहरांत कोतवाल व मकबुल अलम यांस राहवयाची आज्ञा आहे. नवाब नासरजंग यांनीं तमाम मनसबदार यांस बोलाऊन येक येक चोबदार व येक येक ढलाईत ऐसें सर्वांस पाठविलें आहेत कीं पत्रदर्शनीं येणें. सुलतानजी निंबाळकर व जानोजी निंबाळकर व हिरजुला गुलाबनबाखां हे तों अगोधरच येथें आले

---

१ हरकारे.

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

आहेत. चंद्रसेन यास आज्ञा आहे कीं पुत्रासमागमें फौज देऊन पाठवणें आणि तुम्ही विज्यापूर भागानगरप्रांतीं मजबुतीनें राहाणें. नवाब नासरजंग याचें कूच छ ७ रमजान अगर छ १० रमजानचें महमदीबागांत आहे तेथें कुळ फौजेचा जमाव करून पुढें जावें. सैद जमालुदिखान याचा पेशखाना[1] बाहेर निघाला. आपण छ ९ रमजानीं डेरादाखल होणार ऐसी येथें गडबड जाली आहे. प्रसंग विज्वर[2] दिसतो. स्वामीस कळावें म्हाणोन लिहिलें आहे. दुसरें आणीक वर्तमान मालवियातून कासद आले त्यानी सांगितलें कीं मीरमानीखान अमील शाहाजांपूर यांनीं कमाविसदाराचें ठाणें जवळपास होतें त्यावर धाऊन ठाणें मारलें. कमाविसदार मारला. हें वर्तमान राजश्री मल्हारजी होलकर व रानोजी सिंदे यांस कळलें. हे जलदी करून धावले. तों मीरमानीखां ठाणें मारून फिरून आपलें मकाणास जात होते तों यासी त्यासी गांठ वाटेंत पडली. येक प्रहार लढाई जाली. मीरमानीखां जित धरिला. फौज अवघी लुटून घेतली. दोन लाख रुपये देत होता कीं मजला सोडणें. यांनीं म्हटलें कीं आमचा कमाविसदार मारला आहे, रुपये घेऊन काय करावें? त्याचा बदला घेऊन. ऐसे म्हणोन मीरमानीखानास जीवें मारिलें ऐसें वर्तमान कासदांहीं सांगितलें. स्वामीस कळावें म्हणून लिहिलें आहे. येथें शहरांत शहरपन्हा[3] मऱ्हामत करून तोफा वरत्या चढवितात. जागां जागां खबरदारी करितात. किल्ले अर्कामध्यें तोफा व दारुगोळी बहुत आहे त्याची मोजदाद पाहून दुरुस्त करितात. नवी निगादास्त बरकंदाज शहरचे रखवालीस पांच हजार ठेवायाची आज्ञा आहे ऐसे येथील वर्तमान आहे. पुढें जें वर्तमान होईल तें लेहून पाठवीन. आपलें वर्तमान बहुत दिवस कांहीं कळलें नाहीं तर सविस्तर लिहून पाठवीत जाणें. येथेंहि फौज वीसहजारीपर्यंत भारी मातबर आहे. राजश्री सुमंत छ १६ साबानीं लष्करांत दाखल जालें. आपणांस कळावें म्हणून लिहिलें असें. आतां बिगाडाचा डौल कुल जाला आहे. बिघाड होणें मात्र बाकी आहे. याजवर आपण जो विचार केला असेल तो बराच केला असेल. आपणांपाशींहि फौज मातबरच असें. अबदुल अजीजखानास येथें ठेवावयास आज्ञा आली आहे. अनवरुल्लाखानहि येथेंच राहिले आहेत, यांजवर आपण बरें सावध असलयाने बरें आहे. आपल्या प्रांताकडे किलुयाची बंदोबस्ती केल्याने बरे आहे. आम्ही वर्तमान ऐकिलें लिहिलें आहे. याजवर स्वामीची इच्छा. येंदा नवाबासमागमें फौज सत्तर हजार तमाम भारी चांगली व सवारें हातनाला व जेज्यायेलाचे व बाणाचे व

---

१ स्वारीचा पुढील मुकामास गेलेला डेरा. २ विचित्र. ३ शहरचा कोट.
४ दुरुस्त. ५ अर्क किल्ला. बाले किल्ला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सुतरनालाचे उंट मिळून तीन हजार आहेत. याजवेगळें नवीनिगादास्त तिघेजण करितात. नवाब खुद्द व गाजुद्दीखान नवाबचा पुत्र व राये नवनिध ऐसें तिघेजण करितात. व जेथं वासरजंग नित्य शें दीडशें दोनशें स्वारपर्यंत नित्य नवी ठेवितात याप्रकारचें वर्तमान आहे. चंद्रसेनास व तसे मोहदीखान वगैरे यास हैदराबादेच्या तहीआंत (?) केलें आहे. मीरमुल्लादुदाखान भागानगरीं चार हजार फौजेनशीं होता त्यास नवाबांनीं बोलाविलें आहे. तोहि आणखी पंधरा दिवसा बराणपूर प्रांतें येईल. नवाब कोठे आहेत तसें वर्तमान हें तों स्वामीजवळ आलेंच असेल, येत असेल. वरचेवर मागूनहि वर्तमान सविस्तर सेवेसी लिहून पाठवीन. बहूत काय लिहिणें लोभ असो दीजे हें विनंती.

काशिदास अजुरा लिहून दिधला आहे तो दिधला पाहिजे. पुढें काय आज्ञा ? उत्तर आज्ञा कराल तर वर्तमान पावतें होईल, यावर जे आज्ञा. हे विनंती.

¶*Mahipat Anandrao Sumant writes to Chimaji Appa news from Aurangabad about the colossal preparations of the Nizam and his son Nasirjung with an end to finally put down Maratha activities. The letter is very significant as regards the position of the two hostile parties.*

No. 59] [*24-12-1737*

पो १४ रमजान

जाब

श्रीगजानन प्रसन्न

श्रीमंत राजश्री चिमणाजी आपा स्वामीचे सेवेसी

सेवक महिपत आनंदराव[1] कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत तारीख पुष्य शुद्ध चतुर्दशी तिसरा प्रहर शनिवारपर्यंत जाणून स्वकीये कुशल लेखन करावें. यानंतर स्वामींनीं पत्र पाठविलें पावलें, लिहिलें वर्तमान कळूं आलें. ऐसेंच सर्वदां पत्र पाठवीत गेलें पाहिजे. जामनेर वरणगाऊ परगणा तीर्थरूपाचा आहे. स्वामीचा व त्याचा दुसरा विचार नाहीं त्या परगणियांत स्वामी आहेत, हितास येईल तें केलें पाहिजे. येथील वर्तमान तर राजश्री राघोजी भोंसले याजवर चालून मीर शमसुद्दीखान बक्षी तीन हजार स्वार नवाब नासरजंग व रिसालदार बक्षी व मनसबदार वगैरे च्यार हजार ऐसें मिळून सात हजार स्वारानशीं आज रुखसत केला. आज हरसुलावर उतरणार. अबदुल

---

१ सुमंत.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अजिजखानहि दोचौ रोजांत येतात. बहिरजी सलगर व गिरजोजी हरके च्यारशें पांचशें स्वारांनशीं आले. मुलाजमत[1] जालीं. नांदेडामध्यें मिरमोमिनखान आले आहे त्यास तिकडे तीर्थरूप राजश्री व्यासराऊ बफौजें[2] आहेत. त्यास मीर मोमीनखानानें लिहिलें होतें कीं नांदेड कसबियास हे उपद्रव देणार. त्यास येथून मदत तीनशे स्वार व च्यारशें बरकंदाज मदत पाठविला. नवाब निजामन-मुलु(क) दुराह्यापलीकडे छ ३० साबानी दाहा कोस पलीकडे होते. राजश्री पंत प्रधानासी व नवाबासी तिसा पस्तिसा कोसाचा अंतराये उरला आहे; हेही नवा(बा)स सुजायेतखानाचें वर्तमान कळलियावर जे आज्ञा येईल त्याप्रमाणेंच वर्तणूक करितील. पूर्वी पत्रे नवाबाची नासरजंगास आली होती कीं तुम्ही हुजूर येणे. येथे औरंगाबादेस सुभेदारीस मुतवसलखानास ठेवावा, त्यास आलीकडे वराड प्रांतीं ऐसें वर्तमान आलें याजनिमित्य नवाबाचे उत्तराचा मार्ग लक्षितात. पुढें हे नवाबांकडे चाललियानें स्वामीचा निर्देश[3] काय आहे? कोणीकडे रोंख होणार? हें सविस्तर लिहिलें पाहिजे. याजपाशीं फौज बरी मातबर आहे. कांहीं नवदा(द)हा कालपर्यंत सलुखाचा पैगाम[4] कांहीं नाहीं. मग येथें आल्यानंतर सेवेसी सविस्तर लिहीन. विदित होय हे विज्ञाप्ति. छ १२ रमजान.

¶*Mahipatrao Sumant writes to Chimaji Appa news of the movements and activities of Bajirao and Nizam-ul-mulk and his son Nasirjung.*

No. 60] [*Dec. 1737?*

श्री

पुरवणी श्रीमत पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना (ब)हुत सोखी करीत आहे. जर स्वामीची फौज यावयावसी चार दिवस विलंब जाहला तर येमुना उतरोन कालींजरपावेतो मुलुक मारील याजकरितां इकडील पेरवी[5] सत्वर केली पाहिजे. वरकड जमीदार बिंधवासनीपासून अहित त्याजवरी सलाबत[6] घातली आहे. कोणी भेटीस गेले. कोणी वकील पाठविले. जागा खाली आहे. त्यासी सत्वर राजेश्री आवजी कवडे बघेलखंड प्रांते आले ह्मणजे त्यास हि सलाबत पडेल आणि तमाम जमीदार स्वामीचे होतील;

---

१ भेट. २ फौजेसुद्धां. ३ हुकूम.
४ बोलणें. संधान. ५ बंदोबरत. ६ दाबदबाव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाहींतरी नवाब आलीकडे उतरोन तमाम गढी घेऊन जागा दे[1]स्त केली तरी मेहनत करणे येईल. याजकरितां अगोधर आपली फौज जाऊन जमीदार हाती घेऊन दस्त जाहाला म्हणजे ते जमीदार मोगलासी हरगाह सला करणार नाहीं. तूर्त ऐवज हुंडी सेवेसी पाठविली आहेत. ५ राजश्री बाबूजी नाईक अबाजी नाईक जोसी याजवरी रुपये १०८०६५

जागिरीचे ऐवजी यैन हुंडणावल सिवाई. वोलाचा हिसेब अलाहिदा आहे.

६२०००	बाकी सन १७९४ पैकीं ४०००० किता २२००० ——— ६२०००	१०२०	बदरेठावाा सन १७९३ पैकीं
३५०००	जागिरीचे रहिलीचीं आहे त्याचा वसूल सन १७९५ पैकीं	६५०	मौजे झरी गुाा राजे महासिंग सन १७९४ पैकीं
———		७०००	सकुराबाद सन १७९३ पैकीं
९७०००		———	
		८६७०	
			पैकीं वजा हुंडणावळ रुपये ६०५ बाकी.

जागीर लक्ष्मणसिंग पैकी ३००० रुपये ऐन. हुंडी रुपये ८०६५ येणेंप्रमाणे हुंडी पाठविली आहेत. पावलिया आज्ञापत्रे सादर केले पाहिजे. या हुंडीचे मागोमाग दुसरा ऐवज पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer warns the Peshwa that the longer absence of his army would seriously imperil his position and would embolden the Nawab to march upon the stronghold of Kalinjar. Some of the local magnates, he adds, have already offered their allegiance to the Nawab. The writer further sends hundis for supply of funds.

No. 61] *[Dec. 1737?*

श्री

राजश्री रामचंद्रबावा गो-
सांवी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराव रामराम विनंती येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आम्ही इकडे

१ काबीज; जप्त.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राहिलो. नरवरच्या मामलियास चिरंजीव राजश्री सुलतानजी जाधव यांस दोनसे स्वारानिसी पाठविले होते त्यास जागडे हरामजादे याणी फौजबंदी करून त्याजला दोन आडीच महिने आमल न दिल्हा. तेव्हा राजश्री गोपालसिंग जाधव करोलीकर व राजश्री खांडेराये याचे पुत्र नवलराम बिजेपूर याणी बहुत प्रकारें खासा आंगे हजार स्वार व दोन च्यार सहस्र बरखंदाज घेऊन येऊन त्याचा रेचे[1] मोडला. जिवेप्राणे उभे राहिले, तेव्हा त्याणी अमल दिल्हा तह केला. ऐसियासी गोपालसिंग जाधव व नवलराम सर्व प्रकारे आम्हासी घरोबा धरून जिवे प्राणे उभे राहिले येसीयासी आपण त्या प्रांतातून जातील आगर येतील त्यास जाधव आणि बिजेपूर जागा आमची आहे सर्व प्रकारे त्याची रखवाली करविली पाहिजे. आपण तो करितील हा भरवसा आहे. राजश्री गोपालसिंग व नवलराम हे बहुत प्रकारे कार्यास आले. आम्ही तिकडे नसतां त्याणी त्याचा दावा कबूल करून नरवरचे काम करून दिल्हे. यैसियासी त्याविसी नजर आम्हावरी देऊन त्याचे चालवावे. कोणेविसी त्यास तोसीस न लागे यैसे केले पाहिजे. रा छ २० सफर बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Ramchandrababa, asking him not to molest his possession of Narwar.*

No. 62] *[1737 ?*

श्री

राजश्री चिमणाजीपंत आपा गोसांवी यांसी

॥ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजमान्ये श्नो[+] पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणऊन स्वकुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री रायाची पत्रे व रा गोविंद हरी आले. सविस्तर वृत कलो आले. त्याचा विचार येकच आहे प्रस्तुत काळी निकाल काढून तेथून निघावे यैसे आपण त्याचे उत्तर लिाच आहेत उतमच आहे. आम्ही या आठा रोजांत जाऊ त्याजवली पोहचतच आहो. भेटी जालियावर राजश्री आबाजीपंत तात्याच्या आमच्या विचारें विचार जो उतम

+ येथें पिलाजीचा शिक्का.

१ हड्डी नरम केली.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दिसेल तो करून. वरकड कितेक वृत रा। गोविंदपंत सांगतां कलो येईल. उदैक संध्याकाळी अगर परवा दो प्रहरा राजश्री स्वामींचे उतर येईल, त्या प्रा। स्वार होऊन आपले भेटीस येतो. जरी इकडून जावयाची आज्ञा आली तरी नांदेडी-यावरून याच मार्गे भेटी घेऊन जाऊन. नाहीतरी भेटी घेऊन सातारियास जाणें जाले तरी भेटी घेऊन जाऊन, बहूत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. राजश्री रायासी दुसरी पुरवणी लिहावी कीं मसलत तो कठीण पडली; परंतु उताविली न करावी. समागमी दुसरे आले त्यानी निकाल काढिला तरी आपणास सहजच मोकलीक जाली. नाहीं तर जैसा उभयेताच्या विचारें निकाल निघेल तो काढावा यैसे लिहावें हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Chimaji Appa : communicates to him Bajirao's news.*

No. 63] [*7-1-1738*

छ ३ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेबांचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक शंकराजी निकम सां। दंडवत विज्ञाप्ति येसिजे. साहेबांचे कृपावलोकनेकरून सेवकाचें व पागेचें वर्तमान ता। पुश वद्ये १३ त्रियोदसी मंदवासरपरियेंत क्षेमरूप आसो. यानंतरी मामलतीचे वर्तमान तरी आवंदा प्रजेन्यवृष्टं थोडी जाली. याजमुळें तमाम गाव वैरान जाले. नेवास परगणियांतील पन्नास गाव केवल उठून गेले. वैजापूर परगणियांतील गाव वीस व गांडापूर परगना तो आर्धा केवल निर्मानसी गाव जाले. सिवारांत[1] सेती येक दाना बीजाचा गेला नाही. कितेक गाव पेरले होते ते केवल बीज बुडाले. येसा ईस्वरें कोप केला आहे. त्यास युग्तीने वसूल घेतला पाहिजे. दिवस बहुत जबून[2] आहेत. साहेबाचे कृपेकरून येका दो मासात वसूल घेतले. यानंतरी शहरचें वर्तमान तरी सेवकाचे कारकून हिरजुलाखान वैजापुरचे जागीरदार हफीजुदीखान याचे भावाकडे गेले होते. त्यास नवाबाचे लस्करांतून कागद हिरजुलाखानास आले होते. त्याणी स्वमुखे वर्तमान सांगतल की श्रीमंत राजश्री पंतप्रधान सहिबासी नवाबसाहिबासीं युध्यप्रसंग येक वेल जाला. त्याजवरी बोली लागली आहे कीं माळव्ये प्रांतीचे बिलमुक्ता[3] नवाब निजामनमुलीक

---

१ गांवच्या जमिनींत. २ भिकार. ३ मक्त्याप्रमाणें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रूपये पासंष्ट लाक रूपये देतात. श्रीमंत साहेब पच्यासी लाख रूपये मागतात येसे लिहिले आहे. इतकियावरी सत्य मिथ्या इस्वर जाणे. शहरीहून नवाब नासरजंग व तमाम मनसबदार कूच करून पाल म्हणोन गाव फुलंबरीनजीक आहे तेथ जाऊन मुकाम केला आहे. वार्ता आहे कीं आजनठावरून बऱ्हांन-पुरास जाणार आहे. साहेबास तो बातमी असल. परंतु येकिल वर्तमान सेवेसीं लिा आहे त्यानंतरी पुरवी आज्ञापत्र आले होते की जमावानसी सिध राहणें, आज्ञापत्र पाठऊन ते समई येऊन पोहचणें त्याजवरून जमावाची सिधता करून आज्ञापत्राचा मार्ग लक्षितो. ज्या रोखे आज्ञा कराल ते स्थली येऊन पोहचतो. ये प्रांती आवंदा आर्फत[१] बहुत आहे. याजमुलें वसूल युगतीने या महिनियांत घेतला पाहिजे. जागीरदाराची जमाबंदिया जाल्या आहेत. याजकरिता त्वरा करून वसूल आगोधर घेतला पाहिजे यैसा प्रसंग आहे. त्यावरी आगत्ये जरूरच असेल तरी त्वरेने आज्ञा लेहून पाठविली पाहिजे. जमावानसी येऊन पोहचोन. साहेबाचे आज्ञांपेक्षा येथील काये विशेष नाहीं. चेरनारविंदा-पासीं चाकरीचे सार्थक आहे. आज्ञा होईल तेणेप्रो वर्तनूक करून. सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Shankraji Nikam to Chimaji Appa, giving a description of the desolated state of the Newasa, Gandapur and Vaijapur parganas on account of the famine of 1737-38.*

No. 64] *[22-1-1738 ?*

श्री

श्रियासह विराजमान श्रीमंतु राजश्री

चिमाजीराऊ गोसावी यासीं

ꣲ विनंती. श्नेहेंकित मालजी चव्हाण कृतानेक दंडवत विज्ञापना प्रार्थना यैसजे. येथील कुषल तागायत छ १२ माहे सवाल पावेतों येथास्थित जाणून स्वकीये लेखन कराविया अज्ञा केली पाहिजे. यानंतरे राजश्री राऊ मुख्ये प्राधान मुलुकगिरीस गेले होते त्यामधें व तिकडील तांब्रामधें युध्ये प्रसंग जाहाला. लोक फार खस्त[२] होऊन पडिले. नामांकित लोक ठार जाहाले म्हणऊन वर्तमान परस्परें ऐकितों. याकरितां चितास समाधान वाटत नाहीं, तरीं आपणांकडील

---

१ दुष्काळ. २ ठार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सकल अर्थ कळावे यास्तव हें पत्र लिहिणें लागलें. तरी तिकडील सकल अर्थ व आपण कोणे ठिकाणी आहां, मनसबा काये योजिला, हे अवघे सकलार्थ लेहया (लेहावया) आग्ना (आज्ञा) केली पाहिजे. आपणांकडील पत्र आलेवरून समाधान होईल. इकडील वर्तमान तरी आपणांस परस्परें कळतच असेल. कृपा वर्धमान केली पाहिजे. हे +वीनती.

¶*Malji Chavan to Chimaji Appa, inquiring as to the actual state of things in the fight that took place between Bajirao and the Moghuls.*

No. 65] [*24-1-1738*

श्री

राजश्री सदासिवपंत भाऊ गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकर अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम माघ शुध पुर्णिमा मुा. नजीक भुपाल जाणून स्वकीये लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन परामर्ष होत नाही. याकरितां चित्त सापेक्ष आहे. सदैव पत्री दर्शनाचा लाभ देऊन परामर्ष करीत असावें. ईकडील वर्तमान श्रीमंत व आम्ही मुकाम मजकुरास आलो. राजश्री मल्हारबा व राजश्री राणबा कोब्यावरी आहेत. त्याकडील वर्तमान श्रीमंतानी आपल्यास लिहिले असेल. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

(मोर्तब सुद.)

¶*Pilaji Jadhao to Sadashivrao Bhau from Bhopal with compliments.*

No. 66] [*Jan. 1738*

[आरंभीचा मजकूर गाहाळ]

गमे सेवेसी पाा आहेत. घेतले * * * * * ज्या मुकामी येऊन पाो * * * * मुकाम लिहून पाठवावा. त्याप्रमाणे यास अजुरा देणे लागेल. वरकड वर्तमान तर पोस वदी १२ चे दिवसी तांब्राचे सैन्यामध्ये धान्याची व तृणाची महर्गता फार जाली. दीड रुपये सेर धान्याचा

\+ हा शब्द बालबोधींत आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

भाव जाला. त्याजउपर दुसरे दिवसी राजश्री आनंदराव याणी राजश्री पिलाजी जाधवराव यास आणावे ऐसे निश्चय केला. त्याजवर सैदलस्करखां व अनवरखां दोघेजण सामोरे जाऊन राजश्री पिलाजी जाधवराव यास घेऊन आले. खिलावर्ती जालियावर माघारे लस्करांत गेले. मग रस्त पाठऊन दिल्ही. ते दिवसी सायेकाळीं तांब्राचे सैन्यात वीस सेर, धारण जाली. याप्रकारे सला जाला. म्हणून लिहि[१]ली बाजारांत लोकाचेथे आली आहेत. परंतु डौल सलियाचा कोणे प्रकारे पडि(ला हे लि)हिले आले नाही. मागाहून आणखी (अपूर्ण)

¶*As advised by Anandrao Sumant, Saidlashkarkhan and Anwarkhan are deputed to bring Pilaji Jadhao into the camp of the Nizam to settle negotiations. The first and last parts of the letter are missing.*

No. 67] [*Jan.-Feb. 1738?*

श्री

पुरवणी रा। विसाजी दादाजी विनंती उपरी. येथें वर्तमान आइकतो कीं रा। पंतप्रधान यासीं सात हजारी व रा। चिमाजी आपा पंच हजारी यैसें तहकीक सराफाचे दुकानी लि। आली आहेत. तरी याचा विचार काये तो लिहिला पाहिजे. आमदाबाजेच्या सराफांची लिहिली आली आहेत की उभयता मिलोन बारा हजारी मनसब आली आहे. पृथ्वीपतीचेंहि पत्र आले आहे यैसें म्हणतात. कलले पाहिजे. बहु+त काय लिहिणे हे वीनंती.

¶*Addressed to Visaji Dadaji. The writer hears the news that Bajirao and Chimaji Appa have been created commanders of seven and five thousand respectively by the Emperor.*

No. 68] [*6-2-1738*

छ १८ जिल्हेज.

श्री

राजश्री आपा स्वामी गोसावी यांसी.

ꣳ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित येशवंतराव पवार कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २७ माहे सवाल मुकाम ना। कोटे स्वामीच्या आशीर्वादें करून

---

१ पत्रे

+ हा मजकूर बाळबोधींत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

क्षेम असों विशेष. स्वामीकडून पत्र येऊन परामृष होत नहोता, तेणेंकरून चित्तास समाधान नहोतें. त्यास प्रस्तुत छ २१ रोजीं स्वामीचें पत्र आलें तें पावोन परम समाधान जालें. ऐसेंच निरंतर पत्रीं सांभाळ करीत असिलें पाहिजे. ऐशियास या प्रांतीचें वृत्त तरी निजामन्मुलुक सडा हस्तनापुरास गेला. आम्ही मजल दरमजल श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीसमागमें कोट्या प्रांतास आलो. कुली परगणा लुटून नेस्तनाबूद केला. तेव्हां कोटेकर माहाराव हाडा[1] गडगांगरुणीस पळोन गेला होता, तेथूत रसायेणासें[2] वेदमूर्ति वेणीराम भट पाठविला. खंडणी रुपये दाहा लक्ष द्यावे ऐसा करार केला. प्रस्तुत सदहूं ऐवज यावयास च्यार रोज लागतील. रुपये हातास आलियानंतरी वोडसे दतियाकडे जावें थैसा करार आहे. स्वामीस विदित जाहलें पाहिजे. लोभ[+] असो द्यावा हें विनंती.

¶*Yashavantrao Pawar writes to Chimaji Appa of his arrival at Kotah with Bajirao.*

No. 69] [*3-6-1738 ?*

पो छ २३ सफर

श्री

राजश्री बाळाजी पंत बाबा गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २९ मोहरम मुाा कुरवाई भोवरासे जाणूत स्वकीयें लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. या प्रांतीचे वर्तमान तरी कोट्याकडून अहिराचे मुलकांत आलों. आहीर बाहीर काढून ठाणी घेतली. प्रस्तुत कुरवाईस मोर्चे लाविले आहेत. बाहरील शाहरपना घेतला. कोट मात्र राहिला आहे; तोहि हस्तगत लौकरीच होईल. बुंधेले उभैता भेटीस आले आहेत. वरकड वर्तमान राजश्री पंत प्रधान याणी राजश्री चिमाजीपंत आपा याचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. विशेष काय लिहिणें? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao writes to Bajirao's son Nana Saheb giving him news of his fighting in Ahirwada.*

---

१ रजपूत जातीचें नांव. २ समजूत. सलूख.

\+ अक्षर निराळें. पत्रावर पवाराचा शिक्का व मोर्तब आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 70] [27-6-1738 ?

श्री

श्रीमंत राजश्री • आपा
स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक शामजी गोविंद सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। आखाड वद्य ७ भोमवारपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे. यानंतर येथील वर्तमान माहादजी व खंडोजी जासूद याबा।र विनंती पत्रीं लि॥ आहे. ती पत्रे पावलीच आसतील. आलीकडे राजश्री बाबूरावजीकडून हस्तनापुरीहून पत्रे तीन बंद आलीं ती बजिनस सेवेसी पाठविली आहेत. पत्रार्थाप्रा। उतरे विस्तरे सादर करणार स्वामी खावंद आहेत. उतरे सत्वर आलिया हस्तनापुरास मुजरद कासदा बा।र सेवक रवाना करील. नवाब सैदजमालखां याचे जागिरीचे इजारियाविसी पूर्वी लि॥ आहे. व हली राजश्री रावजीनी लि॥ आहे, त्याप्रा। पारपत्य करणार साहेब आहेत. व पूर्वी मुजरद कासदाबा।र चंद्रसेन जाधवराऊ व विरापा माहाजन याजकडे कर्जाचा यैवज येणे. यास्तव विनंती लि॥ आहे. त्याप्रा। पत्रे ताकिदीची पाठविणार स्वामी समर्थ आहेत. आरब सिदी याणी प्रस्तुत आपण व जोतीपंतासीं आतिशये कजिया केला आहे. आबरूवर गोष्ट आली आहे ते लि॥ पुरवत नाही. विस्तरे विनंती पूर्वी लि॥ आहे. त्याप्रा। त्याचा वीसरोजा राहिला असलिया सवासाशाचा कजिया पाचशावर चुकविला आहे. पाचशे रुपये द्यावया आज्ञा अगर वीस रोजा राहिला नाहीं, इा। नोकरी ता। रुसरवती आपला हक भरून पावलो यैसी कबज असली तर ते कबज व नासरजंग सैफुलाखान कोतवाल यासीं पत्रे उभयतांस हकनाहक मुजाइम[१] होतात. त्यास ताकीद करून मुजाइम न होत ते करणे, यैसी पत्रें मुजरद येक चोपदाराबा।र सदर करणार स्वामी समर्थ आहेत. विनंतीप्रा। पारपत्यास दिरंग लागला म्हणजे आमची अबरू राहात नाहीं. सेवक युक्तिप्रयुक्तीस चुकला नाहीं. परंतु नासमज माणसांसी काम पडलें आहे. काजीकोतवालास खातरेस आणीत नाहीं सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Shyamji Govind (Takle), Peshwa's agent with the Nizam, writes to Chimaji Appa about various monetary transactions and asks orders.*

---

१ प्रतिबंध.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 71] [9-2-1739

श्री

आशीर्वाद उपरी. राजश्री बाबूराव मल्हार याची पत्रे छ १० जिलकादची आली होती. तीं आपणाकडे पाठविलीं, ती पावलीच असतील. सांप्रत रा। वेंकाजीराम याची पत्रे दोन एक माघ शु॥ सप्तमीचे व दुसरे पत्र एकादसीचे ऐशीं दोन आलीं. त्याच्या नकला पाठविल्या आहेत. त्यावरून वर्तमान कळेल. तोहमास्तकुलीखांनाचे फौजेत व महमदशाहाचे फौजात युध्य जाहले. कृपाराम पळून आला आणि कुरुक्षत्रीहून पत्र आल्याचा मजकूर पहिल्या पत्री लि॥ आहे हे खरेच. परंतु मेले कोण, राहिले कोण, तत्वता[1] नाही. जो पळून येतो तो औघेच वारले म्हणतो. परंतु लिहिले पुसिले येईल ते खरे. दुसऱ्या पत्री लिहिले आहे तेही खरे कशावरून मानावे? राजश्री बाबुरायाचे पत्र येईल ते खरे. मुख्य गोष्ट पातशाही गर्दी[2] जाहली आहे हे खरे. कागदपत्रहि चालत नाही. मागाहून तत्वता येईल वर्तमान ते लिहून पाठऊ. लोभ असो दीजे हे आशीर्वाद+.

¶*Letter of Bajirao to his brother Chimaji Appa giving news of Nadirshah's invasion of Delhi in the early months of 1739.*

No. 72] [पा॥ 31-3-1739

छ २ मोहरम.

आसीर्वाद उपरी. आम्हीं अतःपर बऱ्हानपुरापुढें जात नाही. बऱ्हानपुराजवलच मुकाम करून राहून खानदेश प्रांताचा बंदोबस्त करितों. आपण कोंकणातील कार्यभाग उरकून फौज घाटावरी पाठऊन मुलकाचा बंदोबस्त करावा. वसईचा प्रसंग उरकून आपण लौकर घाटावरी यावें. पागेची पथके घाटावर आम्हाकडे पाठवावीं. जागा जागा परगणियांत ठेऊन बंदोबस्त केला जाईल. डाक नासिकपावेतो रावताची बसविली याजबराबरी दिनप्रतिदिनी वर्तमान ल्याहावे. नासिकापासून डाक बरवाजी ताकपीर याची आहे. चहूदिवसीं वर्तमान तुमचे आम्हास पोहचेल. आमचे तुम्हांस पावतें करणें. × आपा!

---

१ तहकीक, खरी बातमी. २ क्रांति. + बाजीरावाच्या हातचीं अक्षरें. ¶ बाजीरावाचें पत्र चिमाजी आपास. नादीरशाहाची स्वारी स. १७३९ फेब्रुवारी ते एप्रिल. × येथून अक्षर बाजीरावाचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परराज्य राहिले तरी सर्वांवरी आहे. त्यास फार विचार मनांत न आणिता इकडील कार्याची पैरवी मनांत आणून कर्तव्य ते करावे. आम्ही बेवकूप, परंतु आपणच विचार करणे (तो करावा) आम्हास सुच(ले ते लि)हिले असे.

¶*Bajirao asks his brother Chimaji to finish up the Bassein business and send him reinforcements post haste : "Remember the magnitude of the situation. If the new invader (Nadirshah) roots himself in the soil it will be disastrous for all. But you appreciate the danger better than I can explain to you."*

No. 73] [*March 1739*

नकल

श्री

राजकी वर्तमान तरी तहमासकुलीखानासी दोन लडाया जाहाल्या. उभयतांकडील तीस हजार माणूस मेलें. खानदौराखां बिरादरीसुधा[1] मेला. सादतखान पाडाऊ करून नेला. त्याजवरी सला च्यार रोज विस्वास दाखऊन महमदशाहा व निजामनमुलूक कमर्दीखान यांसी कैद केले. फौज कुल लुटून घेतली. सादतखानास चाकर ठेऊन बा। फौज देऊन रवाना केले. त्यानी पानिपत शहर लुटले. करोडी रुपयाचा माल लुटला. काबिले बाटविले. तेथून दिलीस आले. तेथें येक प्रहर लडाई किल्यासीं जाहाली. तों दिलीमध्यें गुंडेयाहीं[2] लूट आरंभिली. तेव्हा लोक कौलांस[3] आले. सादतखान दिलीदाखल होऊन नादरशाहाची द्वाही फिरविली. गजसिका चालिला. पातशाहा गर्दी जाहाली. ते वर्तमान शहरी आलें. येथेंहि प्रलये जाहाला आहे.

¶*News-letter from Aurangabad to Poona, referring to Nadirshah's invasion.*

No. 74] [*4-4-1739 ?*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री तुबाजीपंत स्वामी गोसावी यांसी पो बाजीराऊ बलाल प्रधान नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून आपणांकडील कुशल लिहित जाणें विषेश. तुमची पत्रें आली ती प्रविष्ट जाहाली. तिहि

---

१ भावाबंदासहित. २ गुंडांनीं. ३ शरण.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्थलांचा मजकूर लिहिला तों कलला. यैसियांस स्थलांचा पैगम केला, उत्तम केला. परंतु कार्य येव्हांच करावें यैसे नाहीं. काये निमित्य की नासरजंग भागानगरास गेला होता तो पुन्हा या प्रांतें येतो. त्याची आमची भेटी होऊन त्यास विचारांत घ्यावा, कांही आपलें कार्यहि त्याजपासून करून घ्यावें यैसा विचार आहे. आणि प्रस्तुत या स्थलांचे कार्य केलें तरी आधीच आमल उठविला याजवरून त्याच्या चितांत भये व संकोच प्राप्त जाहला आहें. स्थलांचे कार्य सध्या केल्यांस त्याच्या चितांत वसवास[1] पुर्तीच निर्माण होईल. यास्तव तूर्त कार्य ठीक करून ठेवावें. किलेदार आपलें चाकरच यैसेच करून आपल्या विचारांत आणून जेव्हां कार्य करू म्हणू तेव्हा होयें यैसे आनसुंधान ठीक करून ठेवावें. नासरजंग आपल्या लगामी लागला तरी उतमच जालें. स्थलें आपलींच आहेंत. तो लगामी न लागें आणि आपलें कार्य न होयें तेव्हा यासच ठिकाणी लावावयाचा उपायें करून ठिकाणी लाविला म्हणजे सारीच स्थलें आपलें पदरी पडतील. तेव्हा तिहीचाच मजकूर काये आहे? सारांश तूर्त अनुसंधान ठीक करून सारा दोरा राजश्री मल्हारपंत यांचे हातीं देऊन तुम्ही स्वार होऊन आम्हाकडे येणें. लोभ असों दीजें हे विनंती. रा। छ ६ सफर.

¶*Bajirao writes to Tubajipant that he should proceed very cautiously so as not to alarm unnecessarily Nasirjung with whom friendly negotiations had already been opened. Severe measures should be resorted to only in case Nasirjang was unfavourably inclined towards the Poona Government.*

No. 75] [पौ. *6-4-1739*

१/२

पौ छ ८ मोहरम.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बापूजीपंत स्वामी गोसावी यासी

पो बाजीराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित गेलें पाहिजे विशेष. सांप्रत तुमचे पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. तरी सविस्तर लेहून पाठविलें पाहिजें. या नंतर उतरेकडील वर्तमान तरी, तोहमास्तकुलीखांन लाहूर घेऊन पुढें आला. दिलीहून महमदशाहा

---

१ भीति. Fearful, suspicious.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पातशाहां आमीरसहवर्तमान चालीस पनांस कोस पुढे गेले होते, येक दोन लडाया सामान्यच जाल्या. त्यावर तोहमास्तकुलीखान याची कजलबासांची फौज सादतखानाचे बुनगें खजाना येत होता त्यावर चालोन आली. शादतखान आगोधर पातशाही भेटीस आलें होते. त्यास फौजेचे वर्तमान कलताच खानदौरा व सादतखान त्यावर गेलें. लडाई मोठी मातबर जाली. ते समई सादतखान यास जिवंत धरून नेलें. खानदवरा त्याचे येक भाऊ व लेक समेत मृत्य पावलें. उमदे उमदे लोक बहुत पडिले आणखी लस्करचें माणूस पाचसात हजार रणीं पडिलें. थैसे युध्य जाहाल्यावरी दिलीचे फौजेने मोठी धास्ती घेतली. त्याचा जोरा बहुत पाहून निजामनमुलुक याणी सख्याचा संदर्भ लाऊन आपण जाऊन भेटले. पातशाहास धरून द्यावें आणि आपले बरे करून घ्यावें हे दुष्ट बुधि चितांत आणून पातशाहासहि तोहमास्तकुलीच्या डेरियास घेऊन जाऊन भेट केली. भेटी जाहालियावर फिरून आपल्या डेरियास आले. दुसरे दिवशी तोहमास्तकुलीखान महमदशाहा पातशाहाच्या डेरियास आले तेंचसमई महमद-शाहास कैद केलें. निजमनमुलुक व कमरदीखांन यासहि कैद केलें. कुलपातशाहाचें व आमिरांचे कारखानें जफ्त केलें. सादतखान या बराबरी आपली फौज देऊन दिलीस पाठविले. तेथे आपली द्वांही फिरविली. मागाहून आपणहि दिलीस दाखल जाहालें. दिलीची पातशाही येकायेकीच बुडाली. या उपरी दक्षणेस चाल करणांर. मोठे आरिष्ट आहे; याची आगोधर तरतूद व पैरवी करावी. आणि मातबर फौज जमा करून हिंदुस्थांनची फौज सामील करून घ्यावीं आणि चंमेलीपलीकडेच लडाई घालून तिकडेच गुंतवावें. ईकडे पराश्रम होऊ देऊ नये. याजकरिता ये गोष्टीची तरतूद करणे ते करीत आसों. ब्ऱ्हाणपुरीच मुकाम आहे राजश्री स्वामीस विनंतिपत्रें फौज सामील व्हावयाविसी पाठविली आहेत. गड किलियास सामान करावा लागतो. तरी तुम्ही पाच हजार रुपये पावेतो (पुढीलबंद गहाळ)

¶*This is an important letter written by Bajirao to Bapuji Shripat about Nadirshah's attack on Delhi. The last half of the letter is unfortunately missing. He first describes how Khan Dauran and Sadatkhan were completely defeated by Nadirshah and how he aroused terror in Delhi by confining the Emperor and his ministers and by confiscating all their belongings. Bajirao proposes to prepare for action by collecting all his forces and to encounter him on the other side of the Chambal. The addressee is asked to approach the King and request him to issue orders for the mobilisation of the army and to remit some money.*

---

१ प्रवेश.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 76]

[*7-4-1739*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
शेवेसी

विनंती सेवक मलार दादाजी सां नमस्कार विनंती ता छ ९ मोहरमपर्यंत सकल वर्तमान स्वामीचे कृपादृष्टीकरून यथास्थित असे विशेष. चिरंजीव रा बाबूराऊ[१] यांजकडून कासीद जोडी दोन जयनगराहून येथे आले. स्वामीचे नावें लाखोटे याजपासीं आहेत. आम्हास तों चिरंजिवाचे पत्र नाहीं अथवा आणिक कोंणाचे नाहीं. श्रीमंत राजश्री रायांचे लस्करांतूनच हे कासीद आले. त्यांचेहि पत्र आम्हास नाही हस्तनापुराकडील वर्तमान तहकीक कांहीं न कललें. कासिदांस जबानी पुसिलें. त्याणी सांगितले की तोहमषकुली दिलीस आला होता, त्यास मारिले, महमदशा तख्ती बसोन द्वाही फिरविली येसें वर्तमान सांगितलें. परंतु लेख दृष्टीने पाहिला नाहीं यावरून चितास निश्चय न कले. निमित्य सेवेसी विनंती लिहिली असे. साकल्य वृत लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. नासिकचे वर्तमान काल दोन पत्रीं लिहिलें आहे त्यावरून निवेदन जाले असेल. का वणी येथे मोगलाचे ठाणे होते ते टाकून गेले. निमित्य आम्ही आपले लोक व रा कालोजी भोसले याचे कमाविसदार पाठऊन ठाणे बसविले. मुलकाचा वसूल तों बहुतेक मोंगलाने घेतला आहे. रेजों[२] बाकी राहिली ते वसूल घ्यावी. त्यास मातुश्री उमाबाई याणी काली शंभर राऊत वणीस पाटविले आहेत. ती ठाणे घेणार यैसा विचार आहे. येविषींचा बंदोबस्त करावयास स्वामी खावंद आहेत. नासिकचा तह करावयास सदासिव कासी येणार होते त्यास येसजी बलकवडे यांचा विचार येसा जाला. यास्तव सदासिवपंत प्रस्तुत उमाबाई यांचे विचारांत आहेत. उमाबाईचे चितांत आपलें ठाणें नासिकीं ठेऊन परगणियाची मोगलाईचा वसूल घ्यावा यैसें आहे. सेवेसी विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*Malhar Dadaji to Chimaji, asking news of Baboorao's doings in the North.*

No. 77]

[पो॰ *20-4-1739*

छ २२ मोहरम.

आसीर्वाद उपरी. आवजी कवडे मोडल्यावरी राजश्री स्वामीनी वर्तमान आइकून संतोष तो मानिला. तथापि दरबारच्या व त्या गोष्टी चितांत आणीन

---

१ लेखकाचा मुलगा. २ तुकडा, अंश.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

म्हटल्यास समये नाहीं. काडी इतके विखर न दाखविता सर्वप्रकारे गम खाऊन मातबर काम करावे, मोगल बुडवावा, रकारपूर्वकास कागदीपत्रीं विखर काहीं न ल्याहावे ; म्हणजे लगामी लागून कृतोपकार मानील. लगामी लागलेया आवजी कवडे याची वस्तभाव सुतलीचा तोडा तोहि देईल म्हणून लिा ते अवगत जाहाले. यैसियास चाकरा चाकरात होऊन गेलियात अन्याये त्याचा काये आहे. आणि आम्ही विखर कशास दाखवावे ? त्यास लिहिणे ते समाधानपूर्वकच लिहित असतो, व त्याणीहि जाहले गोष्टीचे भये मानून नम्रतेचेच पत्र पाठविले आहे. वस्तभाव आवबासी सोडून देतील व आम्हांसहि सर्व प्रकारे त्याचे समाधान रक्षून लगामी लाऊन घेणे लागले. प्रागतनवान आणि बरा धाडसी आहे. आणि आम्हांस पुढे नादरशाहाच्या उपमर्दाचा मनसुबा कर्तव्य यास्तव सर्व प्रकारे गम खाऊन समाधान करून लगामी लाऊन घेऊ. चिरंजीव राजश्री नाना यासहि लिहून पाठविले आहे. तेहि त्यास लेहून रघूजी भोसले यास आपल्या विचारांत येतसारिखे करितील. प्रस्तूत आऊजी कवडे व सरलस्कर गढे प्रांते गेले आहेत. लोभ आसो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji Appa, advising him to try to win over Raghuji to their side as he would be of much use when they marched against Nadirshah. Raghuji should be addressed in a conciliatory tone although he had put down Awaji Kawade.*

No. 78] [पौ. *27-4-1739 ?*

पौ छ २९ मोहरम

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. मयारामाचीं पत्रें दिल्लीहून आजी राजश्री स्वामीस आली आहेत. लाखोटे फोडून वाचून पाहिले नाहीं. लाखोटे फोडून वाचून पाहतील तेव्हां असेल वर्तमान तें लेहून पाठऊं. कासिदानी मात्र जबानी सांगितले कीं तुरेबाजखान मृत्य पावले. स्वामीस कळावे याकरितां लिहिलें आहे. सेवेसी विज्ञापना.

¶*Malharpant Purandare to Chimaji, communicating news from Delhi about Nadirshah's invasion.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 79] [*12-5-1739 ?*

नकल

श्री

श्रीमंत राजश्री पंत दादा+ स्वामीचे

सेवेसी

पो शामजी गोविंद सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता वैशाख सुध १९ पर्यंत स्वामीचें कृपेंदृष्टीकरून येथास्थित असे. यानंतर वो आपाभट स्वामीची आज्ञा घेऊन आले ते शहरी सुखरूप पावले. वर्तमान सांगितले त्यावरून कलो आलें. इकडील वर्तमान तरी येथास्थित असे. नवाब नासरजंग नांदेडास आले. सैदजमालुदीखान यास व सुलतानजी निंबाळकर व चंद्रसेन जाधवराव यांस व चव्हाण वगैरे तमाम सरदारास नूतन जागिरा व नकदियांत खर्चास दिल्हे. सैदजमालखान यांस नकद दोन लाख व आठ लाखाची जागीर पा आठ ८ दिल्हे. याच प्रकारें सुलतानजीस पांचा लाखाचे माहाल ९ व धारूर किला मनुष्ये ठेवावयास दिल्हा. व चंद्रसेन यांस कल्याण कलबुरगे किला व आवसे किला मनुष्य ठेवावयास दिल्हा. पाचा लाखाची जागीर दिल्ही. दाहा दाहा हजार फौज मातबर ठेवावयास आज्ञा केली. ह्याप्रमाणे समस्तहि कलमंजारी[1] केली आहे, व आपणहि फौज ठेवित आहेत. राजश्री सुमंत हस्तनापुरीहून प्रस्तुत येथे आले आहेत. यांस माहाराजाकडे पाठऊन स्नेह संपादून रा राघोजी भोसले व राजपुत्र यांची फौजा साह्य करून श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांसी बिघाड पुरता करून समजावें येसे चितांत आणिले आहे. * * जैबेगी व राजश्री गणेशपंत कुंटे श्रीमंताकडे पाठविले आहेत. जरी श्रीमंतहि जफ्ती (जप्ती ?) मोकूफ[2] करून पहिले करारप्रा वर्तले तरी उतम; नाहीतर याप्रा कटाव आरंभिला आहे. मोठी खराबी आहे म्हणून राजश्री गोविंद बलाल कुंटे नवाबाबा आहेत त्याणी लिा आसे. श्रीमंत बऱ्हाणपुरावरी आहेत. आवजी कवडे दाहा पंधरा हजार फौजेनसी वराडात आले आहेत. त्यास फिरोन आपणाजवळ बोलाविले आहेत. याप्रमाणे गडबड दिसते. पुढे पाहावे गोष्ट कोण्या थरास जाईल. याउपर स्वामीनी सावध असावे. रा बाबूजी ना व निकम जफ्तीच्या वसुलावरी आहेत. नेवासे टोके इकडे, त्याजवर रा कृष्णराव माहादेऊ दोन हजार फौज घेऊन गेले आहेत. बहुतेक तों त्यास कललियावरी पलीकडे

+ दादोपंत पुरंदरे=मल्हाद तुकदेव असावा. १ सैन्य जमवण्याची तयारी. २ तहकूब.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सरकतील. न गेल्यास कठीण. सांगे[१] नवाबाची आज्ञा नाइकांसी परिछिन समजावयाची आहे. स्वामीनी याउपर सर्वांसी रसायेण संपादून चंदेरोज[२] त्या प्रांतें राहाणे तर राहावे. मागाहून विस्तारें लिहितो. राजश्री राऊजी जयेनगरी सुखरूप आहेत. पत्रे येत असतात. चिंता न करावी. धोंडोपंत वकीलें[३] श्रीमंताकडे यावया जयेनगरीहून निघाले आहेत. बहुधा बऱ्हाणपुरास दाखल जाले असतील. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Shyamji Govind Takle, the Peshwa's agent with the Nizam, sends to Purandare news of the activities of Nasirjung.*

No. 80] *[25-5-1739*

छ ४ राालोवल

श्री

आसीर्वाद उपरी. तुम्हाकडे पत्रे पाठवावयास लिहून दिलीकडील दुसरें वर्तमान यावयाची वाट पाहात असतां काल छ २६ सफरी राजश्री बाबूराऊ मल्हार याची पत्रें छ ११ सफरची पत्रें आली. त्यात लिहिले कीं नादरशाचा पुत्र छ ६ सफरी सालिमार बागात गेला. छ ७ सफरी नादरशा महमदशाहा यास दिलीत ठेऊन शालिमार बागांत दाखल जाहालें. अमीर पावीर्ते शालिमार पावेतो गेले होते. त्यास ताकीद करून निरोप दिल. सालिमार बागांत तीन दिवस राहून दरकूच पुढे जाणार. * * फरमान पाठविला आहे. त्यास लिहिले * * हिंदुस्थानचे पातशाहा * * पातशाही राखून आपण जातो. तुम्ही पुरातन चाकरीचे आहा तरी आज्ञेंत वर्तणूक करीत जाणे म्हणून ताकिद केली आहे. महमदशास रोडसोड हती शंभर दिल्हे व पनास लक्ष रुपये दिल्हे. काही घोडी दिल्ही. सवाईजीनी पाच लक्ष रुपये व पाच हती पातशाहास पाठवावयाच्या विचारात आहेत; पाठवितील. व वस्त्रे पातशाहास व अमीरासहि पाठवणार. आपणहि काही वस्त्रे व हती पाठवावे उचित आहे. तजवीज करावी लागेल. राजश्री बाबूरायानी लिा आहे कीं आपणास निजामनमुलूक याणी व पातशाहानी बोलाविल्यास जावे की न जावें ते आज्ञा जाहाली पाहिजे म्हणून लिा आहे. यैसियास त्याणी जावे की न जावे, राजकारण कोण्याप्रकारें राखावे, ते लिहिलें पाहिजे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji Appa, asking advice as to what attitude the writer should take as regards the dispositions effected by Nadirshah at Delhi.*

---

१ ? २ कांहीं दिवस. ३ धोंडो गोविंद=पेशव्यांचा वकील जयपुरास.

४ पोचवीत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 81] [*14-7-1739 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक शामजी गोविंद सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आखाड वदी ९ पर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून शहरी येथास्थित असे. यानंतर यथील वर्तमान राणोजी देवजी जासूद याबाा मुफसल[1] लिहिले आहे. ती पत्रें पावलीच आसतील. आलीकडे नवल विशेष तर राा आबाजी नाा जोसी याची पत्रे श्रीमंत राजश्री येजमान स्वामीचे लस्करातून आलीं. श्रीमंत राजश्री नर्मदा सेनेसहवर्तमान तुबाडीचे घाटे उतरले. कूचदरकूच या प्रांतास येत आहेत. नर्मदातीराहून कासद लस्कर सोडून आला. बलकी आज काल बऱ्हाणपुरापली-कडे येक मजल लस्कर आले आसेल. विदित होये. हस्तनापुरीहून राजश्री बाबूरावजीकडून पत्र छ ११ सफरचे आले. पातशाहाची भेट जाली नवती. सिदी जोहर वगैरे आरब याणी वीसरोज्यासाठी दंगा येथे आपणावर केलियाचे वृत पूर्वी येक दोन विनंतीपत्रीं लिाा आहे. मुजरद आजूरदारहि पाठविला आहे. त्यास आद्याप पारपत्यपुरसर उतरे सेवकावर कृपालू होऊन न आली. प्रस्तुत त्याणी आतिशये दंगा केला आहे तो पत्रीं कोठवर लिहावा? जर वीसरोज सरकारांत राहिला आहे तर ६२० रुपये होतात. त्यापैकी रुपये ५०० पाचसेवर मुकरर केले आहेत. ते द्यावे न द्यावे आज्ञा करणार स्वामी आहेत. वीस रोजा राहिला नसेल तर त्याची कबज इाा नौकरी ताा रुसखती मोवम आसिली तर ते वजा. नासरजंग सफीउलाखान कोतवाल यास पत्रे की आरबाची तलब[2] कझ्या कुल चुकऊन दिल्हा आसता हाली शहरांत जाऊन शामजी गोविंद व जोतीपंत बासिंगे साहुकारीने आहेत त्यासी बोईलत[3] इकडून नाहक मुजाहीम होतात तर त्यास ताकीद व तंबी करून मुजाहीम[4] न होत ते करणे, यैसी पत्रे व कबज आति सत्वर पाठविणार स्वामी आहेत. पूर्वीपासून आपणासी कजिया कर्षमकी[5] करीतात. त्यास आपणावर आंगेजून जाबसाल करून आजवर ठासून ठेविले. हाली सबलसिंग तिकडून आला आहे. त्याणे खंदे चालीस पंनास माणूस जमा करून कजिया आम्हासी रुजू केला आहे. येऊन जाऊन आपले प्राणासी गाठ पडते. शहरांत आमचा वाली कोणी आहे नाही हे कलतच आहें. स्वा * * * * कागदपत्राचाहि उपराला न होये तेव्हा आपले करणच हक

---

१ सविस्तर. २ पगार, तनखा. ३ ?
४ प्रतिबंध करणारा. ५ ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाहक आहे. कालीच तेथे आरब चाकर आहेत त्याची हुडी जोतीपंतावर पाचशे रुा आली. ते रुा त्याणी घेतले. त्याणी सिदी जोहर वगैरे हरामचोदास सागितले. त्यावरून दाहा पाच माणूस जोतीपंतांचे घरास जाऊन कजिया केला. तेव्हां त्यास कोणी सागितले की, शामजीपंती तुम्हाकडे पाठविले; त्यावरून त्याणी विवेक न करितां कोतवालापासी जाऊन सागितले की, आपणासी काही त्याचा दावा नाही. नाहक कजिया करितात. दावा आहे तर बाबूराऊ यांसी आहे. त्याचे निसबतीचे शामजीपंत आहेत त्यासी आहे. त्याचे गळां जाऊन पडावे यैसे सांगितले. ते वृत आरबाकडील प्यादे होते त्याणी ऐकिले. त्यावरून आज पाहाटेपासून दाहा माणसे निःसंग लडाईवरच येऊन आपले घरी बसले आहेत. आजवर आपण आपले * * * * ट लागो न देतां जाबसालावर ठासून ठेविले होते. आतां घरांतच फूट होऊन त्याजला जाहीर जाले. खरे आगर लटके औ[1]र्बुज जातीस विचार कोठील? याप्रा जोतीपंती खता केली. आपण आज सा मास हा कजिया सोसितो, तेव्हा जोतीपंतास रघुनाथपंतास लाऊन न दिल्हे, आणि आतां लाऊन कैसे देऊन. हाली आपण लाऊन दिल्हे आसतील तर स्वामीचे पायाची शपत आसे; व सर्व आलमास ठावके आहे तेच आपले हातचा दरेरा देतील. आद्यापहि आपण आलाहिदा होऊ सकतो; परतु पाजी माणसासी समध. यास्तव आपणावर कजिया वोढितो. माहादजी खंडोजी याणी नजरेने हकीकत पाहिली आहे. सेवेसी विदित करितील. याउपर विनंतीचे पारपत्य करणार स्वामी आहेत. फार काये लिहावे हे विज्ञप्ति.

¶Shamji Govind Takle, the Peshwa's envoy at the Court of Nizam-ul-mulk, speaks of his difficult position and requests Chimaji Appa to send him assistance in troops.

No. 82] *[3-11-1739*

छ १२[२] रमजान

श्रीशंकर

राजश्री चिमणाजी पंडित अपा गोसांवी यांसी.

ꣿ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये स्वानंदलेखनाभिवृधी करीत असिलें पाहिजे विशेष. उतर प्रांताहून

---

१ आडदांड. २. २२ अंकाचा खोडून १२ केल्ला दिसतो.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तांब्राची सेना आली आहे त्यांचा पराजये कर्तव्यार्थ. येदंनिमित्य सामील व्हाव-यविषई राजश्री स्वामीचे आज्ञापत्र व राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांचे पत्र रा। गुणाजीराव सामुणकर घेऊन परसोपंताचे नेरच्या मुकामी आले. ते परिसोन चित संतोशातें पावलें. यैसियास आपणावितरिक्त अंम्ही काये अहों? यास अमचा मनसबा होता जे राजश्री कान्होजीबावा भोसले यांची जागा भांब, तेथें जाऊन मोरचे लाऊन ते स्थळ हस्तगत करावें. परंतु हे कार्य मसलतीचे. अगत्यवाद जाणून तो विचार टाकून राजश्री रायांकडे जावयाचे उदेशें कूच करून मावारें फिरून, सालबरडी नजीक घाटतोंडे आलों, तंव सुज्यायेतखान अळजपूरचा सुभा याने तीन वरशे अमचा च्याह्[१]रम दिल्हा नाही वकील पाठविले होते ते देखील उठऊन दिल्हे अणि बहुतसा गर्वाभिमाने फौजबंदी पोख्[२]ते करून अडवा चालोन अला, तेव्हा त्याचा परामृश करणे जरूर जाहालें. अणि त्याचे पारपत्या-विषई अपणहि पूर्वी येक दोन वेळां पत्रें पाठविली होती. या करितां युध्यास प्रवर्तलों. त्यासी अंम्हासी युध्य तुंबळ जाहले. राजश्री स्वामीचे पुन्य प्रतापें व अपलें कृपेकरून त्यास हतप्रभाव करून हस्तगत केलें. त्याचा आक्रम लयातें पावविला. याउपरी मजल दरमजल फौजेनिसी राजश्री रायांकडें जात असों. तरी अमचें विशाई त्यांस जे लेखन कर्तव्ये ते करून पत्रें पाठवावी. येतद्विशाई विस्तारें ल्याहावेसें नाही. सर्वप्रकारें अपले पदरीचे असों. आपण येशाधिकारी आहेतीं. या मामलियाचा मानाभिमान सर्वोत्कर्षे चिती धरून उर्जित केलियां येश किर्ति आपलीच असें. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे? लोभ आसो दीजे हे विनंति.

अष्टकोनी शिक्का
श्री
शाहुराजपदांभोजभ्रमरायित-
चेतसः। विंबात्मजस्य मुद्रैषा
राघवस्य विराजते॥

मोर्तब
सुद.

¶Raghuji Bhosle to Chimaji Appa, informing him that as per instructions from the King and Bajirao he is proceeding to join the main army under Bajirao to fight against Nadirshah. The writer also describes a certain action which he had with Sujayatkhan, the Subha of Alajpur (Ellichpur), who refused to pay his dues.

---

२ चौथाई.
२ पूर्ण, भरपूर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 83] [1739-40 ?

श्री.

तीर्थरूप राजश्री बावा वडिलांचे शेवेशी अपत्यें बापूने कृतानेक साां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १३ माहे रावल मुाा इंद्रप्रस्थ वडिलांचे आसीर्वादेकरून येथास्थित असे विशेष. येथील साकल्य वृत श्रीमंत स्वामीस विनंतीपत्रीं लिहिलें असें, त्याजवरून सविस्तर श्रुत होईल. यानंतर फर्मान व नवाब बादर व निजामनमुलुक यांची पत्रें श्रीमंताच्या नावाची व सैदलश्कर खानाचे नावाचे पत्र यैसी पाठविली असेतीं पावतील वडिलांचे नावाचा फर्मान व तेथील ताम्राकडील सरदार यांस निजामनमुलेकाची पत्रें तयार होतात, तें मागाहून सेवेसी येऊन पावतात. पेशजी निजामनमुलुकाची पत्रें परभारें यांच्या सरदारकडे गेलीच आहेत. सैदलश्करखानाचें पत्र पाठविलें आहे. त्यास दोन मजली आलीकडे बोलाऊन व वडिली दोन मजली येऊन भेटून रसरंग राहून बोलबाला निजामन मुलुकाचा होय ते गोष्ट करणार वडील समर्थ आहेत. हजरत जीलसुभानी[१] छायाख़ाले येऊन सर्व लहान थोर यांस देखतां बोलिले कीं, मी आपल्यास रामचंद्रपंतास[२] सोपिले आहे. बरे करोत अथवा वाईट करोत. हा यख्तियार त्याचा आहे. याप्राा बोलिले. त्यावरून निजामनमुलुक बोलिले जे, हजरतजी, आपल्यास ज्याचे हवालें केलें इतका तफ़ज़ूल[३] त्याचे हकांत हजरतचा त्यास पाहिजे जे आम्ही अरकाँ[४] नाही त्यासी किबले काबे जाणावे मग वजीर मुमालिक व अमीरुल[५] उमराव याणीहि बहुतसी तारीफ केली. त्यास निजामनमुलुकाची सरदारी आहे ते वडिलांची आहे. पातशाहापासी सुरूखुरू करणार वडील समर्थ आहेत. बहुत काय लिहिलें, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*This appears to be a letter from Bapuji Hingne to his father Mahadev Bhat, giving news of the Emperor's plans and advising the addressee to befriend the Nizam.*

No. 84] [12-3-1740

आशीर्वाद उपरी. राा फतेसिंग व राा रघुजी भोसले यास येथील सला जाहाल्याची पत्रे आम्ही पाठविली तेहि खालते बेदरप्रांती गेले. आम्ही मोगलास जरबेत आणून सला केला यावरुन राजश्रीस बाजीराऊ प्रागतनवान जे चितावर

---

१ जीलसुभानी = ईश्वराची छाया, बादशाहाचें विशेषण. २ हा रामचंद्रपंत कोण ?
३ कृपा, उपकार. ४ लहान. ५ बडा सरदार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

धरतात ते करतात येसे भोसल्याचें वृत माहादोबानीं तुम्हास लिा ती पत्रे तुम्ही पाठविली ती पावली. आम्हास नासरजंगापासून पाच लाख रुपये प्राप्त नसतां त्यांचे (शाहूचे) चिती प्राप्त जाले येसे आलें. असो. सलाबतीची गोस्ट उतम आहे. छ २४ जि(ल्हेज) हे आ(शीर्वाद).

¶*Chimaji Appa to Nana, referring to the reconciliation effected with Nasirjung. Shahu was pleased with the performance and success of Bajirao's undertakings.*

No. 85] *[8-3-1740 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक गोविंद सिवदेव आा सरदेशमुख मामले बीड व पाा पाथरी साा नमस्कार विनती उपरीं. सेवेसी विज्ञेप्ति कीं स्वामीचे आज्ञापत्र छ २० माहे जिल्हेजी मढीचे मुकामी येऊन पावले, तेथें आज्ञा कीं नासरजेंग व राजश्री सुलतानजीराव निंबाळकर व राजश्री चंद्रसेन जाधवराऊ हे कोणे ठिकाणी आहेत, व फौज कितेक आहे व मनसुबा कर्तव्य काये, तैसेच राजश्री फतेसिंग भोसले व राजश्री रघोजी भोसले यांसमागमें फौज काये जमा जाली आहे, ते कोठे आहेत, कोणत्या रोखे जातात, कर्तव्य काय, हें सविस्तर वर्तमान मुजरद मानूस पाठऊन तहकीक आणऊन लेहून पाठवणें. त्यास आज्ञेप्रमाणें मुजरद मानसें पाठऊन वर्तमान अणविलें. त्यास त्यांचें वर्तन यैसें आहे कीं नासरजेंग व जमालुदीखान शहरीहून स्वार जाले, ते शहागडावरी आले. समागमें फौज सा सात हजार आहे. यावेगळे राजश्री चंद्रसेन जाधवराऊ दोंशां स्वारानसी आहेत; व चव्हान पनासा स्वारानसी व राजश्री सुभानजी थोरात शंभरां स्वारांनसी व रो धिराजी पोवार पनासा स्वारानसी यैसे मिळोन आठेक हजार स्वार आहेत. शहागडावरी दोन तीन मुकाम होते. तेथून राजश्री सुलतानजीराव निंबाळकरास सांडन्या व अहेदी[1] बोलाऊं पाठविले होते, त्याचे उत्तर नासरजेंगास आलें कीं तुम्ही धारुरावरी येणें, आपणहि तेथें मुलाजमतीस येऊन. यैसें उतर आलियावरी नासरजंगी वैशम्य मानून तेथून कूच करून धारूरावरी गेले. इकडून खरडिया-हून राजश्री सुलतानजीराव निंबाळकर हेही गेले. तेथें मुलाजमत जाली, परंतु चित शुध नाहीं. मग हे व ते यैसे मिळोन पुढे भागानगरच्या रुखे गेले. दुसरें वर्तमान कीं राजश्री फतेसिंग भोसले व राजश्री रघोजी भोसले यांसमागमें

---

१ लढाऊ स्वार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फौज दाहाबारा हजार आहे. भागानगर प्रांतें जातात. राजश्री रघोजी भोसलियांनीं नारायणपेठ मारली, व हुमनाबादही मारहि; व वीरपा चंद्रसेनाकडील होता, त्यांसीं व रघोजी भोसलियाचे फौजेसी झुज जाले. वीरपाचा मोड जाला. त्याची सें दोनसें घोडीं यांचे हातीं लागलीं. विरपा पळोन गेला. यैसें वर्तमान जालें. हें वर्तमान राजश्री चंद्रसेन जाधव यास कळलियावरी त्यांनीं नासरजेंगास सांगितलें. त्यानंतर नासरजेंगांसहि रा रघोजी भोसलियावरी राजश्री सुलतानजीराव निंबाळकर व चंद्रसेन पाचा हजारां फौजेनसी तैई (?) केले. त्यास ते पुढें हे मागें जात आहेत. त्यास आतां खबर उडाली आहे कीं यांचें व त्यांचें झुज जालें. त्यास मागती जासूद पाठविले आहेत. तहकीक खबर आलियावरी सेवेसी साकल्य लेहून पाठऊन. यानंतर बीडपाथरीचे मामलियेतीचें वर्तमान तरी खरीफ [यापुढील सुमारें अडीच बंद मजकूर या दोन मामलतीसंबंधानें वसुलाच्या हिशेबी अडचणी सांगणारा असल्यामुळें सोडून दिला आहे.] श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीही नासरजेंगास शहरास बोलाविलें आहे, म्हणऊन वर्तमान आहे. त्यास ते भागानगर सोडून शहराकडे येतात. सेवेसी विदित होय. विशेष कार्य लिहिणें हे विज्ञाप्ति.

¶*Letter from Govind Shivdeo to Chimaji Appa, giving news of the movements of Nasirjung and his Sardars Sultanji Nimbalkar, Chandrasen Jadhao and of Fatesing and Raghuji Bhonsle.*

No. 86]

श्री

यादी पारसी पत्राचा आन्वय सुा
ईहिदे समानीन मयां व अलफ

छ १४ रमजान सन जलुसी महमदशा पातशा सन १२	१ गुजराथ सुभ्याची पत्रे चौथ सरदेशमुखीच्या अमलाविसी माहालोमाहाली पत्रे ४४ चवेतालीस बमोहर सर बुलंदखान याची त्याचा मार देसाई व कानगो व मोकदम व रयेत व मुजारी यांस लिहिले जाते की, चौथ व सदेशमुखी चवेतालीस महाल सुभे गुजराथ येथील खंडेराव यांजकडून तगीर करून बाजीराव यांजकडे करार केली तर माल व सायेर पौ चौथाईचा हिसा व रयेतकडून सरदेशमुखी हिसेब प्रो देत जावी म्हणौन पत्रे सुमा ४४

---

१ रवाना ?

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

[25-4-1739

छ २७ मोहरम सन हिजरी ११५२ — १ नादरशाहाचा फरमाना कीं, महंमदशाहाची व आमची दोस्ती जाहाली. तुम्हीहि त्यांच्या श्नेहात आसावे म्हणौन बाजीराव साहेब यांच्या नावें.

[10-3-1728

६ सरदेशमुखी व चौथाई साहा सुभे दक्षणचे आमलविसी निजामनमुल्कक यांच्या मोहरेनसी साहा सुभ्यास सनदा साहा येक मोहरी सनदा

छ ९ शाबान सन हिजरी ११४०

१ सुभे महमदाबाद बेदर
१ सुभे औरंगाबाद
१ सुभे बिज्यापूर
१ सुभे वराड
१ सुभे खानदेश
१ सुभे हैदराबाद

६

सनदा साहा त्यांतील मार सांप्रत चौथ सरदेशमुखी सदरहू सुभ्याची पेशजी प्रो शाहू राजे यांजकडे बाहाल केली. त्यास राज्याकडील सरदेशमुख व कमाविसदार याणी रयेतेस आपलेकडून राजी ठेऊन आबादी व लावणी विशेष होये ते करावें. हिसेबखेरीज जाजती उपसर्ग न करावा. देशमूख व देशपांडे व मोकदम व रयेत व मुजारी सदरहू सुभ्याचे याणी चौथाई व सरदेशमुखीचा हिसा जमाबंदीप्रो शाहू राजे याजकडील कार व सरदेशमूख यांस देत जावा म्हणौन.

६ साहा सुभे दक्षणच्या चौथ सरदेशमुखीच्या अमलाविसी निजामनमुल्कक यांच्या मोहरेनसी सुभेदारास ताकीदपत्रे सुमार

पत्रांत सन व तारीख नाही.

१ राजे गोपालसिंग सुभेदार बेदर
१ औवजखान सुभेदार औरंगाबाद
१ ताल्हा (?) मोहिदीखां सुभेदार विज्यापूर
१ सैद जमालखां सुभेदार वराड
१ हफीजुदीखान सुभे हैदराबाद
१ चिकीलीचखांन सुभेदार खानदेश

६

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

येकूण साहा ताकीदपत्रें त्यांतील मार कीं, सदरहू सुभ्याची चौथ सरदेश-मुखी पेशजीप्रमाणें शाहू राजे याजकडे बहाल करून हरयेक सुभ्यास सनदा आलाहिदा सादर जाल्या आहेत; तर तुम्ही राजे यांकडील मोकासदार व सरदेशमूख यांस माहलोमाहलीं आमल देऊन चौथाई व सरदेशमुखीचा औवज जमाबंदीप्रो पावता करीत जावा म्हणौन पत्रें.

[10-3-1728

१२ यैवजखानाच्या माहरेनसी चौथ सरदेशमुखीच्या आमलाविसी आमलदारास ताकीदपत्रें:

छ ९ साबान सन हिजरी ११४०

१ प्रो पाथरी
१ प्रो जालनापूर
१ वासीम व सेरपूर
१ प्रो नरसी
१ प्रो मंगलऴूर
१ प्रो रमेतपूर
१ प्रो आकोले
१ प्रो बोरगांव
१ प्रो हासनबीड
१ प्रो खानापूर
१ प्रो माहागांव
१ प्रो दर्यापूर

१२

बारा ताकीदपत्रे त्यातील मार चौथाई व सरदेशमुखी साहा सुभे दक्षणची पेशजी प्रो राजे शाहू यांजकडे बाहाल जाली. त्यास राज्याकडील कमावीसदार माहलो माहली येतील, त्यास तुंम्ही आमल देऊन जमाबंदी प्रो हिसा देत जावा; म्हणौन येक मोहरी पत्रें.

[9-2-1728

१ सुभे गुजराथची सरदेशमुखीची सनद सरबुलंदखांन याच्या मोहरेनसी त्यांतील मार कीं, सुभे मारची सरदेशमुखी च्यार लक्ष तेरा हजार आसी रुा तेरा आणे नजर घेऊन शाहू राजे यांजकडे मुकरार केली. त्यास राज्याकडील कादार याणी नजरेचा ऐवज खजान्यांत दाखल करावा व सरदेशमुखीचा हिसा

छ ९ रजब सन ज़ुलुषी ९

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सेकडा दाहा रुा करार केला, त्याप्रोा घेत जावा. ज्याजती उपसर्ग न द्यावा; व चांगल्या जमावानसी पातशाहाची चाकरी करीत जावी व मुलकाची आबादी व मुफसद[1] याच्या पारपत्याविसीं निरंतर सादर आसावें कदाचित कोणाच्या येथे चोरी जाली तर चौकसी करून चोराचे पारपत्य व ज्याचा माल त्यास द्यावा व खालश्याच्या माहालाच्या वसुलाविशी सरकारच्या आमलाची व जागीरदाराची मदत करीत जावी. म्हणौन देसाई व चौधरी व कानगो व मोकदम व रयेत मुजारी यांस.

[9-2-1728

छ ९ रजब
सन
जलुषी ९

१ सुभे गुजराथची चौथाईची सनद सरबुलंदखांन व अलाबिरदीखांन याच्या मोहरेनसी करोडे व जागीरदार व फौजदार व ठाणेदार देसाई, कानगो व मोकदम व रयेत व मुजारी[2] याच्या नावे. त्यांतील मजकूर कीं, बाजीराव याणी विनंती केल्यावरून मुलकाची आबादी व रखवाली व मुफसद यांच्या पारपत्यावर नजर देऊन सुभे मारची चौथाई आडीच हजारा स्वाराच्या सरंजामाबदल राजे शाहू यांजकडे मुकरार केली. त्यास चौथाईचा हिसा तुम्ही तफावत न करिता राज्याकडील कमावीसदारास देत जावा. राज्याकडील कमावीसदार याणीं रयतेस राजी ठेऊन आबादी व लावणी विशेष होये ते करावें व हिश्या-खेरीज जाजती उपसर्ग न द्यावा. सदरहू स्वाराच्या जमावानसी हजीर राहून चाकरी करीत जावी; व चौथाईच्या वसुलास हरयेक पर्गण्यात दोन तीन माणसे ठेवीत जावी व सरकारचे आंमलदार व जागीरदार यांसी येकविचारे आसावे. सदरहू कराराखेरीज कोणी वर्तुणूक करील त्यास तगीर करावे. सरकारच्या आमलदाराचा आपराध आसल्यास आम्हांस ल्याहावें. पारपत्य केले जाईल म्हणौन.

---

१ बंडखोर. २ शेतकरी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[27-8-1743

१ कमरदीखान यांच्या मोहरेनसी माळव्याच्या सुभेदारीची सनद व फौजदारी नानासाहेब यांच्या नावें. त्यातील मार पातशाहाच्या हुकुमाप्रो माळव्याच्या सुभेदारीची नियाबत[1] तुम्हाकडे मुकरार केली. त्यास तुम्ही शहराची व परगण्याची व वाटेची रखवाली येथास्थित करीत जावी; व मुफसदाचे पारपत्य करून कोण जबरदस्त रयतेस जुलूम न करीत ते करावें म्हणौन.

छ १७ रजब सन जलुषी २४

[24-6-1743

१ माळव्याचे सुभेदारीचा फरमान बातशा महमदशा व कमरुदीखान वजीर याचे मोहरेनिसी नानासाहेबाचे नावे की, त्यातील मजकूर या दिवसात तुम्हावर कृपाळू होऊन माळव्याचे सुभेदारीची नियाबत तुम्हाकडे मुकरर केली. त्यास तुम्ही सुभ्याचा बदोबस्त व रयतेची उस्तवारी व मुफसदाचे पारपत्य यथास्थित करावे. व जे गोष्ट शास्त्राविगळी असेल ती होऊ न द्यावी व कोणाहि जबरदस्ताचा उपद्रव गरिबास न होय ते करावे. सदरहू लिहिल्या मजकुराविसी सर्वकाल सावद असावे म्हणौन.

छ १२ जावल सन जळूस २४ पत्र बादशाहाचे येकच परंतु वर मोहर कमर्दीखानाची असे.

[8-9-1738

१ महमदशा बातशा याचा फरमान बाजीरावसाहेब याचे नावे. त्यातील मजकूर कृपा करून तुम्हास जाहागीर व मनसब व माहाल व वतन हकराई लोकासहित दिल्ही खिलेत[2] उमंदा[3] व जिगा[4] व सरपेच व मोत्याची माल व येक हती व येक घोडा पाठविला आहे. तरी तुम्ही येकनिष्टपणे राहून सरकारची चाकरी करीत असावी म्हणौन.

छ ४ जाखर सन जुलषी १९

१ सवाई जैसिग याच्या मोहरेनिसी तहनामा बिदीहाल बद

---

१ मुतालिकी. २ वस्त्र; ३ उमदा=उंची. ४ (?)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उमरखेड वगैरे माहाला-विसी.	१ ऐवजखान याचे मोहरेनिसी पत्र अजीनबेगखान याचे नावे. त्यातील मजकूर चौथ व सरदेशमुखी साहा सुभे दक्षणची पेशजीप्रमाणे शाहू राजे याजकडे बाहाल जाहाली. तरी तुम्ही राज्याकडील कमावीसदार व मोकासदार यास आपल्या परगण्यात अमल देऊन जमाबंदीप्रमाणे हिसा देत जाणे म्हणौन पत्र

१ निजामनमुलूख याच्या खास दस्तुराची फर्द[१] त्यातील अन्वय बितपसील

सुभेदारी मालव्याची व दरोबस्त सुभा आमचे जाहागिरीत मुकरर व्हावा; व याच्या सनदा बादशाहाचे मोहरेनिसी करून द्याव्या	बातशाहानी कृपा करून पनास लक्ष रुा मदत खर्च मुकरर केला, तो याजकडून पावला, तर उतम; नाही तर आपण आपल्याकडून देवावा.
सुभेदारी मालव्याची आंम्ही आपलेकडून दिल्ही, सुभेदारीची सनद व जाहागिरीची सनद बातशाहास अर्ज करऊन देविली जाईल. तुम्ही येकनिष्टपणे शेवा चाकरी करीत जावी. अंतर न करावे.	बातशाई मुत्छद्यानी जे मुकरर केले असेल ते कोसीस करून देविले जाईल. नाहीतर आम्ही आपले सामर्थ्यानरूप रयात करू.

म्हणौन येका पत्राचा अनवय आहे.

१४ जाबसाली फरमान व हातरोखे बातशा वजीर याचे मोहरेनसी

४ खानदौरा याची पत्रें बाजीराव साहेबाचे नावें

१ सालमजकुरी इकडे येणे होत नाही तरी पेस्तर साली तरी लौकर यावें. कौल करार जाले ते अमलात आणावे. उजनीपर्यंत आल्यावर धोंडोपंतासी ज्या गोष्टी जाल्या त्या सर्व घडोन येतालि म्हणौन.

१ गुदस्ता यावयास बनले नाही; हाली तरी यावें म्हणौन.

---

१ एकेरी पत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ धोंडोपंताबरोबर पत्र पाठविले ते पावले. काही मतालबी मजकूर लिहिला तो पातशाहास विनंती केला. पातशाहानी तुमचे लिहिल्याप्रो सर्व मतालब कबूल केले म्हणौन.

१ गुदस्ता लिहिले की आम्ही दिलीस येतं नाही. त्यांस यंदा तरी तुम्हीं यावें. उजनीपर्यंत आल्यावर हिकडून हि मातबर मनुश पुढें येईल म्हणौन.

—

४

१ फरमान नानासाहेबाचे नावें महमदशा बातशाहाचा फरमान अर्जी पाठविली ती पावली. त्यात लिहिले की आम्ही सरकारचे चाकरीत हजीर आहों. त्यास तुम्हीं अर्ज केल्या प्रमाणे जे आज्ञा करावयाची ती माहादेवपंत यास केली आहे. तुम्हापासी येऊन सांगतील त्याप्रमाणे चालावें. हुजुरची कृपा तुम्हांवर होईल म्हणौन.

१ महमंद अलीखानाचे पत्र बाजीरायाचे नावें; त्यातील मजकूर की तुमचा आमचा श्नेह बहुत दिवसाचा आहे. पुढेंहि तसाच असावा. हाली वेकाजीपंत याजबरांबर पंधरा छिटे कलंसपाकी पाठविली ती पावतील म्हणौन.

१ नरोपंत याचे पत्र बाजीरायाचे नावे: त्यातील मजकुर की तुम्ही दिलीकडे आला हे आइकोन संतोष जाहला म्हणौन.

१ गुलाम मेहेदीखान याचे पत्र बाजीरायाचे नावे की रासीनच्या किल्यास पठाणानी येऊन धामधूम केली आहे; त्यास कुमकेस फौज व खर्चास पाठवावे म्हणौन.

१ निजामनमुलुख याचे पत्र बाजीरायाचे नावे की कालाबाग वगैरे अबदुलाखानाचें जाहागिरींत आहेत. तुम्हांकडील त्यास उपद्रव लागतो. त्यास न लागावा म्हणौन.

१ फरमान महंमदशा याचा बाजीराव याचे नावे की खिलद सात, पारचें[१] व सिरपेच व तरवांर व हती व घोंडा तुम्हांसाठी पाठविला आहे पावेल म्हणौन.

---

१ पोशाख.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

१ महमदशाचा फरमान बालाजी बाजीराव याचे नावें की येकनिष्टतेवर द्रिष्ट देऊन रघोजी भोसले यास बातशाई मुलखात येऊन द्यावे म्हणौन.

१ मंहमदशा बातशाहा याचा फरमान नानासाहेबाचें नावे की तुम्ही अर्ज केला त्याचा जाब निजामनमुलुख व माहादाजीपंत याचें लिहिल्यावरून कलेल. आम्हाकडून तुमची खातरानिशा असावी म्हणौन.

१ खानदौरा याचे पत्र बाजीरायाचें नावे कीं पत्र पाठविले ते पावेले व धोंडोपंताचे सांगितल्यावरून सर्व विदित जालें. वजीर बंदोबस्तास नर्मदेवर येणार आहेत. धोंडोपंत सांगितील त्याप्रो तुम्हींहि यावें म्हणौन.

१ उमदतुलमुलुख याचे पत्र बाजीरायाचे नावे कीं तुम्हीं बातशाहास अर्जी व नजर पेशकश पाठविली ती पावली, त्याचा फरमान तुम्हांस पाठविला आहे. व पातशाहानी बाबूराव याजवल सांगितले त्याप्रो करावे.

१४

१ निजामनमुलुख याचे दस्तकाची फर्द.

दक्षणचे कामाकाजाचा बंदोबस्त आमचे हाते घ्यावा. ईश्वरीकृपेकरून दौलतखाई व किफाईत केली जाईल. बशर्त दौलतखाई तुमचे हाती घेतला जाईल.	आनंदराव शाहू राज्याकडून आपणापासी आहेत. त्यासी आम्हासी नीट नाही. सबब त्यास निरोप[1] द्यावा. आम्हांकडून कोण्ही आपणाजवल राहील. रूकसद दिल्हीं.

येका पत्रातील अन्वय सरकारातून मतलब लिहून दिल्हां त्याचा जाबसाल.

५ सरकारातून राजे शाहू याणी मतलब लिहून दिल्हा त्याजवर निजामन मुलुख याणी दसखत केले त्यांची कलमें.

---

१ निरोप.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

संभाजी राजे यास निरोप द्यावा की ते पुन्हाल्यास जात. रूकसत करितो.

पाा आकलकोंट व खेड व तळेगाव व बारामती व इंदापुर व नारायणगड व पुणे वगैरे ठाणी पहिल्यापासून स्वराज्यात आहेत; हाली आपण सरकारची जप्ती केली ती मोकळी करावी.

ठाणेदार व फौजदार यास लिहून दरोबस्त ठाणी तुमचे हवाली केली जातील.

साहा सुभे दक्ष (ण) च्या सरदेशमुखीची सनंद व स्वराज्याची सनंद नवी द्यावी.

पेशजीच्या सनदेप्रमाणें अमलदाराचें नावे परवाना दिल्हा जाईल.

बलवतसिंग वगैरे यांस पेशजी प्रों मनसबा जाहागिर देऊन सरफराज करावे.

कबूल.

बाजी संखपाल याणीं नापरूटी पाा चांदवड येथील मोकदमास जिवे मारिले. घोडे वगैरे वस्त भाव नेले ते माघारे देवावे.

संभाजी राजे यास विज्यापूर सुभ्या पौ कृष्णा व पचगंगेपलीकडील प्रांत आम्हीं दिल्हा आहे व त्याची सनदहि आम्ही करून दिल्ही तेच असावी. आपण न द्यावी.

हे कबूल केले.

सिलमखान वगैरे याणी कमाविसदारास जिवे मार्ले व घोडी वगैरे वेस्तभाव नेली ती माघारी देवावी म्हणौन.

शोध करून माघारी देविली जाईल.

सुलतानजी निंबालकर आपणासी मिलाले त्यास सुलतानजीस जाहगीर अंबड व बीड येथे आहे. कदांचित त्याचे भाऊ सिदोजी व कान्होजीराव त्यासी खटला करितील आणि शब्द आम्हावर येईल.

सुलतानजी आम्हांसी मिलाले तेव्हा त्याची रयांयत[1] आम्हांसी लाजम[2] आहे.

संभाजी राजे याजकडील कमावीसदारानी माहोली माहाली वसूल घेतला असेल तो आमचे हिसेबी न ल्याहावा आम्हाकडील कमावीसदारानी वसूल घेतला असेल तो मजुरा देऊं.

चौकसी करून शाहू राजे व संभाजी राजे याणी वसूल केला असेल तो मजुरा देऊन बाकी तहसील करावी.

वडगाव वगैरे सात गाव पाा गालणा येथील जमीदाराचे गुमस्ते मोगल

१ कीव, भीड. २ योग्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चौकसी करून देविली जाईल.

पिलाजी जाधव व रगोजी जाधव याजकडे शाहागडची पाटीलकी आहे, त्यास तेथील जाहागिरदारास ताकीद करावी की पाटीलकीचा अमल चालवीत.

ताकीद केली जाईल.

तुरकताजखान याणी स्वराज्यात जाऊन बंद धरून आणिला आहे तो सोडऊन द्यावा. सोडून देविला जाईल.

तोकरे परगण्याचे सात गाव मजीठोके याचे देशमुखींचे आहेत त्याची सनद देवावी.

दफ्तरचा दाखला पाहून देविली जाईल.

मौजे मजकुरचे महसुलाची चौकसी करून रयात केली जाईल.

अलीखानाचे कैदेत आहेत ते सोडऊन द्यावे.

मोगल अलीखानास लेहून सोडविले जातील.

पा। कर्डेनिंबोणे येथील पाच गांव कृष्णाजी पवार व उदाजी व केरोजी पवार यास इनाम द्यावे.

आमचे चाकर होतील तेव्हा त्यास दिल्हे जातील.

संभाजी राजे यास सुभे विज्यापूर पा। कृष्णा व पंचगंगेच्या पलीकडे प्रात येथील चौथ सरदेशमुखी आम्हीं दिल्हीं ते त्याणी घेत जावी. कृष्णेच्या आलिकडे उपद्रव न करावा.

मंजूर व स्वांद[१] (?) कबूल.

या। पाचा पत्रातील मंजकूर कलमबंदीने लिहिला आहे.

२ ज्यासुपारखानाची (?) पत्रे बाजीरायाचे नावे.

सोनगड तालुका आम्हाकडे आहे. नवाबानी व आपण तमाम मुलुखात वाजवी चौथ सरदेशमुखी मुकरर केली.

नवाबानी आपण श्नेह करून तमाम मुलुखात चौथ सरदेशमुखी मुकरर केली. त्यास आमचे जाहागिरीत चासकर उपद्रव करितात त्यास

---

१ (स्वत: ?)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आमचे तालुक्यास सयाजी चासकर जाजती उपद्रव करितात त्यास ताकीद करावी.	ताकीद की जाजती तगादा न करावा म्हणौन.

याो दोन पत्राचा मतालब लिहिला असे.

११ यादी बादशाहा व वजीर यांच्या दस्तकानसी कांही दस्तका सिवाय.

१ यादी मतलब धोंडो माहादेव याणी बादशाहा यासी लिहोन दिल्हे व वजीरानी दसखत केलें कलमे.

हिंदुस्थानात येक जागा वतनी द्यावी,	मंजूर म्हणौन हुकुंम जाला.
दक्षणची सरदेशपांडगिरी आम्हांस द्यावी.	हुजुर येऊन कांही नजर दिल्ह्यास सनदा देऊं.
मनसबा व जागीर आम्हांस द्यावी व समागमे लोकासहि द्यावी.	हुजुर आलियावर खर्चास द्यावे. जागिरीत आंमल होईतों पावेतो दिल्हे जाईल.
तुमच्या सांगितल्याप्रमाणे जाब त्याबाा देऊ.	
बादशाहाची भेट जाल्यावर कामाकाजाविसी चित पुरवावे.	मुलाजमत जाल्यावर कामाकाजाविसी साहित्य केलें जाईल.
हुजुर आल्यावर दोन तीनदा खलबतीत बलाऊन जाबसाल श्रवण करावा.	
कोणी मातबर जाबसालाच्या मध्यस्ती आसावा.	हुजुरचा मातबर जाबसालाच्या मध्यस्तीस राहील.
तुमची योग्यता पाहून बादशा बलावतील.	
भेट होई तों पावेतो इकडील फौजा मुलकात धांमधुम करतील त्याच्या ताकिदीविसीं हुजुरची फौज जावी.	
मराठे याणी पहिल्या प्राो अमर्यादा केल्यास पारपत्य होईल.	

कलमे ८ याद येक.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ सदरहू यादीची नकल धोंडोपंत यांच्या मोहरेनसी धोंडोपंताची.

१ याद बाजीराव याची विनंती जे दोन कलमे लिहिली आहेत ती मान्य करावीं.

मालव्याची सुभेदारी व दरोबस्त सुभा बादशाही किले व जागीर व कदीम राजे व इनामदार व रोजीदार याखेरीज आंम्हास जागीर द्यावा.

मंजूर.

नगद खर्च प्रथम सालीं.

१ पिलाजी जाधव. हुजूर येऊन करारमदार केल्यावर च्यार लक्ष.

१ खरिफाचा मंवसम जाल्यावर पांच लक्ष.

१ रबीच्या हंगामावर च्यार लक्ष.

—

३

तेरा लक्ष रूा खर्चास द्यावे.

मंजूर.

कलमे दोन याा याद येक.

१ याद दक्षणच्या सरदेशपांडगिरीस नजर द्यावी म्हणोन आज्ञा जाली त्यास सा लक्ष रूा नजर मुकरर करावी; पैकी चौथाई नख्त व तीन हिसे किस्तबंदीने आंमल जाल्यावर दाखल करूं.

आज्ञा जाली की सनद दिल्यावर सा लक्षाचा चौथा वाटा व बाकी किस्तबंदी द्यावी.

१ याद बाबूराव याची; विज्ञापना कीं चिमाणाजीपंत बाजीराव यांचे भाऊ सरकार चाकरीत येकनिष्ट आहेत; व सरकार कामाविसी बाजीराव यासी बहुताप्रकारे समजावितात. सबब दोन लक्ष रुा चिमाणाजीपंत यांस सरकारांतून रयात करावी.

पिलाजी जाधव हुजुर आल्यावर येक लक्ष.

मंजूर.

कौल करार जाल्यावर रबीच्या हंगामात येक लक्ष.

मंजूर.

दोन कलमे मिलोन येक यादी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

१ यादी बाजीराव पंत प्रधान यास खर्चाविसी आज्ञा जाहाली. त्यास उजनीस पावल्यावर अर्ध, व हुजूर पोहचल्यावर अर्धे करार पैा द्यावें. पाच लक्ष रुा माळव्यांत आल्यावर व भेट जाल्यावर पाच लक्ष व अखेर साली पाच लक्ष यो पधरा लक्ष रुा देऊ.

१ यादी राजे वतनदार माळव्यातील त्याणी बितपसील बाजीराव यास खर्चास द्यावे.

ओडशाचे राज्यापासून दोन लक्ष

भदावरकर राजा सवा दोन लक्ष

चांदेरीकरापासून पनास हजार

नरवरकरापासून तीस हजार

सिपरीकर पंचवीस हजार

रामपूरकर तीस हजार

अमझरेकरापासून पचवीस हजार.

कोटेकर राज्यापासून सवा दोन लक्ष

दतियाकर राज्यापासून येक लक्ष

खेचीकरापासून चालीस हजार

सोंधेकर तीस हजार

बुंदीकरापासून पंचवीस हजार

येक यादीचा अन्वय लिहिला.

१ यादी माहादेवपंत याची विज्ञापना की, बालाजीराव याची अर्जी आसंदयारखान याचे विद्यमाने दिल्ही, व बेलभडारहि दिल्हा ; व खान मजकूर याणी जान कुराण देऊन खातरजमा केली. यावर खान मजकूर जो आपला हुकूम पोहचावतील त्या प्रमाणे बालाजीराव यास लिहून करविले जाईल. अंतर होणार नाही. हूकूम जाला की, आसंदयारखान सांगतील त्या प्रमाणे बालाजीराव यास लिहावे.

१ यादी बाजीराव पंतप्रधान याचे मतालबाची निजामनमुलूख यास लिहून दिल्ही.

चंदीचंदावरचे राज्य सिवाजी राज्यास होते. त्या प्रेाा शाहू राज्यास द्यावे.

पंत प्रधान यास कर्जाची ओढ जाली. त्यास खर्चाची मदत करावी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

खानदेश औरंगाबाद व विज्यापूर तिही सुभ्यापौा पनास लक्षाची जाहागीर पंत प्रधान यास द्यावी.	सिवनेरचा किला पंत प्रधानास द्यावा.
सरदेशपांडगिरी दक्षणची वतनी दर शेकडा रसूम[1] दर ५ करार करून द्यावा दक्षणचा बंदोबस्त राव पंत प्रा यांचे विद्यमाने करावा.	किती येक गाव इनाम करून द्यावे.

याचा जाबसाल जबानीने केला असे.

येक यादीचा अन्वय

१ यादी बाजीराव पंतप्रधान याणी बातशाहास लिहून दिल्हा. त्यातील मजकूर दक्षणची सुभेदारी बातशाहजाद्यास व साहा सुभ्या पैा पनास लक्षाची जाहागीर आम्हांस व जो खजिना दक्षणचा आमच्या कोसीस केल्याने हुजूर येईल; पैा अर्धा सरकारात व अर्धा आम्हास व सिवनेरचा किला व दक्षणची सरदेशपांडगिरी वतनी व कितियेक गांव मोकासी वतनी व चंदावरचे राज्य शाहू राजे यास कृपा करून द्यावे म्हणौन.

याचा जाबसाल जबानीने करून घेतला असे.

१ यादी बाजीराव पंत प्रधान याणी बातशाहास लिहून दिल्हे. त्याची कलमे बितपसीलवार.

१ सुभे मालवा दरोबस्त राज्याचे तालुक्यासहित आम्हांस जाहागीर व सुभेदारी आमचे नावे द्यावी.

ज्या प्रो पेशजी मुकरर जाले त्याप्रमाणें.

१ यार महमदखान व इजतखान यास काढून द्यावयाविसी सरकारातून कुमक व्हावी; व त्याच्या तालुक्याची जमीदारी आम्हास द्यावी.

जे समई तुमची फौज त्या जिल्ह्यात जाईल तेव्हा हुकूम केला जाईल.

---

१ फी, कर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ किले मांडवण व धार व रायसेन प्रांत मालवा कुटुंब ठेवावयासी पंत प्रधानास द्यावा.

हुजूर आल्यावर व तुम्हाकडून खातरजमा जाल्यावर येक किला देऊ.

१ चमलचे किनाऱ्यापावेतो जाहागीर राव पंतप्रधानास द्यावी. जे समई तिकडील राजे रुजू होऊन नजर देतील तेव्हा त्याच्या वतनी माहालास उपद्रव होणार नाहीं.

ज्याप्रो पेशजी ठरावात आले त्याप्रो उपद्रव न करावा.

१ राव पंतप्रधान यास कर्जदारीची वोढ बहुत, सबब पंनास लक्ष रुा तूर्त बंगाल्यावर देवावे.

ज्याप्रो पेशजी करार जाले असेल त्याप्रो.

१ प्रयाग, कासी व गया व मथुरा येथील राव पंत प्रधानास जाहागीर द्यावी.

दसक केले नाही.

१ आपण आगऱ्यास यावे व राव पंतप्रधान याची भेट अमीरखान व राजे जयसिग याचे विद्यमाने सरे (?) स्वारी व्हावी ; व भेट जाल्यावर निरोपहि लौकर द्यावा.

हुजूर आल्यावर जे जेथे हुकूम होईल तेथे घ्यावी.

१ सरदेशपांडगिरी दक्षणची पंत प्रधान यास वतनी करून द्यावी. दसकत केले नाही.

१ दक्षणेत कितीयेक राव पंतप्रधान यास इनाम देऊन सनदा करून द्याव्या. दसकत केले नाही.

९

येाा येके यादीवर कलमे

११

१ निजामनमुलूख याचे पत्र अमलदाराचे नावे त्यातील मजकूर बाजीराव याणी सांगितले की, राजे शाहू याच्या तगीरीच्या दिवसात बहुत करून कमावीसदारानी चौथ सरदेशमुखीचा पैका घेऊन हिमाइतीने

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लपून बसले आहेत. त्यास ताकीद व्हावी सबब हे पत्र सादर केले असे. तरी बाजीराव याजकडील लोक ज्यास दाखवितील त्यास ताकीद करून बाजीराव याजकडे रुजू होतसे करावे.

१ निजामनमुल्लक यांचे पत्र नासरजंग यास की, वेरूलची पाटीलकी शाहू राजे यांजकडे आहे. ते सुरलीत चालवावी म्हणौन.

१ निजामनमुलूक याचे पत्र सेदजमालखान थैवजखान यांचे पुत्र याचे नावे कीं, साहा सुभे दक्षणची चौथ सरदेशमुखी पेशजी-प्रमाणे शाहू राजे यांजकडे जाहाली. त्यांस बाजीराव यांजकडील कमावीसदार चौथ सरदेशमुखीचा आंमल करावयास येतील. तुम्ही जमिदारास ताकीद करून आमल सुरलीत चालवणे म्हणौन.

तारीख साल नाहीं.

१ वजिराची आर्जी बादशाहास त्याची नकल: त्यातील मजकूर; पंधरा लक्ष रुा बालाजीराव पंतप्रधान यांस इनाम द्यावे म्हणौन करार जाहला आहे. त्यास कृपा करून त्यापैकी येक हिसा तूर्त, येक हिसा भेट जाल्यावर, व येक हिसा आखेर साली द्यावा.

यादीवर स्वाद दसखत केला.

१ याद करारनामा पंत प्रधान याणी लिहोन दिल्हा. त्यांतील मजकूर बी तपसील कलमे.

बादशाहाची भेट वेऊ कलम १

कोणी मऱ्हाठ्याची फौज नर्मदा उतरणार नाही. उतरला तर जिंमा आमचा असे. कलम १

जे रुपये सरकारातून आम्हांस इनाम दिल्हे त्यासिवाय साल दर साल न मागतां चाकरी करून. कलम

माळव्याखेरीज दुसऱ्या स्थलास उपद्रव करणार नाही

येक सरदार पांचशे स्वारानसी हुजूर चाकरीस राहील कलम १

हुजूरची फौज बाहेर निघाल्यावर च्यार हजार स्वारानसी चाकरी करू याखेरीज याखेरीज फौज हुजुरात पाहिजेसी असल्यास हुजूर बोलावावी व हुजुर राहे तो खुराक द्यावी. कलम १

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चमलनंदीच्या तिकडील जमिदारास नजर पेशकशी सिवाये काहीं न मागू कलम १	जमिदार मुपसत याचे पारपत्यास हुजूरून हुकूम जाहल्यास च्यार हजार फौजेनिसी जाऊन पारपत्य करू कलम १
किलेदाराची जहागीर व मश्रुत व काजी व दुपती यास जमिनी इनाम व रोज हुजूरच्या फरमाणा व मोजीव असतील त्या प्रो। त्याजकडे चालवू; कोणेविशी उपद्रव करणार नाही. कलम १	

येकूण कलमे आठ व याद १

¶*This is a long paper containing 25 Modi sheets. The top line describes it as a Marathi translation of Persian originals, which formed the correspondence of the Emperor of Delhi and his officers on the one hand, and Bajirao I and his son Nanasaheb on the other. The correspondence between these latter and Nizam-ul-mulk is also included in these papers. The papers generally prove how the two Peshwas gradually made their entry into Malwa and Bundelkhand and compelled the Emperor to accede to their terms. Similar terms were also exacted from the Nizam. The whole paper is helpful in determining the various transactions of Bajirao and his son, as it contains the gist of various older documents.*

**87]*

[7-4-1736

श्री

छ ६ जिल्हेज

विनंती उपरी. वडिलास सेवकाने सेवेचे व मुलकाचे वर्तमान लिहिलें. त्यास उत्तर साफ लिहिले कीं पोट भरेना तर रेवामुकुंदपुरचे राज्य घेणे अगर देशास जाणे. त्यास खावंद दिलीचे दरवाजा जाऊन बैसले आहेत आणि आम्ही देशास जावे तर आमचा देशी कोणी धणी आहे ऐसे नाहीं. सेवकाचें सर्व आहे

* पुढील आठ पत्रें पुरवणी म्हणून दिलीं आहेत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ते स्वामीचे पाय आहेत. वडिलांच्या चरणा खेरीज दुसरे दैवत आहे ऐसे नाहीं. आजिवर जाधवहटीमधे कालहरण केले. याउपरी जाधवहटीचे सरदेस व शहाबाजेचे सरईस व सोपारहि आठरा कोस आहे यामधे धंदेरियाचे गांव आहेत. विजेपूरचीहि सरद आहे. येथं कालहरणै होईल तेथवर करीत आहे. लस्कराचे धास्तीमुळें मुलुक उद्वस जाला आहे. लस्कराच्या आसपास पाणी बाराकोसी नाहीं. झाडखडीमधे राहिलो. चमेलीचे कुाठी ढोढलपूर व देवगीर उदगीर जाधवाचे गांव मवासी आहेत. चमेलीपार मुलुक उद्वस आहे. येथून कूच करावे तेव्हां ढोढलपुरावर राहावें ऐसें आहे. दिलीकडून यादगारखानहि येऊन दाखल जाले असतील. मनसबा होणे तो स्वामीच्या पुण्यप्रतापेकरून होऊन येईल. सेवकासहि वृत त्याहावयास आज्ञा केली पाहिजे. जखमेचा हातास तिडीक लागली होती. ते आरोग्य जाली. सेवेसी कळावें म्हणून लिहिले आहे. सोपारचे कमावीसदारहि आले आहेत. लस्करासहि ताकीद केली आहे. याउपरी जे आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Baji Bhivrao to the Peshwa, communicating his own movements and doings in the Bundella country.*

88] [11-5-1737

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलांचे सेवेसी

अपत्यें जनार्दनाने साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २१ मोहरम बुधवार वडिलांचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. वडिलीं पत्र छ १८ मिनहू हुबकाचे मुकामीचे पाठविलें तें छ १९ रोजी घटका रात्रीस पावलें. लिहिला अभिप्राये सविस्तर कलला. त्यावरून काली छ २० रोजी कूच करून झासीनजीक मुकाम केला. आजी छ मारी तेथून कूच करून मौजे खमारी नजीक लोनेर उदगावा येथें मुकाम केला. वडिलांची आज्ञा कीं, सोनारी उजवी टाकून सिंद नदीवरी येणें, त्यास त्या मार्गें यावें तरी पाणी लस्करास मार्गी अगदीं नाहीं. लस्कर पाण्याकरितां हैरान होईल. लांब मजल करिता नये. म्हणून पाणी पाहून येक मजल आधिक करावी लागली. बुधवारीं नदीवर यावयास आंज्ञेप्रमाणें यावयास गांठ पडिली नाहीं. गुरुवारी सिंद नदीवरी येतों.

+ पत्र बाजी भिवरावाचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वडिलांचे येणे नर्दावरी जाहालें असिलें तरी आपलेंच येणे येथें होईल किंवा आम्हीच तेथें यावें तें आज्ञा करून राऊत रातोरांत आम्हाकडे पाठविले पाहिजे. त्याप्रमाणें वर्तणून करून. शेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardan to Bajirao giving his programme of journey.*

89] [पौ *31-1-1737*

श्री

छ १० सवाल.

विनंती उपरी. चंबेलीपलेकडे जाऊन मुलुकगिरी करावयाची राहिली आहे. त्यास आगरेसमीप स्वामीचे येणे त्या प्रांते होत आहे. वडिलानी मनसबा मातबर केला आहे. आम्हांस हस्तनापूर समीप आहे. राजकारणाचा विचार आहे. पाछाई रस्ता; आहिर्णीसी मोगली फौजा येत आहेत. मार्गी आगरेपरयेंत मुलकामधे टका मिलतो यैसे नाहीं. हा विचार स्वामीसहि श्रुत आहे आणि त्या प्रांताचे लोकहि सेवेसी आहेत. मुलकाचा विचार तो या प्रकारचा आहे. आम्हास तो त्या मुलकाखेरीज दुसरे स्तल राहिले नाहीं. गालेरीहून पश्चिमेस जावे तर मालवा लागला आहे. तीन मास कालक्षेप करावयाचे आहे. त्यास काये आज्ञा ते केली पाहिजे. येमुनेस उतार काळपीसमीप आहे, परंतु वैशाख आखेर होईल यैसे म्हणतात. तोपरयेंत आम्हांस धीर होतो यैसे नाहीं. नावा आहेत; त्यास, त्या काहीं त्याचे आज्ञेविना हातास येतात यैसे नाहीं. त्याची फौज आली तर सर्वहि वडिलाचे पुण्यप्रतापेकरून घडोन येईल. अम्ही मार्ग पाहात आहो. स्वामीनीं लिंहिले की गुंता उरकून सिध राहणें. त्यास आम्ही आज्ञेप्राा गुता उरकून सिध आहों. द्रव्याचा मुल्क नव्हे. च्यार वरसे फौजेने चोलले व मोगलानीहि लुटले आहे. आम्ही कोणे प्रांते यावें, कोणे ठिकाणी राहावें हे आज्ञा केली पाहिजे. दिलीकडील वर्तमान लिहिणे म्हणून आज्ञा केली. त्यास आम्हांस स्तल समीप आहे. मयारामाकडे जोडे वरचेवर पाठवीत आहे. त्याकडील वर्तमानहि येत आहे. त्यास, तेथील विचार हाच की, मोगल तेव्हडे येकीकडे जाले आहेत. खानडौरा व जैसिंग येवडे स्वामीकडे आहेत. नवाब किलीजखान याचें जासूद आहिर्णिसी दिलीस जात आहेत. त्याचे आज्ञेमधे कमर्दीखान व तुरेबाजखान व सादतखान व आभेसिंग यैसे येक होऊन मनसबा वडिलानी योजिला आहे तो काहीं सेवटास जाऊ द्यावा यैसा त्याचा हेत आहे यैसे नाहीं. स्वामीनीहि केवल त्याच्या भरवश्यावर दिलीस जावे यैसें दिसोन येत नाहीं. स्वामी तों विवेकी आहेत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मनसबा थोर आहे. स्वामीची फौज थोर आहे. परंतु दिलीमधे भारी आहे यैसे नाहीं. पूर्वी तीर्थस्वरूप कैलासवासी गेले होते त्यासमई सैद मातबर इमानी होते. मध्यस्त शंकराजीपंतहि होते. ते समई मोगल आगदी बुडाले होते. किलीजखान फकीर होऊन शहरी होते. या मनसबियास सर्व शाबूत फौजेनसी हवेलीमधे आहेत. स्वामीनी जो विचार करणे तो बहुत सावधपणें करणें. कोणाचा भरवसा धरून केला न पाहिजे. दिलीस सोरत जाली आहे की राव सेवामुले दर्शनास येत आहेत. मोगल बाईल देऊन काम करावे यैसे त्यांचा मनसबा आहे. जो मनसबा करणे तो दुरूनच करावा. केवल सनिधच जाऊन करावा यांतच कीर्ति आहे यैसे नाहीं. किलीजखान त्यांस वरचेवर शाहाणपणाचा विचार लिहित आहेत. दिलीतील ग्रहस्त त्याचे आज्ञे-खेरीज नाहीत. आम्ही लेकुरपणे लिहिले आहे. म्हणून रागास आले न पाहिजे. राणाजीस व जैसिंग यास टक्यामुले श्रमी केले न पाहिजे. थोर आहेत. हे विज्ञात.

¶*Baji Bhivrao requests the Peshwa to be very cautious in leading an attack on Delhi as all the Moghal sardars in the capital had already mustered their forces strong and made a common cause in order to present the Marathas a very strong opposition.*

90] [पौ. *31-1-1737*

श्री

छ १० सवाल.

विनंती उपरी. वडिलाचे दयेकरून वोडसे व दतिये थोडेबहुत आधिक करून निमे वसूल पदरी पडला. बाकी राहिला तोहि अठा रोजानी पदरी पडेल. पार व्र दानवार व पछोर व पमइछा व शुकलारी व गुजरोला व उचाड यैसी खंडणी करून चुकविली. वसूलहि होत आला आहे. जाटवाडा आगदी झाडा जाला. नरवरचें वृत तर राजश्री जाधवराव याचा कमावीसदार आहे त्यास खंडणीचा मोकरार करून दिल्हा. वसुलास राऊत ठेविले आहेत. वसूल लस्कर मुकाम करून घ्यावा यैसी परगण्यामधें बाकी राहिली नाही. परगणा आगदी उद्वस आहे. वसूल होता होईल तो खरा. पाा गालेर येथे कोणी जमीदार आगर जागीरदार मातबर आहेत यैसे नाही. गाव जुजवी आहेत. काहीं वोस जाले. काही आहेत ते भेटले. परंतु द्रव्यास समध नाही. केवल परगणा भिकारी आहे. भदावरचे पाच आले होते त्याचा विचार मनास आणिला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यास, त्याचे मतें च्यार वरसे घेत आलो आहे त्याप्रा येंदाहि चुकवावे. त्यास मागाहून दोनी सवस्तानें आधिकोतर केली आणि यास जेव्हां पूर्ववत केले म्हणजे मागील हसतील. याजकरिता त्यास आज्ञा दिल्ही. ते आपल्या राज्यास पुसावयास गेले आहेत. आम्हीहि मेढ्यास बैसलों आहों. मुलूक मातबर आहे. उद्वस करून नाश करितील यैसे दिसोन येत नाही. यामधे स्वामीचे पुण्य समर्थ आहे. तेहि चुकवितील यैसे आहे. येद्यपि मुलूक वोस केला तर आमची खंडणीपुरता वस्ता राहील यैसे आहे. आम्ही तो श्रम करावयास आंतर करितो यैसे नाही. राजश्री हिरदेशा व राजश्री जगतराज उभयेता राज्याकडून रा गोविंद बलाल आम्हाकडे आले होते. त्याचा विचार आहे कीं आपली फौज व आम्ही येकत्र होऊन मुलूकगिरी करावी यैसा विचार त्यानी सांगितला; त्यावरून गोविंद बलाल फिरून त्याकडे पाठविले आहेत. ते फौज घेऊन आले तर मुलुकगिरी करावयास येमुनेआलाकडे स्तल नाहीं. भदावरचा व हिरदेशाहचा मुलूक येकत्र जाला आहे. दोनीच्या सरदेने जावे तेव्हा येमुनेस दाखल होवे, तर उभयेता राज्याचा सलूख; मुलकास उपद्रव देता येत नाहीं. भदावरची खंडणी जालियानंतर यासहि आजार लागू द्यावयास येत नाहीं. यैसे येऊन संकट पडले आहे. दोघाचे सरदेस मुलुक परकी असता तर च्यार दिवस कालक्रमणा करावयास येती. त्यास हिमतराव व कृस्णासिंग आले तर त्याचे विचारें जे करणे तें करू. अडारूच्या राज्याचा लेक येमुनेआलाकडे आला आहे त्यासहि बोलाऊ गेले आहे. तोहि आला तर जो मनसबा होईल तो करीतच आहों. गुदस्ताप्रा मुलूक होतो तो चुकला. या उपरी मुलूक राहिला नाहीं. दिवस तो तीन महिने राहिले आहेत. मुलाकात आन नाहीं. ज्यांस कौल दिल्हा त्यास लुटले म्हणजे बेकौल होईल. दुसरा देश तो राहिला नाहीं. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao writes to the Peshwa about the collection of tributes from the provinces of Jatwada, Narwar, Datia, Orchha, Gwalior and Bhadavar.*

91] [*1737*

श्री

विनंती उपरी. दिलीकडील व अमीराकडील वर्तमान येत जाईल तें लिहीत जाणें, म्हणून आज्ञा तरी दिलीस मयाराम याजकडे मुजरद कासीद जोडी पाठविली होती. त्यास तेथील वर्तमान यैसें आहे जें कमरुदीखान व सादतखान व तुरेबाजखान व अभेसिंग याचा येक विचार आहे, कीं पादशाहाचें व स्वामीचें सख्यत्व जालें तर हा मनसबा येकंदर होऊं देउं नये. हा मतलब त्या चतुर्वर्गाचा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. खान डौरा व राजश्री सवाई जयेसिंग यांचा येक विचार कीं स्वामीचें व पादशाहाचें * * * दावेंयांत उत्तम आहे यैसा तेथील * * * ग जाहला आहे. स्वामीकडेंहि वर्तमान * * * * तदनुरूप जो विचार कर्तव्य तो स्वामी * * * करतील. वरकड कितेक दिलीचें वर्तमान * * * विदित व्हावें याकरितां तेथून पारसी * * * त्याची नकल बजिनस पाठविली आहे. * * * विदित होईल. सारांस जें होणें तें स्वा(मीचें) पुण्यप्रभावें होईल. लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंति.

¶*A news-letter from the North referring to a compromise between the Emperor and the Peshwa which Kamrudikhan, Sadatkhan and Abhesing did not wish to have effected.*

92]

[*1737* ?

श्री

विनंती उपरी. आपण रा. सदोबा बराबरी सांगोन पाठविले जे, खानाचा आजी मुक़ाम होतो. नवाबाचा हुकुम किल्यावर दाणा चढवावयाचे आला, त्यावरून कस्तिात, तरी माघारे येणे. त्यास रात्री कुचाचा निश्चय जाहाला त्यास घाटाचे आडचणीमुळे पहाटेच कुच करून पुढे आलो. मोगलाचा मुकाम तेथें होईल तरी त्यास सांगोन कुच करून आपणाजवल आणवावे. येथून किलाहि जवल पडतो. दाणा जलद पोंहचेल ऐसे सांगोन राऊत बाा द्यावे. सादतखान जातील त्यास मागे टाकून आपण पुढे राहवेसे नाही. दाणादुणा कुणबियाचा जाहला नाही, दिसगत लागेल. येथे वैरण काडीहि नाही. याकरितां घाटावरी आणवावे ते मागे राहून कुणब्यास दबाऊन आटकारीतील. आपणाजवल राहिल्यास उत्तम आहे: वाघ दरवेसियाजवली आणून हाती घालून मारून टाकावा. हात्ती सेर होतील. हातीचा १दैंदनक्ष होतो तरी त्यास अणला असेल तर उत्तम. नसेल तर आणविला पाहिजे हे विनंती.

¶*Letter to Bajirao in his northern expedition against Sadatkhan. The writer advises certain movements in view of the Nizam's halt.*

---

१ दुर्लौकिक.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

93] [13-1-1739

श्री

विनती उपरी. पूर्वी अयकिले वर्तमान ते लिहिलें होते. परंतु राजश्री आवजी कवडें याचे वर्तमान साध्यात नव्हत. साप्रत वर्तमान नवाबाचे येथे आलें की नरसी प्राती सुखरुप आहेत. जमालुदिखा ताकुबास गेले होतें ते घामपूरावर उतरले आहेत. राजश्री पंतप्रधान दतियापावेतो गेले. तेथेच मुकाम आहेत. प्रुथवीपतीचा फर्मान नवाबास आला तो छ १३ सवाली फर्मानबाडीस जाऊन घेतला. तेथे लिहिले आहें मी आपलें कूच केलच आहें * * * * हे सादतखा कालपीपासी येमुनातीरी आहेत. तोहूखान येलतीरी उतरला म्हणोन वर्तमान आले. आववे आपलाले जागा खुशाल आहेत. राजश्री रावहि शंतोशरूप आहेत. कलल पाहिजे. राजश्री रावरंभाजी निंबालकर याचे पुत्र राजश्री जाणबा व माहादोबा व जानबाची धाकटी मुले कुली अली. नवाबाचे आज्ञेने जैनाबादेपासी तापीतीरी डेरा देहून राहिले. नवाब त्याचे डेरियास जाऊन फार समाधान व आदरमान कृपाउतर केली येसी मागे कोन्हे मऱ्हाटियावर केली नसल. त्यावर हे नवाबाचे दरबारास चौथे दिवसी आले. नजर न्याज जाली. नौबतीचा हुकूम नवाबाही दिल्हा, यैसी कृपा बहुता प्रकारें केली. वरकड देणे वेणे अद्याप काही नाही. राजश्री रघूजी भोसले व लक्ष्मण खंडागले यानी नागपूर देवगड प्रांतीचें मारिलें म्हणोन वर्तमान आहे. कलल पाहिजे. रायाचे वर्तमान तर नवाबास बहूत समाधान लिहिलें आहें. कमरुदीखानाचें व बगस कूच करून येणार. धेकडसिंग सादतखान आलीकडे उतरले यानीं मदसोरपरयेंत मार्ग सोडविला आहे. दिलीपतींनी रा॥ रायास जवाहीर पत्रें पाठविली म्हणून वर्तमान आहें. यानी पहिलें दूर ओलंपाच हजार स्वार ठेविले. आणीक नवे च्यार पाचपरयेत ठेविले. कमरुदीखान निघाले हे वर्तमान येताच साहेबी नर्मदातीर जाणार आहे. रा॥ चद्रसेन जाधवराऊ वेथे-मुले घरी राहून पुत्र व मलारराऊ पाठविलें ते आले यैसे वर्तमान आहे बहुत काये लिहिणे. त्याचे पत्र रा॥ माध्दाजीपंताजवल पाठवणे. बातमीजोडे नाहीत याकरिता लागेर भोईनदार *

¶*The letter gives news from various quarters, e.g., Awaji Kavade being safe at Nadasi, the Peshwa having marched as far as Datia, the Nizam receiving a firman from the Emperor, the Nimbalkers having encamped on the Tapti and Raghuji Bhonsle creating troubles round about Nagpur and Chandagad.*

1388

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

94] *[19-12-1739*

श्री

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाजीराऊ बलाल प्रधान आसीर्वाद सुा आर्बैन मया अलफ. तुमचे पत्र आर्जी बुधवारी पावले. लिहिले वर्तमान कळलें. येसियास तुम्हास अनकूल पडेल आणि पुढे आलेस तरी येणे. चिरंजीव राजश्री आपासमागमे याचे असेल तरी त्यासमागमे येणे. आमचा मुकाम नजीक नगर आहे. तरी तुम्ही दोहीतून अनकूल पडेल तैसे येऊन सामील होणे. जाणिजे. चिरंजीव राजश्री आपाचे पत्र पाठविले तेहि पावले. जाणिजे छ २८ रमजान. बहुत काये लिहिणे ?

लेखन
सीमा.

¶*Pilaji Jadhav is asked by the Peshwa to join him at his earliest convenience. Bajirao is encamped near Nagar.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

BAJIRAO'S ADVANCE UPON DELHI
1737-38



CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh